संत झेवियर महाविद्यालय, मुंबई
मराठी वाङ्मय मंडळ

# परखरण

## २०२४

**संगम - Confluence**

# पखरण २०२४

**संपादिका**
अवनी सिनकर

**समन्वयक**
चिन्मयी मोंडकर

**साहित्य विभाग प्रमुख**
गौरी देशपांडे

**मांडणी सजावट**
सौम्या मोहिले
सूर्या आश्रिता गरिमेल्ला

**अनुवाद**
यशोधन देवधर
कनक काटदरे

पखरण हा अंक मराठी वाङ्मय मंडळातर्फे २१ जानेवारी २०२४ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे.
या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**अभिप्रायासाठी संपर्क:**
mvmpakhran@gmail.com

# आमचे प्रायोजक !

Saraswat
Bank

# अनुक्रमणिका


| क्रमांक | शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | संपादकीय | ६ |
| २. | मंडळाच्या महासचिवांकडून | ७ |
| ३. | म. व. मं. आणि मुख्य कार्यकारिणी | ९ |
| ४. | प्राचार्यांचे मनोगत | १२ |
| ५. | मंडळाचे आधारस्तंभ | १४ |
| ६. | एक अलौकिक संवाद | १६ |
| ७. | वार्षिक अहवाल | २० |
| | **शिक्षकवृंदाच्या लेखणीतून** | |
| ८. | ‘राष्ट्र’ संगम | २१ |
| ९. | पावसातली मुंबई | २३ |
| १०. | Dear Digital Natives | २३ |
| ११. | जैव विविधता एवं सहअस्तित्व | २५ |
| १२. | Ancient Indian Education – A Sangam of Viveka | २७ |

| क्रमांक | शीर्षक | पान क्रमांक |
| --- | --- | --- |
| | **पखरण विचारांची...** | |
| १३. | संगम म्हणजे नक्की काय असतो? | ३२ |
| १४. | एक संगम असाही... | ३४ |
| १५. | आयुष्यावर बोलू काही! | ३६ |
| १६. | Tapestry | ३८ |
| १७. | छंद असायला हवा... | ४० |
| १८. | एक रंगीत संगम | ४१ |
| १९. | संगम विचार- भावनांचा | ४३ |
| २०. | संगम- ज़िंदगी से | ४४ |
| २१. | सूरसंगम- गुंफते माळ मी सुरांची | ४५ |
| २२. | संगीत- एक मधुर संगम | ४७ |
| २३. | खारट नाती गोड कशी होतात? | ४८ |
| २४. | संगम नात्यांचा | ५० |
| २५. | त्रिवेणी संगम | ५२ |
| २६. | ना राहिले मी माझी | ५२ |
| २७. | संगम दर्शन: देवबागच्या स्वर्गीय चमत्कार | ५४ |
| २८. | संगम अनेक कृष्णांचा | ५७ |

| क्रमांक | शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| २९. | वे अर्धनारीश्वर केहलाये... | ५८ |
| ३०. | आरतीचा डीपी | ६० |
| ३१. | मी नेमकी कोण आहे? | ६२ |
| ३२. | मुंबई मेरी जान! | ६४ |
| ३३. | गुरूछाया | ६५ |
| ३४. | तेजांकित | ६७ |
| ३५. | नाती आपुलकीची- म. वा. मं आणि कार्यकारिणी | ७० |
| ३६. | विरंगुळा | ८१ |
| ३७. | कार्यकारिणी २०२३- २४ | ९३ |

# संपादकीय



## अवनी सिनकर ✦ द्वितीय वर्ष, कला शाखा

'पखरण' म्हटल्यावर डोळ्यासमोर येते ती विचारांची, भावनांची, अनुभवांची उधळण. दर वर्षीप्रमाणे या वर्षीदेखील मराठी वाङ्मय मंडळाने विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकवृंदाला त्यांचे विचार मांडण्यासाठी हे व्यासपीठ उपलबध करून दिले. या वर्षी मंडळाने अत्यंत उत्साहाने शतकपूर्ती पार करून, एकशे ऐकाव्या वर्षात पदार्पण केले. मंडळाचा इतक्या वर्षांचा गौरवशाली प्रवास शक्य झाला तो त्याच्या सदस्यांमुळे आणि शिक्षकवृंदाच्या पाठिंब्यामुळे. विविध व्यक्तींच्या संगमामुळेच मंडळ शंभर वर्षांहून अधिक कालावधीसाठी कार्यरत आहे यात शंका नाही. मंडळाचे हेच वैशिष्ट्य लक्षात घेऊन, ‘पखरण’ या अंकाचा या वर्षीचा मुख्य विषय 'संगम' ठेवण्यात आला.

संगम, अर्थात मिलन किंवा मिलाप, अनेक घटकांचे एकत्र येणे दर्शवितो. इंद्रधनुष्यापासून भारतीय समाजापर्यंत, सर्वत्रच, विविधतेसोबत दिसून येतो तो संगम,माणसांचा, रंगांचा, संस्कृतीचा आणि भावनांचा. प्रत्येक गोष्टीचे एक निराळे असे अस्तित्व असते. पण स्वभावाने भिन्न असणाऱ्या गोष्टींचे मिलन होते, तेव्हा त्यातून जन्माला येते ती एक अद्वितीय निर्मिती. या वर्षी मंडळाने एक रूपापासून एकरूपतेकडे जाण्याचा प्रवास उलगडण्याचा प्रयास केला आहे

मंडळाची या वर्षाची संपादिका होण्याचा मान मला मिळाला, हे माझे भाग्यच आहे. पखरणचा ऐंशीहून अधिक वर्षांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली, याचा मला आनंद आहे. या अंकांच्यानिमित्ताने मला लोकांचे विविध दृष्टिकोन समजून घेण्याची संधी तर मिळालीच, पण त्याचबरोबर माझी माझ्या मातृभाषेशी असलेली नाळ अधिक दृढ झाली.

पखरण २०२४ च्या निमित्ताने, ज्येष्ठ अभिनेते व लेखक श्री. दिलीप प्रभावळकर यांच्यासोबत आम्हाला संवाद साधण्याची संधी मिळाली आणि हा आम्हा सर्वांसाठीच एक अविस्मरणीय अनुभव ठरला. त्यांनी त्यांचा अमूल्य वेळ आमच्यासाठी दिला, त्यासाठी त्यांचे मनापासून आभार. त्याचबरोबर प्राचार्य डॉ. राजेंद्र शिंदे सर आणि शिक्षक समन्वयक, प्राध्यापक डॉ.प्रशांत रत्नपारखी सर यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे आम्ही हा टप्पा गाठू शकलो. मी ह्या वर्षीच्या मुख्य कार्यकारिणीचे आभार मानेन, विशेषतः माझ्या सहकारिणी, नीरजा गोखले आणि तन्वी घोटगे; यांच्या सहकार्यामुळेच पखरण २०२४ यशस्वी रित्या अस्तित्वात येऊ शकले. त्याचबरोबर साहित्य विभाग प्रमुख, गौरी देशपांडे हिच्या सततच्या प्रोत्साहन आणि पाठिंब्याशिवाय हे सर्व अशक्य होते. माझे कुटुंबीय, शिक्षक आणि माझा सर्वात मोठा आधारस्तंभ असणाऱ्या माझ्या मित्रमंडळाची मी कायम कृतज्ञ राहीन. मंडळाच्या सदस्य परिवाराची आणि पखरणसाठी लाभलेल्या सर्व वाचकांची तसेच लेखकवृंदाची मी ऋणी राहीन. आशा करते की या वर्षाच्या आवृत्तीलादेखील दर वर्षीप्रमाणे भरभरून प्रतिसाद मिळेल. मराठी वाङ्मय मंडळावर तुमच्या प्रेमाची पखरण करत रहा आणि आम्हाला आपला अभिप्राय जरूर कळवा!

# मंडळाच्या महासचिवांकडून...



## अहान वैद्य ✦ महासचिव

कुठेही ' स्वपरिचय ' देण्याचा योग आला की ऐनवेळी शब्द सुचत नाहीत. स्वतःबद्दल बोलण्यात अथवा लिहिण्यास शब्द अपुरे पडावेत, ही विसंगती वाटत असली तरी वास्तविकता आहे. हा लेख लिहिताना माझीही अशीच काही गत झाली आहे...

कॉलेजमध्ये प्रवेश केल्याक्षणी मी मराठी वाङ्मय मंडळाचा सदस्य झालो. साहजिकरित्या, मंडळातच माझं मित्रवर्तुळ तयार होत गेलं. वर्ष २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये साहित्य विभागात कार्यरत असताना मला पखरणमध्ये लिहायची संधी प्राप्त झाली. याचदरम्यान विविध स्पर्धांमध्ये मंडळ व कॉलेजचे प्रतिनिधित्व करण्याचाही योग आला. त्यानंतर वर्ष २०२२-२३ मध्ये मुख्य समन्वयक पदासाठी निवड झाली, ज्यामुळे मला मंडळ अधिक जवळून बघता व अनुभवता आले. या कार्यकाळात मंडळाच्या शतकपूर्तीच्या महोत्सवाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. याच पृष्ठभूमीवर यंदाच्या वर्षी माझी महासचिव (पूर्वीच्या मुख्य सचिव) पदावर नियुक्ती करण्यात आली.

१९२३ मध्ये स्थापना झालेलं कॉलेजचं मराठी वाङ्मय मंडळ हे मुंबई विद्यापीठातील सर्वात जुने मंडळ आहे. त्यामुळे एवढा दैदिप्यमान वारसा लाभलेल्या मंडळाची धुरा शतकमहोत्सवी वर्षादरम्यान माझ्या हाती यावी, ही माझ्यासाठी सौभाग्याची बाब होती – आणि तेवढंच दडपणही होतं. " मंडळ आपल्याला खूप काही देतं, फक्त आपण मंडळाच्या कामात योगदान दिलं पाहिजे " मी FYJC मध्ये असताना एका सिनियर मित्राने दिलेल्या ह्या कानमंत्राची प्रचिती मला सदस्य ते मुख्य कार्यकारिणी सदस्य ह्या प्रवासात आली. त्याच अनुभवांना जोपासत व नाविन्याची कास धरत मंडळाच्या यंदाच्या वर्षाचा (२०२३-२४ चा) श्रीगणेशा झाला.

मुळात वर्ष २०२२-२३ मध्ये सुरू झालेल्या शतकमहोत्सवी वर्षाच्या महोत्सवाची सांगता यावर्षी होणार होती. त्यामुळे यंदाच्या कार्यक्रमांद्वारे संस्कृती व नाविन्याची सांगड घालायचा आमचा मानस होता. हे करत असताना समाजमाध्यमांचा विचारपूर्वक उपयोग तसेच मंडळाच्या ज्ञात व अज्ञात इतिहासाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला.

जुन्या कॉलेज मॅगझिन मध्ये असा दाखला आहे की मराठी वाङ्मय मंडळाचं (तत्कालीन Marathi Literary Society) पहिलं वार्षिक संमेलन हे १३ सप्टेंबर १९२४ रोजी पार पडले. ह्याचीच पुनरावृत्ती करत मंडळाचा शतकमहोत्सवी वर्षात पडणारा उद्घाटन सोहळा १६ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आला. मंडळाच्या सदस्यांच्या प्रतिभेचं फळ ह्या सोहळ्यात दिसून आले. मराठी सिनेसृष्टीला मानवंदना देणाऱ्या ह्या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध अभिनेता ललित प्रभाकर हे मुख्य अतिथी म्हणून लाभले. मंडळाचा ह्यानंतरचा महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजेच पखरण. या अंकात तुम्ही मंडळाच्या सदस्यांचे लेख, कविता, इत्यादी वाचणार आहात. दिग्गज लेखक-अभिनेते दिलीप प्रभावळकर यांचीही मुलाखत यात समाविष्ट आहे. तसेच वर्षाचा शेवटचा व सर्वात भव्य सोहळा म्हणजेच मंडळाचा वार्षिक आंतरमहाविद्यालयीन महोत्सव आमोद, ज्याचे यंदा अकरावे वर्ष आहे. २० व २१ जानेवारी २०२४ रोजी आयोजित केला जाणाऱ्या आमोद साठी आम्हाला ' श्रीदेवी प्रसन्न ' ह्या चित्रपटाचे प्रमुख कलाकार सिद्धार्थ चांदेकर व रसिका सुनील यांची उपस्थिती लाभली.

याप्रसंगी पखरण चा प्रकाशन सोहळा पार पडला ज्यासाठी आयोजित परिसंवादात ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, दिग्दर्शक सतीश राजवाडे, क्षितिज पटवर्धन, सई गोडबोले व पॉला मॅकग्लिन यांनी सहभाग घेतला. २० हून अधिक महाविद्यालयांनी एकूण १९ स्पर्धांमध्ये भाग घेत आमोदला उत्कंठावर्धक रूप दिलं. शतकपूर्तीचे औचित्य साधत ' शतपावली ' या विशेष संस्मरण-अंकाचे अनावरण करण्यात आले. या उपक्रमाद्वारे मंडळाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतचा प्रवास मुद्रित करण्यात आला आहे.

ही शतकमहोत्सवी वर्षाची सांगता जरी असली तरी वस्तुतः मंडळाच्या दुसऱ्या शतकातील पदार्पणाचा मुहूर्त आहे. यापुढेही मंडळाद्वारे असेच नाविन्यपूर्ण व वैविध्यपूर्ण कार्यक्रम अविरतपणे आयोजित केले जातील यात शंका नाही.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी ।
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।।

# म.वा.मं. आणि मुख्य कार्यकारिणी



## तन्वी घोटगे ✦ सहाय्यक महासचिव (कार्यक्रम)

मराठी वाङ्मय मंडळाशी माझं नातं आता तीन वर्षांपासून आहे. आधी सदस्य म्हणून, मग विभाग प्रमुख आणि आता मुख्य कार्यकारिणीचा भाग म्हणून, मराठी वाङ्मय मंडळात पाहिलेले व आयोजित केलेले सर्व कार्यक्रम, माझ्या महाविद्यालयीन जीवनाचा नेहमीच महत्त्वाचा भाग राहतील. प्रत्येक कार्यक्रमाच्या आधीचा उत्साह व खळबळ मला स्पष्टपणे लक्षात आहे. मंडळाने माझा कला व कलाकार, ह्या दोन गोष्टींकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि एका नवीन स्वरूपाने आपल्या मराठी संस्कृतीकडे मी पाहणं सुरु केलं. मी लहानपणापासून ह्याच संस्कृतीला मुंबई सारख्या "कॉस्मोपॉलिटन" शहरात राहून समजण्याचा प्रयत्न करत आले आहे. मराठी भाषेचा उपयोग फक्त घरी असल्यामुळे कुठेतरी आपल्या संस्कृतीशी जोडलेली नाळही तुटेल असं वाटत होतं. पण पहिल्यांदा जेव्हा मराठी वाङ्मय मंडळाचा सदस्यत्व अर्ज भरला तेव्हा खूप काही बदललं! एवढी भव्य संस्कृती, परंपरा व मंडळाने जपलेली आपुलकी मला कळू लागली होती आणि अर्थात मंडळाने ह्याच आपुलकीने जणू मला मीठी मारून स्वीकारलं. मंडळात सर्वांना जागा आहे हे मला खऱ्या अर्थाने कळलं होतं आणि त्याचं कारणही मी जाणून घेतलं. 'पखरण' ह्या वार्षिक अंकाचा ह्या वर्षाचा विषय 'संगम', त्याच कारणाचं प्रतीक आहे. मंडळात मला संस्कृती, परंपरा, वारसा तसच नाविन्य, सर्वसमावेशकता आणि सर्जनशीलता ह्यांचा एक सुंदर संगम दिसला! परंपरा जपताना नवलाईच्या दिशेने जाणे हे आपल्या मंडळाने सहज केलं आहे आणि करत राहील!



## पिरोज रंदेरिया ✦ सहाय्यक महासचिव (व्यवस्थापन)

I am flooded with gratitude and nostalgia as I sit down to write about my incredible journey with Marathi Vangmay Mandal. When I initially walked into this cultural organization four years ago, I had no idea that it would become more than simply an organization for me. As the Assistant General Secretary Management, I can't help but think back on the incredible events and people who have impacted my tenure here.

In FYJC, I joined Marathi Vangmay Mandal as a regular member. Being a non-Maharashtrian, I must admit that I had some reservations initially. However, those concerns were quickly dispelled as I discovered the warmth and inclusivity that define this organization.

In FY, I took on the role of Marketing Head. This phase not only marked a substantial increase in duties, but also strengthened my bond with the Mandal. The encouragement and support I received from my colleagues was incredible, breaking down any barriers that may have remained owing to my non-Maharashtrian background. It was at this point in time that I finally discovered the Mandal's essence.

The journey hasn't been without its share of ups and downs, but each obstacle has acted as an opportunity for personal and professional development. The Mandal's diversity broadened my viewpoint, encouraging me to think creatively and collectively to address difficulties. Despite cultural differences, the team's unity has been a driving force behind our joint accomplishments.

One of the most heartening aspects of my experience has been the genuine love and support I've received from everyone in the Mandal. As a non-Maharashtrian, I anticipated some initial reservations, but what I found was acceptance and encouragement. This acceptance has not only made me feel valued but has also reinforced Mandal's commitment to fostering an environment where diversity is cherished.

Now, as the Assistant General Secretary Management, I find myself at the helm of affairs, responsible for steering the organization toward greater heights. This role has given me the opportunity to interact with even more incredible individuals, both within and outside the Mandal. The learning curve has been steep, but the support of the Mandal's community has been my constant anchor.

Looking back, my experience with Marathi Vangmay Mandal has been nothing short of fantastic. I have learnt, grown, and created lasting memories with a group of people who have become more than just colleagues - they have become friends, mentors, and confidants.

In conclusion, I extend my heartfelt thanks to everyone in Marathi Vangmay Mandal for embracing me wholeheartedly and allowing me to contribute to this vibrant community. The journey has been a testament to the organization's commitment to inclusivity, and I am excited about the future, confident that together we will continue to create many more memories and celebrate the richness of our diverse backgrounds.



## नीरजा गोखले ✦ मुख्य समन्वयक (कार्यक्रम)

माझ्या शालेय आयुष्यात माझी कधीच मातृभाषेची आणि मराठी संस्कृतीशी ओळख झाली नाही. हे मुद्दामून झाले नाही पण मी त्याबाबत खूप अनभिज्ञ राहिले . मी सतत इंग्रजी साहित्य व त्याबरोबर निगडित राहिले. याच्यामुळे पाश्चात्य प्रभाव पडतोच, तो टाळू शकत नाही. कॉलेजमध्ये आल्यावर मराठी वाङ्मय मंडळाचा अर्ज पाहिल्यावर मला त्यात सहभागी व्हावेसे वाटले. आजपर्यंत मी जे केले नव्हते त्याचा प्रयास मी करत गेले. विविध कार्यक्रमातून मी खूप शिकत गेले आणि नाट्य विभागातून लिहिण्याची व काम करण्याची मला संधी मिळाली. इथे मला माझ्या भाषेबरोबर खऱ्या अर्थाने नाळ जोडण्याची संधी मिळाली. आपल्या मातीशी व संस्कृतीशी मला नव्याने ओळख करता आली.

म. वा. म. विविध कार्यक्रमातून मराठी भाषेचे संवर्धन व आपली संस्कृती लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी कार्यरत असते. इथे आपल्याला एक अलौकिक संगम पाहता येतो - कलागुणांचा, वैविध्यपूर्ण विचारांचा, कलावंताचा व त्यांच्या उत्साहाचा, त्याचबरोबर आधारस्तंभ व्यवस्थापन विभागाचा. याच सर्व घटकांमुळे एक देखणा कार्यक्रम फुलत जातो. कोर समितीचा भाग होऊन मला १०० वर्षांच्या वारश्याचा भाग होता आला आणि कार्यात हातभार लावता आला, याचा मला अभिमान आहे.



## सार्थक अमृतकर ✦ मुख्य समन्वयक (व्यवस्थापन)

संगम म्हणजे एकत्र येणे व वेध अर्थात शोध घेणे, या दोन कल्पना परस्पर संबंधित आहेत. नवनिर्मिती तेव्हाच घडू शकते जेव्हा विविध घटक एकत्र येतात. हे मिलन जर सर्जनशीलता व नवनिर्मितीचे असले तर ते आपल्या समाजासाठी नक्कीच लाभदायक ठरते. या नवनिर्मित गोष्टीचा शोध घेतला, तर त्या मागचे गूढ असते ते म्हणजे मिलन- गोष्टीचे, माणसांचे, घटकांचे. असाच एक उल्लेखनीय संगम दिसून येतो आमच्या मराठी वाङ्मय मंडळात.

म. वा. मं. आणि त्याचा प्रत्येक कार्यक्रम हा विविध अनुभवांचा, माणसांचा, आठवणींचा आणि मैत्रीचा एक अलौकिक संगम असतो. मराठी वाङ्मय मंडळाच्या कोर कमिटीत मुख्य समन्वयक (व्यवस्थापन) म्हणून काम करत असल्यामुळे मला याचा अनुभव फार जवळून घेता आला. विविध अनुभवांचा आणि संस्थांचा संगम म्हणजे माझे महाविद्यालय आहे, पण आमचे मंडळ मात्र सर्वांचेच प्रिय आहे. हे मंडळ असे एक ठिकाण आहे जिथे एकमेकांपासून भिन्न असलेल्या व्यक्ति भेटतात. याच सर्व सदस्यांच्या साथीने पार पडणारे आमचे सांस्कृतिक कार्यक्रम, माझ्या खास आठवणीत राहतील. विविध विभाग एकत्र येऊन, एक अद्भुत निर्मिती घडवतात जी आम्हालाच नव्हे तर प्रेक्षकांना आणि भाग घेणाऱ्या सर्वांनाच एक वेगळा आनंद देऊन जाते.

मुख्य समन्वयक असल्यामुळे, सर्वांना एकत्र आणणे, त्यांच्यामध्ये समन्वय साधणे हे कठीण असले तरी कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडल्यावर त्यातून मिळणारे समाधान वेगळेच असते. कार्यक्रमाचे आयोजन करणे, सदस्यांसोबत ओळख निर्माण करणे आणि विविध व्यक्तिंना एकत्र आणणे हा माझ्यासाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला आहे. सर्व सदस्यांचा सहभाग असल्यामुळे कार्यक्रमाचे आयोजन सुसंपन्न होते.

म्हणूनच विविधतेत एकता दर्शवणारे आमचे हे मंडळ नात्यांचा, अनुभवांचा, क्रियांचा, कलांचा एक अनोखा संगम आहे असे म्हणणे योग्य ठरेल. मला या मंडळाचा एक महत्वाचा भाग होण्याची संधी मिळाली, याचे सार्थक वाटते. हा संगम माझा महाविद्यालयीन जीवनातील सर्वात सुंदर अनुभव आहे असे मला वाटते. एकमेकांसाठी समर्पित होऊन काम करणं, सर्वांना समजून घेणं आणि एखादी निर्मिती सादर करणं हा प्रवास कितीही खडतर असला तरी माझ्यासाठी कायमच एक आनंददायी आठवण राहील. मंडळाने मला दिली ती नवीन नाती, अनुभव आणि एक वेगळा दृष्टीकोन ज्यामुळे माझे जीवन अधिकाधिक सकारात्मक आणि प्रसन्न झाले आहे.

# प्राचार्यांचे मनोगत



## डॉ.राजेंद्र शिंदे

प्राचार्य, संत झेवियर्स महाविद्यालय, मुंबई.

**1. आपल्या मंडळाचा वार्षिक अंक पखरण, याचा ह्या वर्षीचा मुख्य विषय आहे संगम. आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून तुम्हाला आपल्या कॉलेजमध्ये कुठल्या प्रकारचा संगम दिसून येतो?**

सर्वप्रथम तुमचा मुख्य विषय 'संगम' हा खूप चांगला आहे आणि त्याबद्दल अभिनंदन. झेवियर्स एक cosmopolitian कॉलेज म्हणून ओळखलं जातं. त्याचं कारण असं आहे की भारतातल्या सगळ्या प्रदेशांमधून आपल्याकडे मुलं येतात. काल परवा जे वोटर रेजिस्ट्रेशनचं कार्य चालू होतं, त्या माणसांनी मला जाता-जाता सांगितलं, “कुठून कुठून मुलं येतात तुमच्याकडे!” मिझोराम, इंफाळ, केरळ, कोची, तामिळ नाडू अशी बरीच नावं घेतली. तर हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे की आपल्याकडे तेवढी diversity उपलब्ध आहे. त्यामुळे इतर मुलांच्या आणि आपल्या संस्कृतीचा संगम होतो. I would say it’s a melting pot किंवा fruit salad - प्रत्येक प्रकारचं फळ त्यात आहे आणि प्रत्येकाची वेगळी अशी चवसुद्धा आहे. सगळ्या प्रदेशातली मुलं त्यांची संस्कृती घेऊन येतात. त्यामुळे संस्कृतीची देवाण-घेवाण होते. तसेच आपल्याकडच्या शिक्षकांचासुद्धा संगम दिसून येतो. सगळ्या धर्मांचा संगम आहे. जरी Christian कॉलेज असलं तरी फक्त नियमाप्रमाणे ५० टक्के reservation असावे म्हणून आहे, उरलेले ५० टक्के विद्यार्थी सगळ्या धर्मांचे आहेत. त्यामुळे धार्मिक संगम आहे, सांस्कृतिक संगम आहे तसेच भाषिक संगम देखील आहे. त्यामुळे आपण बघायला गेलं तर आपल्या कॉलेजमध्ये प्रत्येक ठिकाणी आपल्याला संगम सापडेल.

**2. आज पर्यंत म. वा. मं.च्या यशामागे बऱ्याच जणांचा मोलाचा वाटा आहे. तुमच्या मते, अशा कोणकोणत्या प्राध्यापकांचा/लोकांचा संगम गरजेचा होता ज्यामुळे मंडळ शतकपूर्तीचा प्रवास पार पाडू शकले आहे?**

सर्वप्रथम मॅनेजमेंट, शिक्षक आणि विद्यार्थी या तिघांचा संगम आहे. यांच्यातल्या एकाने जरी सहकार्य केलं नाही तर काय होऊ शकतं हे तुम्ही जरी बघितलं नसलं, तरी मी मंडळाच्याच संदर्भात गेल्या काही वर्षांत बघितलं आहे. कधी विद्यार्थी काही करत नसले तर मंडळाचे कार्यक्रम होत नाहीत. किंवा कधी कधी मॅनेजमेंट सहकार्य करत नाही. गेल्या ४०-४५ वर्षात माझ्या अनुभवात तरी असं झालेलं नाही की मॅनेजमेंटने सहकार्य केलं नाही. एक काळ असा होता की सर्व शिक्षकांनी दिवाळी अंकांची लायब्ररी चालू केली होती. मराठी दिवाळी अंक आज काल खूप कमी झाले आहेत, पण त्याकाळी खूप सुंदर दिवाळी अंक निघायचे. दिवाळी आली की सर्वजण फराळाबरोबर दिवाळी अंकसुद्धा आणायचे. त्या काळी आम्हाला मराठी साहित्य वाचायला हवे होते म्हणून १५-२० जणांनी वर्गणी काढली होती. त्यामुळे माझ्या मते तीनही स्टेकहोल्डर्सचा संगम म्हणजेच मॅनेजमेंट, विद्यार्थी आणि शिक्षक, यांच्या सहभागामुळेच मराठी वाङ्मय मंडळ शंभरावं वर्ष पार करू शकलं .

**3. तुम्ही महाविद्यालयाचे प्राचार्य आहात आणि तुम्ही महाविद्यालयाचे नेतृत्व खंबीरपणे करत आला आहात. एक आदर्श नेता कसा असावा याचे तुम्ही उत्तम उदाहरण आहात. मुलांमध्ये असे कुठले गुण असणे गरजेचे आहे, ज्यामुळे ते पुढे जाऊन चांगले नेतृत्व करू शकतील असे तुम्हाला वाटते?**

खरंतर तुम्हाला माझं नेतृत्व हे आदर्श वाटतंय याबद्दल तुमचे आभार मानायला हवेत. सर्वप्रथम मला वाटतं की तुम्ही जे काही कराल, त्याबद्दल तुम्ही passionate असायला हवं, मग तो अभ्यास असो किंवा खेळ असो. आज पार पडलेल्या स्पोर्ट्स डे मध्ये सुद्धा एक मुलगी धावत असताना पडली. पण परत उठून तिने शर्यत पूर्ण केली. शेवटी आली ती, पण तिच्यात ती passion होती. कुठलीही गोष्ट मिळवायची असेल तर मेहनतीशिवाय पर्याय नाही. There are people who are born with a gold spoon in their mouth. पण उरलेल्या ९९% लोकांना मेहनत करावी लागते. याचबरोबर मला वाटतं 'टीम प्लेअर' असणं पण खूप गरजेचं आहे. जर तुम्हाला वाटत असेल की मी एकटाच सगळं करू शकतो किंवा मला सगळं येतं, तर तो माणूस चांगला नेता बनू शकत नाही. तुम्हाला जबाबदारीचे वाटप करता आले पाहिजे. लोकांमधले गुण ओळखून, त्यांना कार्यभार वाटून देता आला पाहिजे. जेव्हा तुम्हाला यश मिळतं, तेव्हा ते फक्त तुमचं नसतं, ते लोकांचं असतं पण अपयश हे तुमचं असतं. सगळ्यांना बरोबर घेऊन तुम्हाला पुढे जाता आलं पाहिजे.या गोष्टी पाळल्या तर नक्कीच तुम्ही समाजात एक चांगला नेता/लीडर होऊ शकता.

**4. आपले महाविद्यालय, मुंबईतील नावाजलेल्या महाविद्यालयांपैकी एक आहे. आपल्या कॉलेजची अशी काय खासियत/ वेगळेपण आहे ज्यामुळे आपल्याला हा नावलौकिक मिळाला आहे?**

अशा कितीतरी गोष्टी आहेत जिथे आपण पहिले आहोत. झेवियर्सकडे इतर कॉलेजेस कायमच एक नेता म्हणून बघत आले आहेत. लोकं अजूनही मला सांगतात की आम्ही कायम तुमची वेबसाईट बघत असतो. तुम्ही काय करताय यावरून मग आम्ही आमचे प्रकल्प ठरवतो. मी जर आपली वेबसाईट वर्षातून १० वेळा बघत असेन, तर ते १०० वेळा बघतात. मुंबईत आपलं पहिलं कॉलेज आहे जे स्वायत्त (ऑटोनॉमस) झालं. त्यानंतर सोमैया झालं, त्यानंतर सात वर्षांनी रुईया झालं. आता एकूण चोपन्न कॉलेजेस आहेत जे ऑटोनॉमस झाले आहेत. ऑनर्स प्रोग्रॅम आपण पहिल्यांदा चालू केला. १९९२-९३ पर्यंत हे कुठेच केलं जात नव्हतं, ही संकल्पना आपलीच होती. मग हळू-हळू इतर कॉलेजेसना ते आवडलं आणि त्यांनी त्याचं नाव जरी बदललं असलं, तरी त्याची मुख्य रचना आपलीच होती. त्याचबरोबर आपला Social Involvement प्रोग्रॅम आला, तो ही वेगळा आहे. आता नवीन शैक्षणिक धोरणानुसार ते संपूर्ण भारतात अनिवार्य केलं आहे पण आपण हे १९९६ पासून करत आलो आहोत. आपल्या कॉलेजचं XRCVC बघूनच नंतर रुईयाने ते चालू केलं. तसेच IMG असो किंवा मल्हार, आधी कुठेच नव्हते. १९७६ च्या वेळेस फक्त एक फेस्टिवल आपल्या आधी होता - मूड इंडिगो. १९७४ मध्ये मल्हार चालू करण्यात आला. हेच आपलं वेगळेपण आहे. त्याचमुळे प्रत्येक क्षेत्रात आपण पहिले येत आलो आहोत.

**5. मराठी वाङ्मय मंडळ या वर्षी १०१व्या वर्षात पदार्पण करत आहे. मंडळाच्या शंभरहून अधिक वर्षांचा प्रवास बघून तुम्हाला काय वाटते? मंडळाने अजून कुठले उपक्रम राबवले पाहिजेत किंवा मंडळाकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?**

माझ्या अपेक्षा बदलल्या आहेत. सर्वप्रथम मंडळाचं अभिनंदन की तुम्ही १०० वर्षे पूर्ण केलीत आणि आता १०१व्या वर्षात पदार्पण करत आहात. मी अगदी सुरुवातीपासून मंडळाशी निगडित आहे, हे माझं बेचाळीसावं वर्ष. FYBscला असताना मी स्टेज वर एका एकांकिकेसाठी एक पात्र साकारलं होतं. त्यावेळेला समिती लहान होती पण आमचा-आमचा एक असा ठसा होता. लांबून लगेच ओळखू यायचं की ही मंडळाची मुलं आहेत कारण आम्ही दणदणीत मराठी बोलायचो. तेव्हा एक कॉमन ब्रेक असायचा. एक अलिखित नियम होता की म.वा.मं. च्या सर्व मुलांनी ब्रेक मध्ये १३ च्या बाहेरच्या आर्चेसमध्ये भेटायचं. तिकडे सगळे गप्पा मारायला यायचे आणि येणाऱ्या जाणाऱ्या सगळ्यांना कळायचं की ही मंडळाची मुलं आहेत. हळू-हळू आता आपण जास्त commercialize करायला लागलो आहोत. मला वाटतं की फक्त सांस्कृतिक कार्यक्रमांशी मर्यादित न राहता त्याला एक अकॅडेमिक स्वरूपसुद्धा दिलं पाहिजे. किती मुलांना वि. वा. शिरवाडकर माहिती आहेत? आता आपल्याला असे कार्यक्रम करायला हवे जे मुलांना त्यांच्या ज्ञानाचे स्मरण करून देतील आणि असं स्मरण करून द्यायला हवं की त्याचं विस्मरण व्हायला नको. त्याचबरोबर तुम्ही कार्यक्रमसुद्धा करा. हल्ली होतंय काय की सगळ्यांना नुसते फेस्टिवल करायचे आहेत. असोसिएशन्स (संस्था/ संघटना) या वर्गाबाहेर तुम्हाला ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी केल्या आहेत. मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना कशासाठी झाली आहे ते लोकं विसरत चालले आहेत. वाङ्मय मंडळ असूनही तुमचा वाङ्मयाशी किती संबंध येतो? किती जणांनी लायब्ररी मध्ये जाऊन मराठी वाङ्मयाची पुस्तकं वाचली आहेत? मराठी वाङ्मय मंडळाने थोडं सक्रिय व्हावं, त्या जुन्या पुस्तकांवरची धूळ झाडावी आणि असे कार्यक्रम करावे ज्यामुळे लोकांमध्ये मराठी साहित्याबद्दल जागृती निर्माण होईल. वि.स.खांडेकर, वि.वा.शिरवाडकर, ना.सी.फडके यांची नावं पण माहित नसतील विद्यार्थ्यांना. मराठी वाङ्मय मंडळाची आणि मराठी वाङ्मयाची फार गत झाली आहे, ती परत तुम्ही जोडायला हवी असं मला वाटतं.

# मंडळाचे आधारस्तंभ



## प्रा.डॉ. प्रशांत रत्नपारखी

शिक्षक समन्वयक,
मराठी वाङ्मय मंडळ
विभाग प्रमुख, जीवशास्त्र

**१. पखरण २०२४ चा ह्या वर्षीचा मुख्य विषय संगम आहे. तुम्ही विज्ञान शाखेचे प्राध्यापक आहात. "संगम" ही संकल्पना तुमच्या विषयामध्ये तुम्हाला कशी आढळून येते?**

मी नेहमी मुलांना सांगत असतो की जीवशास्त्र किंवा जीवशास्त्राशी निगडीत कुठलाही विषय असेल तर तो मूळतःच संगमाच्या आधारावर बांधला गेला आहे आणि आमच्याकडे बघायला गेलं तर भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि अभियांत्रिकी या सगळयांचं कुठेतरी मिलन होतं. त्याच्यामुळे आम्ही एखादा जीवपेशी तयार कसा झाला आहे याची चर्चा करू शकतो. आमचा विषयच संगम ह्या concept वरती बांधला गेला आहे. Unfortunately, काय होतं की मुलं जे शिकतात, ते शिकताना त्यांच्या दृष्टीतून हा संगम कुठेतरी निघून गेलेला असतो. हे सगळ्यात मोठं आव्हान आम्हाला आहे. आता दुसरं एक विचित्र correlation आहे. हे कितपत खरं आहे मला माहित नाही पण कर्करोगचा basis आहे की एखादी पेशी जन्माला येते आणि ठराविक वेळेत तिचा विलय झालाच पाहिजे, हे ठरलेलं आहे. पण कर्करोगामध्ये ही पेशी बंड पुकारते. मग मी त्याच्यामध्ये anthropology शोधतो. त्याच्यामध्ये असं काय कारण आहे ज्यामुळे असं होत असावं? समाजाशी जे एकरूप नाहीत मी त्यांच्याबद्दल विचार करतो की ही व्यक्ती समाजाचे जे काही नियम आहेत किंवा समाजाची बांधणी आहे त्याच्या विरुद्ध का जाते? याचं काही correlation आपल्या पेशींमध्ये आहे का? अशा काहीतरी पद्धतीचा विचार, हा कितपत खरा आहे, मला माहित नाही. पण कुठेतरी तसे विचार प्रवृत्त होतात. म्हणून मला असं वाटतं की कुठल्याही संगमाच्याविना आम्ही जीवशास्त्र हा विषय पुढे नेऊ शकत नाही.

**२. मराठी वाङ्मय मंडळात काम करत असताना आम्ही विद्यार्थी अनुभव संपन्न होत जातो. त्याच प्रकारे तुम्हाला देखील मंडळाची जबाबदारी सांभाळताना आलेले अनुभव किंवा तुमच्या खास आठवणी आम्हाला जाणून घ्यायला आवडतील.**

मी असं म्हणणार नाही की याचवर्षी मी म.वा.मं. बरोबर काम करतोय. मी या न त्या कारणासाठी कुठेतरी मंडळाशी संबंधित असायचोच पण अगदी decision making पर्यंत मी गुंतलो नव्हतो. त्यामुळे हे जसं तुमच्यासाठी नवीन आहे, तसं माझ्यासाठीसुद्धा नवीन आहे. चांगल्या अनुभवांबद्दल बोलाल तर ज्या मुलांच्या संपर्कात मी आता आहे, त्यांच्यात मला चांगलं काम करण्याची एक ओढ दिसते. ही खरंच माझ्यासाठी चांगली गोष्ट आहे आणि आता जो आपला उद्घाटन सोहळा झाला होता, त्याचात आणि त्याच्या आधीच्या तालमींमध्ये मला चांगलाच फरक दिसला. ते माझ्यासाठी good eye opener ठरलं असं मी म्हणेन. मुलं किती चांगलं काम करू शकतात ते मला अगदी face to face म्हणजे प्रत्येक्षात बघता आलं. त्या व्यतिरिक्त अजून खूप शिकायचं आहे. अशा बऱ्याच गोष्टी आहेत ज्या मला माहित नाहीत, अशा काही गोष्टी असू शकतात ज्या मला over the period of time negotiate कराव्या लागतील. I am a little hard headed, थोडा orthodox आहे मी. मला काही गोष्टी एका विशिष्ट पद्धतीने केलेल्या लागतात आणि मला वाटतं एक गोष्ट तर मी अमलात आणली आहे - जे काही आपल्याला करायचं आहे त्याची आपण सरांकडून लिखित स्वरूपात परवानगी घेऊन करत आहोत. जेवढी परवानगी मिळेल तेवढाच आपण आपल्या कामाचा आवाका ठेवायचा, अशा पद्धतीने मी थोडा प्रयत्न करतो. पण मला माहित नाही की ते कधी बदलेल पण हो, मला छान वाटतं आहे की मी मंडळाचा एक भाग आहे.

**३. आपले महाविद्यालय हे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा एक उत्तम संगम म्हणता येईल. जसे विद्यार्थी शिक्षकांकडून कायम शिकत असतात तसेच शिक्षकही विद्यार्थ्यांकडून काही गोष्टी शिकत असतील. तुमच्या आजवरच्या वाटचालीत असे काही अनुभव तुम्हाला आले आहेत का?**

नक्कीच, मला हा अनुभव वारंवार येतो. आमच्या विषयाबद्दल म्हणायचं झालं तर बरीचशी मुलं इतरत्र खूप वाचत असतात आणि कधीकधी असं वाटतं की मला त्याच पातळीचं शालेय/महाविद्यालयीन जीवन परत कधी जगायला मिळेल. कारण तेवढं वाचन आता होत नाही. जेवढं मी आधी करायचो, तेवढं आता नक्कीच होत नाही. पण मुलं जेव्हा वाचतात आणि वर्गात त्या तयारीनिशी येतात तेव्हा खूप बरं वाटतं. असं वाटतं की या पद्धतीनेसुद्धा थोडं काम केलं पाहिजे. इतक्या वर्षांच्या कार्यानंतर, त्याचा एक आवाका ठरत गेला आहे आणि त्यात सातत्य निर्माण झालेलं आहे. मग जेव्हा असे विद्यार्थी येतात, उभे राहतात आणि प्रश्न विचारतात तेव्हा बरं वाटतं. ही एक चांगली गोष्ट मला त्यांच्याकडून नक्कीच शिकायला मिळते.

**४. मराठी वाङ्मयाबद्दल बोलायचे झाले तर, आत्ताच्या पिढीचा कल इंग्रजी भाषेकडे जास्त दिसून येतो. त्यामुळे कुठेतरी मुलांचे मराठीतील लेखन आणि वाचन मागे पडत चालले आहे. तर विद्यार्थ्यांना मराठी भाषेची गोडी लागावी म्हणून शालेय/महाविद्यालयीन स्तरावर काय उपक्रम राबवता येऊ शकतात?**

महाविद्यालयीन स्तरावर करायचं झालं, तर एक तर आपल्या अभ्यासक्रमात चांगल्या दर्जाचे मराठी वाङ्मय समाविष्ट करू शकतो. दुसरी गोष्ट अशी की इतक्या वर्षांचे आपल्यावरती इंग्रजी संस्कृतीचे संस्कार झाले आहेत. ते संस्कार इतक्या मोठ्या प्रमाणात झालेले आहेत की नुसतं घरातूनच नाही तर इतर सगळीकडून आपल्यावर ते होत गेले. त्यामुळे आपला मराठी बाणा आपण सहज उतरवून ठेवलेला आहे. आपल्याला इंग्रजी विचारधारा, इंग्रजी पद्धती, इंग्रजी कपडे सहज आनंद देऊन जातात. मला कोणाशी आवर्जून बोलायचं असेल, तर मी मराठीतच बोलतो. एखाद्या दुकानात जरी गेलो तरी “अहो हे आहे का?” असं बोलूनच मी संभाषण चालू करतो ज्यामुळे मराठी भाषा अजूनही आहे, ती वापरणारी माणसं आहेत आणि ती माणसं अगदी आनंदाने ती भाषा वापरतात हे मला कुठेतरी नमूद करून द्यायचं असतं. सध्या तरी मराठी भाषा ही केवळ एक convenience ची भाषा म्हणून वापरली जात आहे. मंत्रालयात जायचं असेल तर ज्या व्यक्तीला मराठी बोलता येत असेल त्यांने जावे. शासनाचे, विधान सभेचे, विधान परिषदेचे कामकाजसुद्धा मराठीतच होते. मला तरी असं वाटतं की कुठेतरी एक मोठा बदल घडायचा असेल तर ही जी पिढी आहे, ज्यांना आपण महाराष्ट्रीयन माणसं म्हणतो, त्यांनी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्याचा निर्धार केला पाहिजे. जी माणसं मराठी म्हणून जन्माला आलेली आहेत आणि ती स्वतःला मराठी मानून घेतात, त्यांनी तो प्रयत्न करायला पाहिजे. ज्यांच्याकडून चुका झालेल्या आहेत त्यांनी त्या सुधाराव्यात. लोकांना ही सहज रित्या किंवा कुठलाही जाणीवपूर्वक पद्धतीने हे आत्मसात करता आले तर नक्कीच मोठा बदल घडू शकतो.

**५. मराठी वाङ्मय मंडळ या वर्षी १०१व्या वर्षात पदार्पण करत आहे. मंडळाच्या शंभरहून अधिक वर्षांचा प्रवास बघून तुम्हाला काय वाटते? मंडळाने अजून कुठले उपक्रम राबवले पाहिजेत किंवा मंडळाकडून तुमच्या अपेक्षा काय आहेत?**

बघायला गेलं तर हे मंडळ स्वतःच्या पायावर उभे राहून वाढलेलं आहे. नक्कीच त्याला भरपूर मदत केली गेली, पण स्वतःच्या कर्तृत्वावर आपण इथपर्यंत पोहोचलो आहोत. आता याच्यामध्ये नवीन काय करू शकतो तर सध्या आपल्याकडे जे मराठी वाङ्मय/साहित्य उपलब्ध आहे, ते पण मुलांपर्यंत जास्त जास्तीत कसं पोहोचवू शकू यासाठीचे प्रयत्न करणं गरजेचं आहे. मी देखील मराठी साहित्य खूप वाचलेलं नाही, मी पण काही गोष्टी ऐकल्या आहेत, काही गोष्टी हलक्या स्वरूपात वाचल्या आहेत. खरंतर माझ्या वयाच्या व्यक्तीने सखोल वाचायला हवं परंतु, माझं तेवढं मराठीत वाचन होत नाही. पण यानंतर मंडळाच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून किंवा नावाजलेल्या व्यक्तींशी संवाद साधून या गोष्टी आपण मुलांपर्यंत पोहोचवल्या तर मला वाटतं हे बीज नक्कीच रुजू होईल. नुसतं मराठी गौरव गीत गाऊन काही होणार नाही. आता मुलांची परीक्षा, मुलांचे इतर काही कार्यक्रम असतात कॉलेजमध्ये, ते तेवढेच महत्त्वाचे असतात. ते सांभाळून जे काही सातत्याने आपल्याला करता येईल त्यासाठी आपण नक्कीच प्रयत्न केले पाहिजेत ज्यामुळे आपल्याला जे साध्य करायचे आहे ते आपण नक्कीच करू शकू.

# एक अलौकिक संवाद



## दिलीप प्रभावळकर ✦ अभिनेता, दिग्दर्शक लेखक, नाटककार

**प्रश्न १) 'हसवाफसवी' हे नाटक तुमच्या कारकिर्दीतील एक milestone म्हणता येईल ज्यात तुम्ही सहा विविध भूमिकांचा सुरेख संगम साधलात. ही किमया तुम्ही कशी घडवून आणलीत - एक लेखक म्हणून आणि एक अभिनेता म्हणून?**

हसवाफसवीच्या आधी मला विविध प्रकारच्या भूमिका सादर करायला मिळाल्या. मग माझ्या डोक्यात असं आलं की एकाच नाटकात variety का आणू नये? हसवाफसवी हे नाटक माझ्यातल्या लेखकाने, माझ्यातील नटासाठी लिहिलेलं नाटक आहे. मला एकमेकांशी काहीही संबंध नसलेल्या भूमिका करायच्या होत्या. या नाटकात आधी चिमणराव येतो, मग वांटुंग पिन पिन, मग नाना कोंबडीवाला, दीप्ती प्रभावळकर पाटील, बॉबी इत्यादी भूमिका होत्या. मग प्रश्न पडला की या सर्वांना join कसं करायचं? असं नाटक लिहीत नाहीत कधीही पण मी ते लिहिलं आणि तो मी एक प्रयोग मानीन. असं वाटत होतं की हे accept कसं करतील लोक? पण त्यांनी ते केलं आणि ते नाटक सुपरहिट झालं. सगळी मोठी-मोठी लोकं नाटक बघायला येऊन गेली - पु. ल. देशपांडे, पं. भीमसेन जोशी, विजय तेंडुलकर, अगदी सुनील गावस्करही येऊन गेला. पहिले प्रयोग मी college मध्ये केले. मग आमचे manager म्हणाले की आपण तिकीट विक्रीचा प्रयोग लाऊया पुण्याला आणि त्याचे चांगले booking झाले. मला वाटलं fluke असेल पण नंतर houseful shows होऊ लागले. प्रत्येक पात्राची style वेगळी आहे आणि त्याचं वेगळेपण दाखवण्याचा खूप प्रयत्न केला, खूप rehearsals केल्या गेल्या.जवळजवळ साडे सातशे प्रयोग केले. त्यानंतर परदेश दौरा केला. त्यानंतर मी ते थांबवायचं ठरवलं. People should ask you why and not when. दरवेळी मी हा formula वापरत आलोय की प्रेक्षकांनी प्रयोग कधी थांबवणार हे विचारण्याआधी थांबायचं. गंगाधर टिपरेच्या बाबतीतसुद्धा तसंच केलं. पण हसवाफसवीला खूप response मिळाला.

**प्रश्न २) अभिनयासोबत तुम्ही उत्तम लेखकही आहात आणि चांगले लेखन करू शकता याची जाणीव तुम्हाला कधी झाली?**

खरंतर दोन्ही गोष्टींची सुरुवात एकत्रच झाली असावी. It is an urge to express yourself, स्वतःला व्यक्त करण्याची उर्मी प्रत्येकात वेगवेळ्या पद्धतीने असते. ती प्रेरणा माझ्यात होती की आपण काहीतरी लिहून बघूया. कधी ती उर्मी कागदावर यायची - एक लेखक म्हणून, तर कधी stage वर प्रेक्षकांपुढे. लोकांना surprise करता यायला हवं असं मला वाटायचं. असं म्हणतात की अभिनयात पुढे जाणारे लोक लहानपणापासून आगाऊ असतात किंवा extrovert असतात. तसं माझं नव्हतं, मी shy आहे. पण तरीही लोकांना surprise करावसं वाटायचं. खरंतर माझी personality non-actor ची आहे, खूप neutral आहे. त्यामुळे कदाचीत हा softness जास्ती उपयोगी पडत असावा. माझी personality strong, handsome अशी नाही. त्यामुळे कदाचित मला transform करायला सोपं जात असावं.

**प्रश्न ३) तुमच्या लोकप्रिय पुस्तकांमधील एक म्हणजे 'बोक्या सातबंडे' ज्यात तुम्ही एका लहान मुलाचे भावविश्व दर्शवले. हा बोक्या तुम्हाला कसा सापडला/या पात्राची कल्पना कशी सुचली?**

जसा मी दिग्दर्शकाचा नट आहे, तसाच माझ्यातील लेखक हा संपादक किंवा प्रकाशकाने घडवला आहे. बोक्या सातबंडे हा पुस्तक रूपात नव्हता आधी. त्याच्या श्रुतिका (radio plays) होत्या. त्यासाठी मला लिहायला लावलं गेलं. त्यावेळी बाल दरबार म्हणून कार्यक्रम असायचा. त्याचे निर्माते - माधव कुलकर्णी त्यांनी मला मुलांसाठी character लिहायला सांगितलं. त्यावेळी मी busy असल्यामुळे, मला त्यातून सुटायचं होतं. म्हणून Television च्या जमान्यात radio plays का करताय? असं मी त्यांना म्हणालो पण त्यांनी मला दम भरला. खूप विचार करून सध्याच्या काळातील एका cooperative housing society (सहनिवास) अशा वातावरणातील, आठ ते नऊ वर्षांचं पात्र तयार केलं. त्याच्या बापाचा role मी करायचो आणि त्याला खूप यश मिळालं. लोकांची खूप पत्रे मिळाली. राजहंस प्रकाशनाचे दिलीप माजगांवकर यांनी मला श्रुतिकांच्या कथा करायला सांगितल्या. मग त्या श्रुतिकांवर आधारित गोष्टी रचल्या गेल्या. त्यावेळी माझा मुलगा त्या वयाचा असल्यामुळे मला मुलांची मानसिकता काय असते त्याची समज होती. मुलांच्या बुद्धीला, कल्पनाशक्तीला चालना मिळेल अशा गोष्टी रचल्या. या पुस्तकाचे तीन भाग झाले. गंमत म्हणजे आता तेवीसाव्वी आवृत्ती चालू आहे ज्यातील दहा भाग मी स्वतः लिहिले. मुद्दा हा की आधी श्रुतिका, मग पुस्तक, मग त्याची serial दोनदा आली, मग cinema आणि आता storytel वर त्याच्या audiobooks आल्या आहेत ज्या मी record केल्या. मला असं वाटतं की माझ्यासारखं माझं पात्रसुद्धा वेगवेगळ्या माध्यमात फिरलं.

**प्रश्न ४) 'चूक भूल द्यावी घ्यावी' ही प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य करणारी, विशेतः आमच्या पिढीने पाहिलेली तुमची मालिका. या मालिकेविषयीच्या काही गोड आठवणी, गमतीदार किस्से आम्हाला ऐकायला आवडतील.**

'चुक भूल द्यावी घ्यावी' आधी एकांकिका होती. त्यानंतर त्याचं मी नाटक केलं. त्या कथासुत्रावर आधारित त्या मालिकेचे लेखन मधुगंधा कुलकर्णी यांनी केलं. त्याच्यात माझ्याबरोबर सुकन्या कुलकर्णी होती. सगळं credit मधुगंदा कुलकर्णीला जातं. तिने त्या कथेचं स्वरूप लक्षात घेऊन त्यावर serial केली. मुळात ते नाटक/एकांकिका ही दूरदर्शन वर केली होती. हे पण विविध माध्यमात फिरलं. या मालिकेमुळे घरोघरी पोहोचण्याचा अनुभव मला पुन्हा आला.

**प्रश्न ५) हल्ली खूप कमी दर्जेदार मराठी मालिका प्रेक्षकांना पाहायला मिळतात. काही मालिका वर्षानुवर्षे चालतात ज्यामुळे त्याचा दर्जा सूमार होतो आणि प्रेक्षकांची अभिरुची बदलत जाते. मराठी साहित्यावर आधारित चांगल्या मालिका प्रेक्षकांच्या भेटीस येत नाहीत. याबद्दल तुमचे काय मत आहे?**

मला स्वतःला sponsored serials हा प्रकार फार नाही आवडत. मला नाटक आणि सिनेमा हे जास्त आवडतात. माझी मालिका श्रीयुत गंगाधर टिपरे देखील अशा टप्प्याला थांबवण्यात आली जेव्हा त्याला खूप प्रसिद्धी मिळत होती. लोकं जोपर्यंत 'का' विचारतील तोपर्यंत मालिका करावी. ते कधी बंद करणार असं विचारण्याआधी योग्य वेळेस ती थांबवली पाहिजे असं मला वाटतं. हल्लीच्या serials मध्ये दोन-तीन खलनायक/खलनायिका असतात ज्या कायमच कटकारस्थानं करताना दाखवले जातात. गंगाधर टिपरे ही मालिका फार सरळ आणि satirical होती. त्यात कौटुंबिक नाती कशी टिकवावी हे लोकांना बघायला मिळायचं. त्या मालिकेच्या दरम्यान एका मुलाने मला सांगितलं होतं की आपल्या समाजामध्ये जे घडतं ते ब्याचदा कलाकृतीमध्ये उतरतं पण टिपरे सारख्या कलाकृतीमध्ये दिसणारं चित्र जर समाजामध्ये उतरलं तर मला जास्तं आवडेल. टिपरेमध्ये दाखवलेलं आजोबा आणि नातवामधील गोड नातं, श्यामला सारखी सून इत्यादी गोष्टी अशा होत्या ज्या वयापलीकडे जाऊन लोकांना बांधून ठेवायच्या. पण चिमणराव आणि टिपरे ह्या television वरच्या मालिकांमुळे आम्ही घराघरात पोहोचलो आणि हे characters मला स्वतःला फार आवडतात.

**प्रश्न ६) आपण बघतो की आमची पिढी मराठी लिखाण आणि वाचनापासून दुरावत चालली आहे. तर आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना मराठी लेखन आणि वाचनाकडे आकृष्ट करण्यासाठी तुमच्या मते काय प्रयत्न करावे लागतील?**

मला असं वाटत नाही की वाचन वाढवण्यासाठी फार प्रयत्न करावे लागतात. तुम्ही तुमच्या शिक्षकांना किंवा अशा लोकांना ज्यांना वाचनाची आवड आहे, त्यांच्याकडून कुठली पुस्तके वाचावीत याची माहिती मिळवू शकता. पण वाचन हे केलंच पाहिजे. रोज चार पानं वाचावीत आणि चार ओळी लिहाव्यात (minimum) असं मला वाटतं.

ते लिखाण काहीही असू शकतं - तुमचे विचार, एखाद्या गोष्टीवरची तुमची प्रतिक्रिया, किंवा अगदी diary लिहिणे सुद्धा. ही सवय तुम्ही लावलीत तर जास्तीत जास्त फायदा होईल. मग तुम्हाला वाचनाची सवय लागेल. प्रत्येकाला guide करणारी माणसं खूप भेटतील. कुठल्याही क्षेत्रात गेलात तरी वाचनाचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. मला देखील एक नट म्हणून, एक लेखक म्हणून खूप झाला आहे. तुमच्या अंगी ज्या कला असतात त्यांचा संबंध एकमेकांशी नक्कीच येतो आणि त्यांचा विकास करायचा असेल तर वाचन हे महत्त्वाचं आहे. बघा, जमलं तर नोंदी करा, मनातले विचार मांडा!

**प्रश्न ७) मराठीत विविध बोली भाषा आहेत. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये प्रयोग करताना तिकडच्या प्रेक्षकांच्या काय प्रतिक्रिया मिळाल्या?**

इतका फरक नाही पडत. आपण जर केरळला गेलो तर भाषेचा फरक पडेल पण मला नाही वाटत महाराष्ट्रात त्याचा इतका फरक जाणवेल. हसवाफसवी हे नाटक मी महाराष्ट्रात सगळीकडे सादर केलं, विदर्भामध्ये, कोकणामध्ये. सगळीकडे तसाच response मिळाला. काही शब्दांचा फरक पडू शकतो, पण मराठी भाषेची मजा तशीच राहते. मी ऐकलं होतं की वस्त्रहरण हे मालवणी नाटक, पुण्यामध्ये प्रयोग करताना मराठीत केलं जायचं. पण मराठी भाषा ही महाराष्ट्रात सगळीकडे समजली जाते. सिनेमे आणि मालिकासुद्धा बहुतेक वेळा विदर्भातल्या दाखवल्या जातात पण त्या आपल्याला कळतात. उलट भाषेचे इतके प्रकार बघून गंमत वाटते.

**प्रश्न ८) आपण बघतो की दक्षिण सिनेसृष्टी आज जगभरात प्रसिद्ध होत आहे. तुमच्या मते, आपल्याला मराठी चित्रपटांचा अशा स्तरावर दबदबा का पहायला मिळत नाही?**

मी यातला expert नव्हे, मी कलाकार आहे. त्यामुळे मला त्याचं गणित माहित नाही. आर्थिक कारणं असू शकतात, आपलं मार्केटिंग कमी पडत असेल. कारण आपल्याकडे content/material खूप चांगलं असतं. ते implement करणारे directors सुद्धा आहेत. त्या व्यतिरिक्त इतर यंत्रणा मग ते मार्केटिंग असेल, आर्थिक दृष्ट्या असेल किंवा मुळात दोन industries मधला स्वाभावाचा फरक असेल या गोष्टींमुळे कदाचित असावं ते. पण त्याचा सर्जनशीलतेशी संबंध नाही असं मला वाटतं. Creativity कमी पडते असं नाही. ‘श्वास’ सारखा सिनेमा किंवा ‘हरिश्चंद्राची फॅक्टरी’ हे सिनेमे बजेट wise जरी कमी असले तरी त्यांचं content फार चांगलं होतं. कदाचित आपले प्रेक्षकच इथल्या कलाकृती बघण्यात कमी पडत असतील, मला माहित नाही. मी एका तेलुगू सिनेमामध्ये काम केलं होतं. तेलुगू industry खूप श्रीमंत आहे. त्यांची लोकसंख्या महाराष्ट्रापेक्षा कमी असूनही ती एकूणच श्रीमंत इंडस्ट्री आहे. यामागचं कारण म्हणजे सगळी लोकं जाऊन तेलुगू सिनेमे बघतात. प्रेक्षकांनी ठरवून चित्रपट बघणं, त्याला response देणं हे झालं तर आणखी चांगलं काम करायला अभिनेते प्रेरित होतील.

**प्रश्न ९) तुमचा आत्ताच्या काळातील आवडता अभिनेता/अभिनेत्री कोण?**

एकच नाहीये, मला तसे बरेच लोक आवडतात. मी खूप हिंदी सिनेमे नाही केले आहेत पण माझ्या आवडत्या नटांबरोबर मला काम करायला मिळालं. नासिरुद्दीन शाह बरोबर मी ‘एन्काऊंटर’ हा सिनेमा केला, अमिताभ बच्चन बरोबर मी ‘सरकार राज’ म्हणून सिनेमा केला. त्यात मी अमिताभ बच्चनचा राजकीय गुरु झालो होतो. त्यानिमित्ताने मला त्यांची अभिनयाकडे बघण्याची दृष्टी कळली आणि एकूणच सगळं जवळून अनुभवता आलं. परेश रावळ, ओम पुरी, संजय दत्त, शाहरुख खान यांच्यासोबत देखील मला काम करण्याची संधी मिळाली. तसेच मराठीमध्ये सुद्धा विक्रम गोखले यांच्या सोबत 'आप्पा आणि बाप्पा' नावाचं नाटक केलं होतं. त्याचे जवळ-जवळ २०० प्रयोग केले आम्ही. त्यामुळे दुसऱ्या नटाला, त्याच्या कार्याला जवळून बघता येतं. एक प्रकारची देवाण-घेवाण होत असते. मी माझा पहिला सिनेमा अशोक सराफ यांच्याबरोबर केला होता. त्याकाळी सराफ एक establish झालेला नट होता. तर मला अशा नटांसोबत काम करण्याची संधी मिळाली आणि सगळेच चांगले आहेत. प्रत्येकाचे वेगवेगळे गुण आहेत आणि जर तुम्ही मोकळेपणे इतरांकडे बघायला लागलात तर खूप काही शिकायला मिळतं. मला असं वाटतं की अशा वातावरणात काम करताना तुमची adaptability चांगली हवी. तुम्ही वेगळ्या माध्यमांमध्ये स्वतःला कसं adjust करू शकता ते महत्त्वाचं. स्टेजवर तुम्ही लोकांपासून लांब असता, स्क्रीन वर कॅमेरा तुमच्या अगदी जवळ असतो. त्यामुळे एक्स्प्रेशन किती लाऊड द्यायचे, तुमचं projection पहिल्या रांगेतल्या लोकांना जास्त वाटणार नाही पण तरी शेवटच्या रांगेपर्यंत पोहोचेल हे शिकायला लागतं. स्वतःला जागृत ठेवलंत, परिस्थितीनुसार स्वतःला adjust केलंत तर तुम्ही कुठेही नवखे वाटत नाहीत. तुम्ही पटकन ती गोष्ट grasp करू शकता. त्यामुळे शिकणं हे जास्त महत्वाचं. तुम्ही कितीही मोठे झालात, तरी there is always something to learn. ती शिकण्याची उत्सुकता हवी.

**प्रश्न १०) तुम्हाला कोण जास्त आवडतं- दिलीप प्रभावळकर एक नट की दिलीप प्रभावळकर एक अभिनेता?**

अगदी खरं सांगायचं तर मला लेखक म्हणून मी जास्त आवडतो. अवॉर्ड्स मला खूप मिळाले - गांधींच्या रोलसाठी मला नॅशनल अवॉर्ड मिळाला. पण बोक्या सातबंडेसाठी जेव्हा मला साहित्य अकॅडेमी पुरस्कार मिळाला, तेव्हा मला ते जास्त आवडलं. जेव्हा तुम्ही साहित्य लिहिता, तेव्हा तुम्ही एकटे असता पण अभिनय हे टीम वर्क असतं. त्यामुळे मला समाधान देणारं हे लेखनच. अभिनयाचासुद्धा आनंद होतोच, तुम्ही लोकांना हसवता रडवता, त्यांच्या भावनांशी खेळता; त्यात एक विलक्षण थरार आहे. पण मला स्वतःला वाटतं की मला जास्त समाधान लेखनाने दिलं. त्यात तुमचे तुम्ही असता, तुमचं एक विश्व तयार करता आणि त्यातून एक निर्मिती करता. बोक्याने मला खूप बाल वाचक मिळवून दिले. बोक्याची सुरुवात रेडिओपासून झाली, त्यानंतर पुस्तकं, सिरीयल, सिनेमा आणि आता परत ऑडिओ बुक्स आली आहेत. मला लेखनातूनच जास्त आनंद मिळतो.

# वार्षिक अहवाल

**१.महाराष्ट्र दिन**

नवीन वर्षातील मंडळाचा पहिला कार्यक्रम म्हणजे महाराष्ट्र दिन, १ मे २०२३ रोजी साजरा करण्यात आला. महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती आणि त्याला लाभलेला ऐतिहासिक वारसा दर्शवणारी कलाकृती प्रस्तुत करण्यात आली. नृत्य विभागाने पारंपरिक गोंधळ सादर केला आणि संगीत विभागाने त्यांच्या सुरेल प्रस्तुतीकरणातून महाराष्ट्राचे वैभव अधोरेखित केले. त्याचबरोबर आपल्याला आपल्या राज्याची नव्याने ओळख करून देणारे एक नाटक सादर करण्यात आले. कार्यक्रमात मुख्य कार्यकारिणी २०२३-२४ ची ओळख करून देण्यात आली आणि अभिमान गीताने कार्यक्रम संपन्न झाला.

**२. शिवराज्याभिषेक दिन**

६ जून रोजी 'अरुणोदय स्वराज्याचा' - ह्या शिवराज्याभिषेक दिनाचा सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, निसर्ग मित्र पुरस्कारप्राप्त, श्री. जगदीश गजानन धानमेहेर होते. शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे एक पस्तुतीकरण करण्यात आले. मावळ्यांचे व महाराजांचे असलेले घनिष्ट नाते उलगडणारे एक नाट्य प्रस्तुरीकरण करण्यात आले."इतिहास हा उघड्या डोळ्याने वाचायचा असतो व किल्ला मात्र बंद डोळ्यांनी अनुभवायचा असतो" असा मौल्यवान संदेश जगदीश सरांनी कार्यक्रमाच्या शेवटी दिला. कार्यक्रमात म.वा.मं. च्या नवीन कार्यकारिणीचा परिचय करून देण्यात आला आणि आभिमान गीताने शिवराज्याभिषेक सोहळ्याची सांगता करण्यात आली.

**३. उद्घाटन सोहळा**

मंडळाचा उदघाटन सोहळा- Inaugural २०२३, १६ सप्टेंबरला पार पडला. या वर्षीच्या सोहळ्याचा मुख्य विषय होता "लख लख चंदेरी : रुपेरी पडद्याची सोनेरी गोष्ट ". मराठी सिनेसृष्टीचा आजवरचा प्रवास तसेच मराठी संस्कृतीचा मराठी चित्रपटांवर असणारा प्रभाव दर्शवण्याचा मंडळाचा प्रयत्न यशस्वीरित्या पार पडला.सिने सृष्टिमध्ये करियर करू इच्छिणाऱ्या सर्वांसाठी content creation workshop म. वा. मं. तर्फे आयोजित करण्यात आले. या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी सोशल मीडिया स्टार -अशितोष गायकवाड आम्हाला लाभले.उदघाटन सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध अभिनेता ललित प्रभाकर, मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत चर्चा करण्याची मंडळाला संधी मिळाली. त्यांचे विचार आणि अनुभव जाणून घेण्याबरोबरच, प्रेक्षकांना त्यांच्यासोबत संवाद साधता आला. मंडळाच्या सदस्यांनी संगीत, साहित्य, नाट्य आणि नृत्य अशा विविध कलांच्या प्रस्तुतीकरणांतून मराठी सिने सृष्टीचे विविध पैलू उलगडले. मराठी चित्रपटांतून दर्शवले जाणारे नवरस, लोकनृत्य, सिने सृष्टीला लाभलेले दिग्गज गायक आणि संगीतकार, विनोदी आणि भयपट यांवर आधारित चित्रपट अशा विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकणारा हा सोहळा ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी मराठी चित्रपट सृष्टीला लाभलेल्या प्रेक्षकांचे मनोगत सांगणारा एकपात्री प्रयोग करण्यात आला.

**४. आमोद**

आमोद २०२४- उलगडूया नाविन्य संस्कृतीचे, हा अतिशय उत्साहात आणि आनंदात पार पडला. ह्या वर्षी मंडळाने मराठी संस्कृतीला समृद्ध करणाऱ्या विविध पैलूंना उलगडण्याचा प्रयास केला. आधुनिकतेबरोबर आपल्या संस्कृतीचे जतन करत,मंडळाने त्यातील दडलेल्या नाविन्याचा वेध घेतला. साहित्य विभागाने महाराष्ट्रातील उत्सव, नृत्य विभागाने महाराष्ट्राचा इतिहास आणि कथा, नाट्य विभागाने खाद्यसंस्कृती, कला विभागाने महाराष्ट्राला लाभलेले निसर्ग सौंदर्य, संगीत विभागाने भक्ती आणि संत परंपरा अशा विविध विषयांचा शोध घेत, मराठी संस्कृती प्रकाशमय केली.

# शिक्षकवृंदाच्या लेखणीतून




प्रा. सना आसिफ शेख
मराठी विभाग प्रमुख
(संत झेवियर्स ज्युनियर आणि सिनियर कॉलेज)


## 'राष्ट्र' संगम

**'संगम'** ...... म्हणताच अनेक शब्द डोळ्यासमोर नाचायला लागले. जसे...मिलन, मिलाप, मेळ, समन्वय, सहवास, सहयोग, संयोग, जोड, मिश्रण, एकता. 'एकता' हा शब्द डोळ्यासमोर येताच, पद्मश्री विनय चंद्र मौदगल्य यांनी लिहिलेले, विविध शाळांमध्ये प्रार्थना आणि राष्ट्रीय सणांना देखील गायल्या जाणाऱ्या गीताचे बोल कानी रुंजी घालायला लागले....

**"हिंद देश के निवासी सभी जन एक है | रंग, रूप, वेश, भाषा चाहे अनेक है |"**

ज्यामध्ये भारताची एकता आणि अखंडतेबाबत सांगितले गेले आहे. तसेच भारतातील सर्व राज्यांच्या भाषांबद्दल देशप्रेम निर्माण करण्याची भावना यामध्ये अंतर्भूत झालेली आहे. भारत म्हटलं की, डोळ्यासमोर उभी राहते ती विविधतेतून एकता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, वसुधैव कुटुंम्बकम.... अशा संकल्पनांनी भरलेले राष्ट्र म्हणजेच आपला इंडिया किंवा भारत किंवा हिंदुस्तान आणि जो लवकरच विकसनशील या मात्रेतून विकसित राष्ट्रांकडे झेपावत आहे आणि हीच ख्याती अगदी परराष्ट्रातही आहे.

सर्व धर्म, पंथ, जात, संस्कृती, प्रथा-परंपरा, भाषा, खानपान यांचा संगम आपल्याला भारतभूमीमध्ये दिसतो. विविध संस्कृतीतील लोक इथे गुण्यागोविंदाने, एकोप्याने अगदी सहज हातात हात धरून एकत्र राहतात. आपल्या संस्कृतीमधील पारंपरिक रीती-रिवाज, साहित्य, आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक देवाण-घेवाण करत असतात. या कळत-नकळत होणाऱ्या देवाण घेवाणीतून, मिलापातून, संगमातूनच आपला भारत देश कणखरपणे, दणकटपणे, मजबुतीने आणि स्वतंत्रतेने आपल्या पायावर भक्कम उभा आहे. हीच तर भारताची खरी ओळख आहे.

एका साध्या गोष्टीचा विचार केला आपण तर ब्रह्म, गॉड, देव, ईश्वर, अल्लाह, वाहेगुरू.... अशा अनेक नावाने आपण परमेश्वराचा धावा करंत असतो. अनेक रूपातून तो प्रकटतो, पण अंती तो ही 'एकच' आहे..... काहींच्या मते, मूर्तीच्या स्वरूपात तर काहींच्या मते 'निराकार' असा. ज्याला कधीच कोणीही पाहिले नाही; पण त्याचे अस्तित्व मात्र जाणवते. आणि त्यानेच या दुनियेची, ब्रम्हांडाची निर्मिती केली हे एक मताने सर्वच मान्य करतात. ॲडम आणि ईव्ह या एका जोडप्याच्या मिलनातून या सुंदर, नयनरम्य धरतीवर मनुष्य वंश बहरला. निराकार ईश्वराच्या वरदहस्ताच्या छत्रछायेखाली असंख्य प्राणी, पशुपक्षी, कीटक, वृक्षवेली, निसर्गसृष्टी आणि सर्वश्रेष्ठ अशा मानवाचीही निर्मिती झाली. त्या मानवाने एकमेकांच्या सहवासाने, समन्वयाने, सहयोगाने एकत्र येऊन अनेक क्षेत्रात प्रचंड प्रगती केली व करतो आहे.

माणसाचे आणि सृष्टीचेही कधीही न संपणारे अव्याहत, आजीवन असे नाते आहे. सृष्टी-मानवाची अस्तित्वासाठीची लढाई, संघर्ष चालू आहे. या द्वंद्व युद्धात खरंतर निसर्ग आणि नियतीच श्रेष्ठ आहे पण माणूसही महत्त्वाकांक्षी असल्याने त्यावर तो मात करून पुन्हा-पुन्हा उभे राहण्याचा प्रयत्न करत असतो. दोघांमध्ये असलेले हे रेशीमबंध विणतच असतो. हे मऊसूत नाते टिकून आहे, ते फक्त आणि फक्त एकमेकांशी असलेल्या सुखद सहवास, समन्वय आणि एकत्रीकरणामुळेच. कारण याच एकत्रीकरणातून, समन्वयातून आपण आपल्या स्वतःचा, कुटुंबाचा, समाजाचा

आणि पर्यायाने राष्ट्राचा विकास करू शकतो. आपल्या जगण्याचा उद्देश व्यक्तीचा विकास (स्व-विकास) असला तरी पर्यायी तो राष्ट्राचाच विकास असतो. म्हणूनच आपल्या शिक्षणाचा मुख्य उद्देश हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातून पर्यायाने राष्ट्राचा विकासच आहे.

पण आज अशा या संगमाला, एकतेला कुठेतरी नजर लागलेली दिसते आहे. समाजातील अप्रिय घटनांनी समाज पोखरला जातोय. माझा देश, माझा समाज, माझे राष्ट्र या ऐवजी मीच श्रेष्ठ, माझीच भाषा श्रेष्ठ, माझाच धर्म श्रेष्ठ, माझेच विचार श्रेष्ठ या आणि अशा व्याख्यांनी, तसेच अनेक अचानक होणाऱ्या बदलांनी आपला समाज, आपले राष्ट्र तिळतिळ तुटतोय. ‘अनेकातून एकता’, ‘हे विश्वची माझे घर’.... या वाक्यांना आता कुठेतरी ग्रहण लागताना दिसते. कोणतेही राष्ट्र मोठे होते, ते लोकांमध्ये असलेल्या विविधतेतील एकतेतून, सौहार्दपूर्ण अनेक गोष्टींमधून चांगल्या निवडून. विविध कलांचा, साहित्याचा, विचारांचा तंत्रज्ञानाचा, परंपरांचा संगम घडवून. स्वतःच्या धर्म, भाषा, पंथ...... या सर्वांचा अभिमान असावा. गर्व नको. अभिमान स्वतःच्या सर्व गोष्टींचा तसेच दुसऱ्यांच्या जाती, धर्म, भाषा, पंथ नि विचारांचाही असावा. तरच ‘सुजलाम - सुफलाम’ भारत आपण टिकवू शकतो. अन्यथा हे हसतं-खेळतं आपलं घर उध्वस्त व्हायला काडीचाही वेळ लागणार नाही...

अल्लामा मुहम्मद इकबाल यांच्या ओळी इथे स्मरतात -

**"सारे जहाँ से अच्छा, हिन्दोस्ताँ हमारा |**
**हम बुलबुलें हैं इसकी, यह गुलिस्ताँ हमारा |”**

हा आपला ‘हिन्दोस्ताँ’ आणि ‘गुलिस्ताँ’ टिकवायचा असेल तर प्रयत्न सर्वांनीच केले पाहिजे. इथे आपल्या शिक्षकांचीही जबाबदारी नक्कीच वाढते. चांगल्या एकतेतून, समन्वयातूनच चांगली प्रगती होते. प्रगतीचे दुसरे रूप म्हणजे विकास होय. पण या प्रगतीनेच जर चुकीचा मार्ग निवडला तर तो अप्रगतीकडे म्हणजेच विध्वंसांकडे घेऊन जाणारा ठरतो. म्हणून संत तुकारामांच्या वचनाप्रमाणे -

**"एकमेका सहाय्य करू,अवघेधरू सुपंथ”**

आपणच एकमेकांच्या साहाय्यातून, समन्वयातून आपली विविधतेतून एकतेची ओळख असलेला भारत देश, इंडिया, हिंदुस्तान हा टिकवू शकतो.

• जश्या दोन वेगवेगळ्या वाहणाऱ्या नद्यांचा **संगम** होतो तिथून पुढे एकीने खळाळत पुढे जातात. कोणत्यातरी गावाचे नशीब पालटवतात. धन-धान्याच्या समृध्दीने खुशहाल जीवन बहाल करतात.
• विविध रंगांच्या **मिलापातून** इंद्रधनुष्य निर्माण होते, जे डोळ्यांना निर्भेळ आनंद देते. मनाला सुखावते. • आभाळातून रिमझिमणाऱ्या पावसाचे आणि धरतीचे **मिलन** होते तेव्हा हिरवेगार पाचुचे शेते बहरतात. विविध रंगीबेरंगी फुलांचे ताटवे सजतात. या फुलांच्या सुगंधाने संपूर्ण सृष्टी रोमांचित होते. थंडगार हवा शरीर मनाला थंडावा, तजेला देते. फुलपाखरांचे थवे फुलाफुलांवर मनसोक्त बागडतात. रत्नजडित पंखांनी संपूर्ण परिसर उजळून टाकतात.
• अक्षरे आणि शब्दांच्या **मिलनातून** विविध काव्य जन्मते. काव्याच्या **जोडीला** सप्तसुरांची साथ दिली तर गीत, कवनांचा जन्म होतो.
• विविध विचारांच्या श्रृंखलेतून कागद आणि पेन-पेन्सिल यांच्या **समन्वयातून** विविध साहित्याची निर्मिती होते.
• सुई आणि रंगीबेरंगी धागांच्या **समन्वयाने** कापडावर जरदारी नक्षी तयार होते.
• कागद आणि विविध रंगांच्या **मिश्रणाने** कुंचल्याच्या साह्याने कागदापासून सुंदर मनोहरी चित्र उमटते. नकळतच अबोल प्रतिकात्मक भाषेची निर्मिती होते. न बोलता - सांगता येणारे अनेक संदेश लोकांपर्यंत पोहोचवता येतात.
• मनातील इच्छा आकांक्षा आणि ध्येय यांना जर कठोर श्रम आणि मेहनतीची **जोड** दिली तर सफलता, प्रसिध्दी आपल्या पायावर लोळण घेते.
• जर पैशाला दानाची जोड दिली तर आपल्या बरोबर सर्वांचीच जीवन आनंदाने जगण्याची उमेद वाढेल. अनेकांच्या चेहेऱ्यावरच्या ‘SMILE’ चे आपण कारण ठरू.
अगदी जाता जाता...लेख संपवता संपवता.... संगमाबाबत एकच...
**आपल्याकडे जे जे आहे त्या सर्व गोष्टीना समाधानाची जोड दिली तर जगातील सर्वात सुखी व्यक्ती आपणच होऊ शकतो.**




## प्रा. डॉ.अपर्णा कुलकर्णी

अर्थशास्त्र विभाग


# पावसातली मुंबई

पावसातली मुंबई
खूप निराळी भासते...
नेहमीची गर्दी आणि गर्मी अंगावर झेलत तिन्ही त्रिकाळ लढत राहणारी,
Perform or perish च्या ओझ्याखाली अहोरात्र झगडणारी मुंबई,
पावसाची झिम्मड सुरू झाली की वेगळीच दिसायला लागते.
गर्द हिरव्या रानातल्या नागिणीने टाकावी तशी मुंबई कात टाकते आणि मग दिसू लागते टवटवीत, सुस्नात!
बेभान, बेफिकीर आणि अल्लड अशी उनाड परकरी पोर बागडावी तशी मुंबई हुंदडते पावसात.
एरवीच्या घामट गर्दीतून मोकळा श्वास घेत,
पावसातली मुंबई अंगावर झेलत राहते उन्मुक्त समुद्रावरचा वारा,
आणि आतून तटतटून आलेलं शांत मन आणि कोंडलेले अश्रू उधळून देते समुद्राच्या लाटालाटात....
तो अखंड बरसणारा श्रावण असो की मृगातला रौद्र पाउसमारा...
मुंबई तरीही चालते, धावत राहते सतत काहीतरी गाठू पहाते... अडखळते, धडपडते, रडते तरीही हसते मग सावरते
पण अशी ही गूढ तरीही मोहक मुंबई....
पावसात मात्र निराळीच भासते
पावसात मात्र निराळीच भासते!




## प्रा. अक्षरा पाठक जाधव

मास मीडिया विभाग


Dear Digital Natives,

'Chill आई, dunzo करूया, आणखी थोडं पनीर आणलं की आपलं होऊन जाईल, कसले एवढे टेन्शन घेते!', ईशान म्हणाला आणि आर्या होतीच त्याची री ओढायला."Bro ही आई ना, उगाच त्रास करून घेते"... Just a click away असे म्हणत delivery आली, राहिलेला स्वयंपाक पार पडला, आईला हे काही नवीन नव्हते, पण ती थोडी पॅनिक झाली होती हे ही खरंच.

हा संवाद खरं तर आता आपल्या बऱ्यापैकी अंगवळणी पडला आहे. Millennial and digital native असा एक वर्ग सर्वत्र आहे आणि त्यांच्यामध्ये हे संवाद सरास घडतात. यामध्ये millennial आणि त्यांच्या थोडं आधी जन्माला आलेली एक पिढी. एका बाजूला नवीन ट्रेंड्स शिकू पाहणारी आणि आत्मसात करणारे मिल्लेनिअल्स तर दुसरीकडे inherent ज्ञान घेऊन confidently वावरणारे DIGITAL NATIVES! मग अशा दोन्ही पिढ्या आपल्याला ज्ञात असलेले आणि शिकून घेतलेलं, जमवून घेत वागणारी माणसे म्हणजे एक प्रकारचा संगम नाही का?

अशा या digital natives ना, ईशान आणि आर्या ज्यांचं प्रातिनिधिक रूप आहे या पिढीला उद्देशून केलेला हा मुक्त संवाद.

1. सगळ्यात पहिले म्हणजे आपला लिंगो - chill म्हंटले की मला आठवते आमच्या लहानपणी खरोखर chill चा अनुभव देणारी कडाक्याची थंडी असायची. पण तुमचे chill म्हणजे थंड, किंवा बहुदा शांत राहू या, हे आता आमच्या पिढीला हळूहळू लक्षात येते आहे.

2. काहीही आणायचं असले की तुम्ही, हातात कायम असलेला फोन घेऊन कुठलं तरी app सांगणार, पण प्रत्यक्ष जाऊन वस्तू आणायची गंमत, अनुभव, भाव हे सगळे तुम्ही miss करता. मान्य आहे आम्हाला की हे खूप सोयीचं आहे, पण कधी कधी वस्तूच्या दुप्पट delivery fee मोजावी लागते किंवा cart मध्ये चुकून राहिलेली वस्तू परत deliver होते. जर return option नसेल तर आम्ही वैतागतो. मग आपल्यात वाद होतो.

3. आमच्या लहानपणी अचानक कुणी पाहुणे मंडळी आली की आई पटकन पिठलं भात, खिचडी कढी पापड, सांडगी मिरची असे करायची. सगळेच खुश व्हायचे. आता मात्र त्याची जागा Swiggy, zomato ने घेतली आहे. आणि हे खूप cool आहे, हे आम्ही पण मानतो, पण त्याची सवय नको ना?

4. फोनपासून आपण कुणीही फार वेळ लांब राहू शकत नाही, अगदी digital detox चा प्लॅन वगैरे असेल तर गोष्ट निराळी. पण सतत फोनमध्ये गुंतून राहिल्याने समोरच्याचे बोलणे पण कधी कधी पोहचत नाही तुमच्यापर्यंत. मग लक्ष नाही म्हणून, किंवा नीट ऐकले नाही म्हणून चिडचिड होते, गैरसमज होतात आणि हे टाळता येण्यासारखे आहे.

आता या सगळ्याची दुसरी बाजू:

कुठल्याही प्रसंगात cool असणारी तुमच्या पिढीनेपण कधीतरी परिस्थिती अनुरूप वागायला हवं हे लक्षात ठेवा. यासाठी आणखी थोडं निरीक्षण आणि सजग असायला हवं.

अगदी ताजा अनुभव घेऊया का, 19 नोव्हेंम्बर 2023, world cup आपणच जिंकणार यात आपण हा एक खेळ आहे, हे कुठेतरी विसरलो का? एक आधीची पिढी जिने आधीही असे प्रसंग अनुभवले आहेत आणि आताच्या पिढीला हार पचवायला कठीण जाते आणि त्याला सामोरं जायला कचरते आहे असा विचार स्टेडियम मधली नीरव शांतता पाहून डोकावून गेला. बरं एकीकडे मॅच चालू असताना social media वर येणारे memes, trolls हे ही तुम्ही बघत असता, मग प्रत्यक्षात या गोष्टीला पण cool राहा ना. तुम्ही overreact झालात असे नाही पण कुठेतरी प्रगल्भता तुमच्या वागण्यात यायला हवी. बाकी आपण इथेही संगमावर आहोतच, पन्नास overs ची मॅच, brand ambassador ते IPL, हे आपण एका सोफ्यावर बसून बघतो.

इतरत्र बघून शिकण्यात खूप मजा आहे. आता हेच पाहा ना, navigation साठी आपण सगळेच गूगल मॅप्स वापरतो, ते खूप सोयीचे आहे. पण त्याचबरोबर त्यावर खूप अवलंबून राहिल्यामुळे आपण प्रवासात कधी बाहेर बघत नाही, लक्ष देत नाही. Navigation शिवाय शोधून काढलेला पत्ता, लक्षात ठेवलेली एखादी खूण, एखादी बिल्डिंग, किंवा एखादी पाटी पण आपल्याला मदत करू शकते. हे सगळे फोनशिवाय सुद्धा शक्य आहे. रस्त्यात दिसणारी माणसे, कडेला बसून विक्री करणारे छोटे मोठे गाडीवाले, हट्ट करणारे एखादे लहान मूल, हळूहळू कमी होत चाललेले सायकल वरून पाव विकणारे पाववाले, 'ए धारवाले' असे ओरडत जाणारे, यांची मदत घेऊनपण पत्ता शोधता येतो. एक दोन शब्द बोलल्यावर त्यांनाही बरं वाटेल आणि तुम्ही माणसे वाचायला शिकाल. यातून संवाद घडेल.

फोन वरून सगळी माहिती काढून खरेदी करणारे तुम्ही, आणि ही माहिती घेऊन प्रत्यक्ष जाऊन, चार दुकाने हिंडून मग वस्तू घेणारे, असे दोन्ही आपापल्या जागी योग्य. पण प्रत्यक्षात जाऊन, वस्तू हातात घेऊन, त्याचा अनुभव घेऊन, विकत घेण्यात एक मजा आहे. यातून परत शिक्षणही आलेच - माणसे, व्यवहार इत्यादी. आपण अलर्ट राहतो, नक्की जे पाहतो आहे तेच घेतो आहे हा एक आत्मविश्वास वाढतो.

अचानक एखाद्या प्रसंगी एकटं राहायची वेळ आली तर, तुम्ही manage करता. हा आत्मविश्वास तुम्ही तुमच्या वागण्यातही दाखवता, मग तुमचं independent, स्मार्ट असणे अर्थात मोठ्या माणसांना सुखावून जाते. थोडे मी करेन, थोडे order करेन आणि राहीन एकटी, मी touch मध्ये राहीन, असं म्हणता हे छानच आहे. पण digitally कनेक्टेड राहत असताना तुम्ही isolated होत नाही ना, हा पण विचार करा.

काही शे मित्र, कित्येक likes, followers यामुळे तुम्ही popular असता पण जर कधी एकटेपणा वाटला, काही

बिकट प्रसंग आला तर हे virtual world आहे याची जाणीव ठेवा. मग अशा वेळी अर्थात आपल्याला खऱ्या लोकांची उणीव भासते. म्हणून संवाद हवा, अगदी काहीही बोला, पण share करा आणि खऱ्या अर्थाने connected रहा. असा ही समन्वय साधता येईल, आणि आपला संगम अभेद्य राहील.

एका प्रकारे तुम्ही नव्या जुन्याचा संगम साधला आहे. तुमच्या बरोबर तुमचे आजी आजोबापण स्मार्ट झाले, अगदी Gpay, UPI, किंवा Amazon पण वापरू लागले. पण हे आजी आबा स्वतः मध्ये एक विद्यापीठ आहेत, त्यांच्या अनुभवामुळे आणि त्यांनी पाहिलेला बदलता काळ हे आपल्याला खूप काही शिकवू शकतात. शेवटी काय, तर millennials आणि digital native हे दोन प्रवाह आहेत, आपापलं जगणं कालसंगत ठेवून प्रवाही राहण्याचा प्रयत्न करत आहेत, आणि हाच तर संगम आहे!

पंधरा सेकंद रील बघत मजा लुटणाऱ्या तुम्हा सगळ्यांना हे खूप जास्त झाले आहे हे मला माहिती आहे, त्यामुळे आता इथेच थांबते.

भेटू परत.
कळावे,
एक millennial




## प्रा. डॉ. भगवती प्रसाद उपाध्याय
हिंदी विभाग प्रमुख


# जैव विविधता एवं सहअस्तित्व

आओ नूतन वर्ष मनाएँ
एक छोटा-सा पौधा लगाएँ
वृक्ष मित्रों का करके स्वागत
धरती पर हरियाली लाएँ
सब जीवों को खुशहाल बनाएँ
आओ नूतन वर्ष मनाएँ !

कर लो 'प्लास्टिक' के फूलों से तौबा
कर लो 'प्लास्टिक' की थैली से तौबा
उपहार दीजिए तो केवल पौधा
उपहार लीजिए तो केवल पौधा
पौधों से हरियाली लाएँ
सब जीवों को खुशहाल बनाएँ
आओ नूतन वर्ष मनाएँ !

घर में तुलसी का पौधा लगाएँ
आँगन को नीम नारियल से हरा बनाएँ
बरगद, पीपल, गूलर जैसे 'ऑक्सीजन' के 'सिलिंडर' उगाएँ
धरती पर हरियाली लाएँ
सब जीवों को खुशहाल बनाएँ
आओ नूतन वर्ष मनाएँ !

हर प्रदेश में हो 'फूलों की घाटी' हर प्रदेश में हो 'शिमला' और 'ऊटी'
हर प्रदेश में 'वृन्दावन' हो
हर प्रदेश में 'सह्याद्रि'!
धरती पर हरियाली लाएँ
सब जीवों को खुशहाल बनाएँ
आओ नूतन वर्ष मनाएँ !

रेगिस्तान में नंदनवन हो
दक्षिण के से चन्दनवन हों
उत्तर-पूर्व सी नदियाँ साफ़ सुथरी
शहरों में नाचे मोर, पपीहा, कोयल बोले
गौरय्या उड़े गाँव के पेड़ों की टहनी टहनी
धरती पर हरियाली लाएँ
सब जीवों को खुशहाल बनाएँ
आओ नूतन वर्ष मनाएँ !

जैव विविधता को हम जानें
'फ्लोरा' और 'फ़ोना' को मानें
अगली पीढ़ी को देकर जाएँ
एक हरा भरा सा जंगल
आने वाली पीढ़ियाँ करेगी उस
जंगल में मंगल
पृथ्वी पर हरियाली लाएँ
सब जीवों को खुशहाल बनाएँ
आओ नूतन वर्ष मनाएँ !

'साइबेरिया' के रंग बिरंगे मेहमान
पक्षियों का उत्सव मनाएँ
'अतिथि देवो भवः' की परंपरा को
चरितार्थ करें,
सबके सपनों को साकार बनाएँ
पृथ्वी पर हरियाली लाएँ
सब जीवों को खुशहाल बनाएँ
आओ नूतन वर्ष मनाएँ !

विविध मार्ग हों एक लक्ष्य हो
एक सूत्र में बंधे सभी हम
स्वच्छ हृदय हो भारत जननी
स्वस्थ रहें भारत के सब जन
हिमगिरि के ऊँचे शिखरों से अंडमान के तटबंधों तक
भारत माता की संतानें अजर-अमर हो युगों-युगों तक।



Dr. Radha Kumar
Associate Professor,
Department of Ancient Indian History,
Culture and Archeology

# ANCIENT INDIAN EDUCATION: A SANGAM OF VIVEKA

The essence of Sangam or confluence has been an innate and integral part of the cultural ethos and heritage of our Ancient Civilization. Sangam, is to celebrate blending, to enhance cohesiveness and to merge thoughts that inspire and rejuvenate life and living.

This process to integrate the human mind to the larger ethos and the essence of living was part of existence. However, it needs to be studied as how this integration was brought about. On studying the sources, the role of education which had the systems in place, set a format where the young seekers were trained to be sensitive to the essence and the ethos of the ecosystem. It was a process that provided them an experience to integrate to understand that they are a small part in this vast magic called creation. The understanding of this aspect was instilled in the young seekers through the process and the method of education.

Learning and the process of education has always occupied a place of pride in the Indian subcontinent. It has always been an integral part of our culture where knowledge was to help the individuals to rise above the monotonous existence and to seek a platitude where each one could factor in a very holistic view of events occurring in one's life. The process of education even then like today was to transmit knowledge, promote social, moral, cultural values, to enhance powers of reasoning and intellect, to bring about sensitivity and cultivate discipline and to set ideals for formulation of civic and political actions. The subjects and the courses that were integrated in the process of learning was to ensure that it cultivates certain values.

The term that was given to knowledge in India was 'Vidya' and it comes from the root called VID (to know). It means knowledge of Science, Folk lore, Education, Scholarship and Philosophy. Typically, the classification of studies was divided into Aniviksiki - Logic, Metaphysics, Dandāniti - The science of Government, Vartta - The science of Practical Arts such as agriculture, commerce and medicine. Manu, adds yet another component and that is Atma vidya.

However, when an attempt like this is made to track the process of the development of education, the basis on which this study is made has to be documented. Here, the entire range of literary and archaeological sources play a very important role to reflect the rich cultural development of this nation. In the literary sources, be it in the writings of Bhasa, Sudraka, Asvagosha, Bhavabhuti, Dāndin, Kalidasa, Kautilya, the Dharmāshastra Literature of the Smritikaras, or the six Vedangas where each one of them explored a particular discipline, or in the Upavedas which are Gandharva-Veda, Dhanur-Veda, Ayur-Veda there is an entire range of subjects that has been studied and classified by these writers.

the development of the cultural heritage be it the Numismatics, Epigraphy, Paintings, Pottery, Sites, Architecture, Sculptures both stone and metal.

When an attempt is made to study and understand the vast array of sources and its implications, the inferences that one can draw is that we were a culture that upheld deep metaphysical values and made a conscious attempt to integrate the same in day-to-day living. There was an attempt to create structures that promoted holistic living aiming at all -round development of the individuals in all facets of socio, economic, religious spheres. Their ethos was to create functioning systems that helped individuals to realize their innate potential which according to the seers was an innate reflection of the supreme cosmic self.

Hence a stroke of a pen, a flourish of a brush or carving of a chisel or the strumming of a mijrab/plectrum was not done to evoke praise but it was to serve as a trigger to enhance deep understanding of the ecosystems and his place in the same. This thought, was the fundamental aspect of the Upanishadic doctrine of the Brahman and Atman discourse which led to the creation of the famous “Mahavakyas” like Tat Tvam asi, Aham Brahmasmi. It led to further deliberations like the Kosha theory and the states of Atman as Visvanara, Taijasa, Prajna and Turiya and to its corresponding states in the Brahman as Virat, Hirnayagarbha, Ishwara and Brahman. This was the central concept in the philosophy of the Upanishads and the metaphysical discussions which brought the unity of the Microcosom and the Macrocosom. The implications of this thought would be the realization of an all-pervading supreme cosmic essence which was omnipotent, omniscient and all pervading. But at the same time, the seer scientists were practical to understand the day-to-day challenges of life and the innumerable problems that daily life brings. Hence, they strove, to create a system that, along with facing the daily trammels of life, the individual could also realize his immense and unlimiting potential within himself. The seers and the Smritikaras realized that if this change has to be ushered, it has to be through a systematic manner which was through education. The subjects, the method of teaching and the environment created an atmosphere of sensitivity and understanding.

To enable this thought, they integrated education as a part of daily life and this was the Asrama system. It was primarily in the Brahmacharya Asrama that the student was exposed to the practical aspect of living while staying in the charanas or the schools. He was addressed as Acharya Kula Vasin and they led a very spartan life. When one documents the hall mark of our culture, it was to portray a certain attitude to life and its problems. There was a certain character and ways of responding to outside influences which reflected a stability of aim and steadfastness of purpose. The training was practically carried out through the Ashrama system. The stage of learning in this phase was called as Brahmacharya ashrama.

The learning, which was a sangam or integration of Literature and Art in this context served as vehicles of culture to develop a critical faculty and a religious sense. It helped in controlling the passions and refining them to sublime emotions and strengthening the will so as to not surrender meek to superficial temptations. This could happen only due to the deep aesthetic engagement of the human spirit. The sources capture this consistent endeavor to synthesize character and vision. Material wealth was undoubtedly given importance but it had to definitely take a process of character. The social scientists of ancient India, knew very clearly that if there was no satisfaction in his inner life it would lead to complete disintegration of society at large.

The method of education was holistic as it tried to integrate all aspects of learning and was

also practical as the subjects taught had a direct relevance to the daily life of the individuals. The purpose of education was for enhancing knowledge and to sensitize the seekers in understanding the world around which became the cause for this multicultural and all-embracing identity. This was Sangam of thoughts, life and living.

The system of education laid the foundation to foster the strength of spirit and the essence of the basic character of holistic understanding which is unique to our subcontinent. It was this constant urge to probe and to ascertain the cause of the world/creation, that in-fact was the driving factor of any discipline. The Acharyas always integrated a philosophical approach alongside the study of the subjects. In the Brahmacharya Asrama, learning and knowledge seeking was a full-time duty for the student who was far away from the cozy environment of home, learning the practical aspects of life while living with the Guru. Education was to make the child humble, responsible, harness the spirit of equality and to be motivated all the time. Immense importance was also given to enhance the relationship between student and Teacher which was an emotional bond. Also, the Acharyas/Gurus occupied a place of respect and were supported by the society. Learning also continued in Universities like Nalanda, Taxila, Vallabhi, Gandhara, Odantpuri. The constant patronage of the kings and merchants propelled the conduct of various academic conferences and assemblies. The development of the Art and Architecture based on stylistic and systematic components also proves the tenacity of the education system. Explicit rules were drawn to portray art and construct structures which we classify into Nagara, Vesara and Dravida styles. All aspects of education mainly merged to improve, maintain and enhance the value systems of the people. It was devoted to enhance the intrinsic individuality and strength of purpose in the mind. The aim of education was also intended to enhance the spirit of equality and mutual respect among people. Further, it instilled responsibility and enhanced sensitivity. It also motivated the people to see the innate ethical essence behind every thought. It fostered all-round acceptance by capturing the innate ethical essence behind every thought which was Indriyānigraha (control of senses), Dhī (intellect), Vidya (learning), Satyā (truthfulness), Akrōdha (absence of anger), Dāya (compassion), Parōpakara (help or service to others) Ahimsa (non-violence).

The education imparted also taught the individual to co-exist with the environment where the ideas of Rña (where the understanding is whatever that is used from nature is a debt and it has to be repaid by correct actions) and Rtā (the eternal cosmic order of the universe where the philosophy was that all energies and forces of nature were interconnected and there was a beautiful symphony in the ways the aspects of nature integrated with each other in a clock work manner, blending with each other in perfect harmony) was understood in a practical manner by their very lifestyle of blending with nature and the natural phenomena. The foundation of Purūshārthas, was also important to the very foundation of the society and the basic ethos of ethics was laid through the education system.

The aim was to surge beyond and reach the final goal or ultimate reality to find out what was the innate essence of life itself. Also, as every student had to learn all the subjects there was an innate respect for all disciplines and all branches of knowledge. The sources also document that the life of the student was very stringent. They laid emphasis on Srāvana - listening to what was taught by the teacher, manana - constant contemplation of the reality and Nidhiyāsana - contemplation on the truth and realizing it. Kautilya further enumerates the following types of study and they are Susrūsha- eagerness to listen to the words of the teacher, Srāvanam - grasping, Grāhanam - apprehension of the words of the teacher, Dharānam - retention, Uhapōha - discussion, Vijñana - full knowledge and Tattvābhinievesha - comprehension of the underlying truth. Teachers were also called as

Yaujanāsatika- one whom students seek from a distance of hundred miles, Upādhyaya- adopted teaching as a profession, Acharaya- who taught the literary sources. Study had to be carried out silently (Manāsa) and loudly (Vācha) There were also prayers for memory to increase the Medha Sākti. We also see that learning inculcates self-reliance, self-respect and self-motivation. The initiation began with the Upanayana samskara after which the student went to the Charana to study. the student had to live with the Vrātas or also called as prescribed discipline hence he was also called as Vratāchari.

The various depts were Agni Sthāna- worship of fire, Brahma Sthāna- Department of Vedic study, Vishnu Sthāna- Department of Political science, Mahendra Sthāna- Department of military science, Sōma Sthāna - Department of Botany, Garuda Sthāna- Department of Transport and conveyances, Kartikeya Sthāna- Military school. The graduation ceremony was called as Samāvartana and the graduate was called a Vidya Sñataka.

To highlight a few subjects that was taught in the charanas- Lekhyākarman (engraving), Sakunirutajñana (interpreting sounds of birds), Ratnāpariksha (appraisal of jewels), Sarvālipi (all the scripts), Vastuvidya (engineering), Sarvādesabhasa (different dialects and languages), Indrājala(magic), Kshtra Vidya (military science), Anvkshiki (dialectics). The education process also brought in character traits like Dhrti (patience), Ksāma(forgiveness), Dāma(self-control), Asteya(non-stealing), Saūcha (cleanliness), Indriyānigraha (control of senses) Dhi (intellect), Vidya (learning) Satya (truthfulness) , Akrōdha (absence of anger),Daya (compassion), Parōpakara (help or service to others) ,Ahimsa (non-violence).

Apart from this, we also see that there are inscriptional evidences of Ghātikas, Agraharas, Mathas, Ashramas and Brahmāpurs served as centres of learning.

Also, we see that Universities like Nālanda, Taxila, Odantpūri, Gandhara also played a very important role in its space. Understanding the process of Ancient Indian Education is important as one can discern the rich knowledge bank and the store house of information we have and had. It will enable us to study the aspects of our cultural ethos in the context of understanding why a Teacher or a Guru is still revered today. The simple answer is that it is a part of an ancient discourse or a tradition which has very authentic.

# पखरण

# विचारांची...

# संगम म्हणजे नक्की काय असतो?




## यशोधन देवधर

द्वितीय वर्ष, कला शाखा


संगम म्हणजे संगम म्हणजे संगम असतो,
समजायचा नव्हे तर कधीतरी अनुभवायचा असतो.
कुठे आणि कसं पेक्षा 'का?' हा प्रश्न विचारायचा असतो,
अनेक अज्ञात घटनांनी रेखाटलेला आलेख बघायचा असतो.

शब्द संक्षिप्त असला जरी, गाभा अजस्त्र आहे
अक्षरंकेवळ दोनच असली, तरी व्यासंग अनंत आहे
ब्रह्मांडापर्यंत विचार पोहोचतात, पण 'संगम' तेवढयापुरता सीमित नाही
नित्यक्रमात संगम घडून येतो, कधी विचार केला असाही?

कधी क्रिकेटचा संगम पहिला का? संपूर्ण देश एकत्र येण्याचा,
राजकीय, सामाजिक भेदभाव विसरून उच्चरवाने घोषणा देण्याचा.
संगम दिसून येतोच की मैत्रीत, तिऱ्हाईत व्यक्ती आणि कुटुंबाचा,
डावपेच कधी न खेळण्याचा आणि डचमळित डाव सावरून देण्याचा!

परिवार देखील एक संगमच की, तीन-चार भिन्न-भन्नाट पिढ्यांचा,
प्रत्येकाच्या वेगळ्या तऱ्हेचा, आणि अडीअडचणीला एक असण्याचा!
मैफिल नव्हे का एक संगम? वादक, वाद्य आणि गवयांचा?
सादरकर्त्यांच्या १०० हरकतींचा, आणि त्याच्या आस्वाद घेणाऱ्या श्रोत्यांचा!

संगम सर्वप्रथम मनामध्ये असावा- सुखांचा, आणि दु:खांचा;
सुखाकडे डोळे लावून बघण्याचा, आणि दु:खाशी शौर्याने झुंजण्याचा
नात्यांमध्ये हि संगम शोधावा- अपरिचय, परिचय आणि साम्य शोधण्याचा,
बिनमर्यादितपणे मिसळण्याचा आणि स्वत:वर घालून घेतलेल्या निर्बंधांचा.

जेव्हा मुंग्यांनी संगम साधल्याशिवाय वारूळ उभं राहत नाही,
निसर्गाचा संगम घडल्याशिवाय पाऊस पडत नाही ,
जेव्हा मनुष्यजातीच्या जन्मच असंख्य संगमांमुळेच जुळून येतो,
तेव्हा त्या दैवी योगायोगाचा आपण फक्त नद्यांच्या पात्रात का पाहतो?

# पान क्र. ३३

स्वप्नांचा संगम असावा वास्तवाशी,
विभिन्नतेचा समानतेशी,
बालिशपणाचा प्रौढत्वाशी, परंपरेचा
नावीन्याशी,
समृद्धीचा साधेपणाशी, उत्तुंगतेचा नम्रतेशी,
स्पष्टवक्तेपणाचा सहनशीलतेची,
सुशिक्षितपणाचा सुसंस्कृतपणाशी.

हेकेखोरपणाचा तडजोडीशी असावा संगम,
कधीकधी आळसाचा हि झोपेशी,
कवितेचा दर्दी रसिकांशी, स्वयंपाकाचा तृप्त
खादाडखाऊंशी,
भाषेचा, तिला जाणणाऱ्यांशी, थोरवीचा,
तिला मानणाऱ्यांशी,
इतिहासाचा, त्याला जगणाऱ्यांशी,
वारशाचा, त्याला जपणाऱ्यांशी!

संगम असावा माणसांमध्ये, विचारांमध्ये
आणि कृतींमध्ये
तेव्हाच तर जमून येतो मेल- जणांमध्ये
आणि मनांमध्ये!
एकजूट व्हायला लागतं तरी काय? एक
विचार आणि एकमत,
प्रत्येक धोरणाची तर ह्याच मुशीतून निघते
यशस्वी प्रत!

संगम दोघांचा असतो, पण उदय तिसऱ्याचा
होतो,
दोन जुने विचार नामशेष होतात, पण तिसरा
कीर्तिवंत ठरतो.
चक्र हे असाच फिरत राहतं, त्यातूनच आपलं
हे विश्व घडतं,
त्याच्या थोडाच अंश आपल्याला कळतो,
म्हणून त्याच्यावर आपलं प्रेम जडतं!

# एक संगम असा ही



अनुष्का प्र. ग. भोसले — द्वितीय वर्ष, कला शाखा



“भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत…” – मी जेव्हा ही प्रतिज्ञा शाळेतील मराठी,
कानडी, मुस्लिम, पारसी, गढवाली, कोकणी, मारवाडी विद्यार्थ्यांना घेतांना ऐकते तेव्हा आपल्या भारत
देशाचा अभिमान वाटतो! कुणाला ही अचंबित करणारा जगप्रसिद्ध 'संगम' म्हणजे आपला भारत देश. 'संगम' या शब्दाला जर कुठला समानार्थी शब्द असेल तर तो आहे आपला भारतीय समाज.

भारतात खाद्यसंस्कृती, पेहराव, भाषा, रीती परंपरा व संस्कार असे अनेक संगम पाहायला मिळतात.
'विविधतेने नटलेल्या' या भारत भूमीमध्ये निराळ्या तऱ्हेचे घटक एक होऊन एक परिपूर्ण व समृद्ध समाज घडवतात.

भिन्न जाती, क्षेत्र व धर्म जरी असलेतरी सर्व भारतीय “आम्ही सारेखवय्ये” म्हणत एक होतात. सर्वप्रथम, भारतीय खाद्य संस्कृतीमध्ये एक साहित्य फार खास आहे, ते म्हणजे आपले मसाले.भारतातील केरळ राज्य जरी 'मासाल्यांचे केंद्र' म्हणून ओळखलं जात असलं, तरी सर्व खाद्य पदार्थांसाठी मसाल्यांचा वापर हा अगदी सर्रास केला जातो. याच मसाल्यांच्या शोधात तर युरोपियनसुद्धा आले होते! 'मसालेदार' असा व आपल्या खाद्य संस्कृतीत स्वतःचे हक्काचे स्थान मिळवलेला पदार्थ म्हणजे बिर्याणी. नवाबांच्या शहरातील लखनवी बिर्याणी, भारतीय तामिळ संस्कृतीची फिशबिर्याणी व पंजाबची तिखट-गोड मखनी पनीर बिर्याणी या सर्व लग्नकार्यात, वाढदिवशी व समारंभात प्रत्येक भारतीय कुटुंबाची पहिली पसंती ठरतात!
भारतात अनेक सण- सोहळे साजरे होत असतात आणि अश्यावेळी गोडाला खास मान आहे! सणवारी भारतीय थाळीत हमखास दिसेल असा पदार्थ म्हणजे खीर.

भौगोलिकरित्या ज्या राज्यात जे पिकतं, त्याचा मिलाप दुधासोबत झाला की तयार होणारा हा प्रकार. दक्षिण भारतातील भात व नारळाच्या दुधाने बनलेला पायसम असो, गोव्याचं साबुदाणायुक्त मनगणे असो अथवा उत्तरेतील मोघलाई छाप असलेली सफरचंदाची खीर असो, तिन्ही मंगलमय दिवशी ताटात आनंदाचं प्रतीक म्हणूनच वाढले जातात! दिवाळीत तर सबंध भारतात वेग- वेगळ्या नावांनी सारखेच पदार्थ बनत असतात. कुठेती शंकरपाळी असते, तर कुठे मुरली किंवा लकडी मिठाई, कुठे करंजी तर कुठे गुझिया, घुगरा नाहीतर करजीकयी! शिवाय, कुठल्या का भावनेनं असो पण दिवाळीत प्रत्येक घरात वावर करणारी सोनपापडी आहेच!

निवारा व अन्नानंतर जर सजीवाला काही लागत असेल तर ते म्हणजे वस्त्र! भारतात पेहरावातसुद्धा एक वेगळाच संगम आढळतो. सध्या सुरू असलेल्या पाश्चात्य फ्यूजन प्रकाराला तोडीस- तोड ठरतील अशी अनेक फ्यूजन्स भारतात आहेत. प्रथमतः स्त्री पेहरावात प्रामुख्याने असणारी साडी. पाच व नऊ मीटर लांब असणारी साडी सगळ्यांनाच माहित असते पण एक निराळं भारतीय संगम आहे आसाम राज्याची मेखला चादर. ही पाश्चात्य स्कर्ट व ओढणी यांसारखी पेहराव पद्धती आहे, ज्यात साडी ही कापडाच्या दोन तुकड्यांपासून नेसली जाते.

पुरुषप्रधान समाज असल्या कारणाने भारतीय पुरुष डोक्यावर परिधान करत असलेलं वस्त्र, हे त्यांच्या प्रतिष्ठेची निशाणी असते. ही प्रतिष्ठा अगदी फेटा, पगडी, साफा, म्हैसूर पेटा, गांधी टोपी, जापी टोपी, नागा टोपी, इत्यादीच्या माध्यमातून दर्शवली जाते. प्रत्येक भारतीय काश्मीरला जाऊन काश्मिरी पेहरावात फोटो नक्कीच काढतो, तसेच नवरात्रीमध्ये कुर्ते,केडिया, चन्या- चोली सर्वांना एकसमान दिसण्यात मदत करतात व हा पेहरावतला संगम जपला जातो!

आज भारतात जरी असंख्य बोली भाषा प्रचलित असल्या, तरी या भाषांचे मूळ संस्कृत भाषेत किंवा अन्य प्राचीन भाषांमध्ये सापडतच! यात उर्दू, फारसी, इंग्रजी भाषांनीसुद्धा एक 'लाजवाब' संगम तयार केलाय. आज जरी हा लेख मराठीत असला तरी आपल्या प्रांतातील व्यांजनांची व पेहरवाची नावेवाचून प्रत्येक जण नक्कीच 'रीलेट' करेल.

आज या घडीला आपल्या देशात जे वैविध्य आहे, त्यामुळे अनेक वाद निर्माण होतात, मतभेद तयार होतात व प्रत्येक गटाला आपल्यावर अन्याय होईल की काय हे भय सतावत असतं. पण आपण कितीही 'वेगळे' असलो तरी आपल्यावर एकाच भारत मातेचे संस्कार झाले आहेत आणि म्हणूनच “माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यातच माझे सौख्य सामावले आहे!” हे आपण सारे ठामपणे म्हणतो.

# आयुष्यावर बोलू काही...



अद्वैत इंगोले
तृतीय वर्ष, विज्ञान शाखा

कधी कधी वाटतं की, आयुष्य जगण्यास जे काही ज्ञात असावं ते सगळ मला कळलं आहे. हे वाचल्यावर मी तुम्हाला फारच Overconfident वाटेन पण आपल्याला सगळ्यांनाच असं कधी तरी वाटलं असेलच असं मी मानतो. वाटतं कधी कधी एखाद्याला जग जिंकल्यासारखा, सारं काही कळल्यासारखं, मग ते कारण कितीही शुल्लक का असेना. पण म्हणतात ना, भिंतींना ही कान असतात. तसं आपल्या आयुष्याला कुठून तरी आपल्या ह्या नवनिर्मित उर्जेची चाहूल लागतेच आणि ते कामाला लागतं, तुमचा गर्व मोडण्याच्या. मग तुम्हाला दिसतो तो धुक्या मागचा महासागर, म्हणूनच मला आयुष्य हे एक संशोधन वाटतं. इतर वेळेला कितीही आळशी असलो तरीही हे मानलच पाहिजे की आपणसुद्धा Columbus सारखे शोधावरच तर निघालोय- आयुष्य जगण्याच्या ! Columbus सारखच आपल्याला जिथे पोहचायचय कदाचित आपण तिथे नाही पोहोचणार, ह्याची जाणीव ठेवुन, लागेल त्या शोधला गोड मानून आनंदी राहणारी लोकं फार कमी असतात.

अहमद फ़राज़ ह्यांचा एक शेर माझ्या फार आवडीचा आहे, ते म्हणतात -

“किसी को घर से निकलते ही मिल गई मंज़िल,
कोई हमारी तरह उम्र भर सफ़र में रहा”.

म्हणून वाटतं आयुष्य हे आपल्या एकट्याचं संशोधन आहे, आणि समाधानी आयुष्यासाठी ते करणं गरजेचं असावं बहुदा, मला माहित नाही. पण माझं मत आहे की आलोय इथे तर करायला काय हरकत आहे, ह्या संशोधनातून जे प्रयोग कायम होतील, त्यांनाच परत परत नवीन नवीन variable टाकून output घेत राहणे हेच बहुदा आयुष्य असावं. आयुष्य मला रसायन वाटतं. गणित तज्ञाला गणित, क्रिकेटरला बाउन्सर वाटत असावं. तर एका कवीला असं एक काव्य वाटतं जे तो आयुष्यभर लिहिण्याचा प्रयत्न करतो, असं काव्य ज्याचा शब्द आणि शब्द त्या कवीच्या आयुष्यापासून दूर करणे जणू अशक्य, असं काव्य ज्यात कवी अमर होतो पण कायमचा अडकूनही पडतो.

अर्थात जे काही या जगात गूढ आहे पण शाश्वत आहे, डोळ्यांनी दिसतं पण मोजता येत नाही आणि फक्त आपण आहोत या जाणिवेवर टिकून आहे ते आयुष्यच तर आहे ना? एक मानव प्रजाती म्हणून जे काही आपण शिकलोय, बहुदा रोज शिकतोय- प्रेम, युद्ध, ईर्ष्या, आकस, राग, काळजी, मैत्री, बंधुभाव, चांगुलपणा आणि वाईटपणा, ह्या सगळ्यांचा संगम आयुष्यच तर आहे. जे आपल्याला मिळालंय, प्रत्येक क्षणाला धडकतंय आणि sand-clock मधल्या रेती सारखं वाहत चाललंय ते ही आयुष्यच तर आहे. हजारो लाखो नद्यांच्या संगमाने जे बनलंय,त्या आयुष्याच्या ह्या अथांग महासागराचेच तर आपण नाविक आहोत!

चला तर मग,

होऊनी नाविक आयुष्याचे, गलबत झोकू वादळात,
न भीती असावी मरणाची न जगण्याची ह्या अंतरात.
दिसत नाही किनार जोवर, असावा निश्चय मना-मनात
संगम होऊनी भक्ती-शक्तीचा, गलबत झोकू वादळात!

# Tapestry



Rohan Panjwani

First Year, Bachelor of Arts

As I sit back and peer out of the
window on a busy Monday evening,
I see days turn into nights,
And summers turn into fall.

Life is but a fusion of exquisite
miracles and grievous catastrophes,
Patiently waiting for us to live our
wildest dreams.

From lyrical sunsets to poetic breeze,
We became poets and writers in its
being,
From its shades of grey to its shades
of blue,
We became artists and dreamers
painting the sun and the moon.

Life is but a mosaic of nature's vibrant
colors,
We so faithfully paint our lives in.

The waves of the oceans
We syncopate our heartbeats to,
The air that waves the trees,
We synchronize our breaths too.

Life is but a happenstance between
nature and the rhythm
The body so blissfully dances to.

Mountains and oceans, deserts and
valleys,
Cultures and traditions, unity in
diversity,
We've known only pluralism and
acceptance,
From the places we've been through
and the souls we've met there.

# पान क्र. ३९

Life is but an assemblage of
multitudinous landscapes and a
myriad of civilizations,
We so gracefully call our home.

Spring brought us flowers,
Fall brought us cinnamon
Rain mended a broken heart,
And brought with it revitalization.

Life is but an anthology,
Of heart breaking poems and soul
mending melodies.

As I sit back and peer out of the
window on a busy Friday night,
I see nights turn into days,
And fall turn into summer.

Life is but a tapestry of interwoven
Hopes and dreams,
Patiently waiting for us to embrace
our wildest dreams.

# छंद असायला हवा..




## कनिष्क शिंदे

द्वितीय वर्ष, विज्ञान शाखा


छंद असायला हवा..
जेव्हा जगभरापासून लांब ,आपल्या जगात
यावसं वाटेल.

आपला छंद जोपासायला हवा,
कधी कधी काळाच्या अनंत दुनियेत हरवून
जाण्यासाठी,
आणि स्वत: ला गमवून बसल्याचा भास
पळून जावा,
ह्यासाठी प्रत्येकाने छंद पाळायला हवा.

असं नाही की छंद छोटा किंवा मोठा असला
पाहिजे,
तो तितकाच तजेळ असावा जितका प्रत्येक
माणूस असतो.

छंद हा छंद असतो,
तो एखाद्या गजऱ्या सारखा प्रत्येक
जीवामध्ये माळायला हवा.

छंद असायला हवा.
कितीतरी विचारांचा संगम घेऊनी,
एक विचार येतो,
तो अक्षरात काढायला हवा.
अक्षर कसेही असले तरी
जीवापासून लिहून तो कागदावर रंगायला
हवा.

छंद असायला हवा.
मोकळा वेळ हा सुद्धा मोकळ्या
श्वासासारखा निघावा
छंद सगळ्यांनाच प्रिय असतो,
तो एक संगम असतो, जाणिवांचा आणि
विचारांचा.
प्रत्येकाचे छंद एकत्र आल्यास,
त्या विचारांतूनच एक महासंगम निर्माण
व्हावा.
त्या संगमाचा आवाज जगभर पसरावा,
आणि मनापासून प्रत्येक हृदयातून निघावा.

छंद असायला हवा,
छंद असायला हवा

# एक रंगीत संगम




## नंदिनी यादव

द्वितीय वर्ष, कला शाखा


काही दिवसांपूर्वी मी पहिलीत असताना आईसाठी केलेले वाढदिवसाचे greeting card मला सापडले. त्यात मी  वाकडी तिकडी अशी जगावेगळी फुलं बनवली होती. ते पाहून मी खळखळून हसले. आई म्हणाली की ती फुलं कशीही असली तरी तिला ती फुलं जगातल्या कुठल्याही फुलांपेक्षा नेहमीच जास्त आवडतील. त्याच फुलांच्या चित्रामधून जन्म झाला होता माझ्या पाहिल्या छंदाचा- चित्रकलेचा!

अगदी लहानपणापासून आई, आजी ह्याना कलेची आवड जोपासताना मी पाहत आले आहे. मग ती कला स्वयंपाक घरातील नवनिर्मिती असो किंवा चित्रकलेतील रंगीत नावीन्य. पण एक मात्र खरं, सर्जनशीलतेने आपले आयुष्य किती सुरेख आणि अर्थपूर्ण होऊ शकते याची शिकवण मला नकळतपणे मिळत गेली. इतर मुलांसारखे मी ही अनेक उपक्रमात भाग घ्यायचे, पण चित्रकलेततून मिळणारे समाधान वेगळेच होते. माझ्या पालकांनीसुद्धा ह्या कलेला ओळखले आणि मला प्रोत्साहन दिले.

साहवीत असताना चित्रकला आणि त्यातील तंत्र शिकता यावे म्हणुन मी चित्रकार श्रीमती सुमना डे ह्यांच्याकडे शिकायला लागले. चित्रकला ही तांत्रिक आहेच, पण ही तांत्रिकता आणि नियम बाळगतानाही आपण किती मोकळ्या रीतीने चित्रकला अस्तित्वात आणू शकतो हे त्यांनी शिकवले. शाळेतल्या शिक्षकांनीसुद्धा मला त्यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन दिले. असेच चित्रकलेचे विशिष्ट तपशील शिकत मी ह्या कलेतून माझ्या भावना व्यक्त करायला सुरुवात केली. जणू चित्रकलेमुळे माझे माझ्या अंतरमनाशी एक दृढ नाते जोडले गेले होते. कलेची आवड असल्याने मला अनेक कलाप्रेमींशी संवाद साधता आला. आम्हा सगळ्यांना एकत्र गुंफणारा समान धागा चित्रकला असल्यामुळे मला अनेक मैत्री आणि नाती लाभली आहेत.

निसर्गाचे विविध पैलू असतात. आकाशातील निरनिराळे रंग, पानं फुलं ह्यांचे सौंदर्य, बदलते ऋतु हे माझ्या कलेसाठी नेहमी प्रेरणादायी ठरले आहेत.

इतकेच नव्हे तर जीवनातील सगळे पैलू प्रेरणादायी असतात जे माझ्या चित्राचे बीज पेरतात. एखादी प्रेरणा मिळाली, की कलेबद्दलचे प्रेम, कलेसाठी आतुरता रंगांद्वारे डोळ्यांसमोर उतरू लागते. ते चित्र, ते रंग, जन्म घेणारे आकार जणू माझ्या मनाचा आरसाच असतो. एखाद्या चित्रकाराला उमगलेली दृश्य जेव्हा वास्तवात उतरत जातात, तेव्हा तो आनंद सर्व त्रास, वेदना, दुःखापलीकडे जाऊन एक आत्मा तृप्त करणारे समाधान देतो.
सप्टेंबर २०२३ मध्ये माझ्या महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाचा उद्घाटन सोहळा झाला. त्या सोहळ्यात मला दादासाहेब फाळके यांचे live पोर्ट्रेट काढण्याची संधी मिळाली. रोज सराव करून अंतिम दिवसाला मी नऊ मिनिटात ते पोर्ट्रेट काढले. माझी चित्रकला मला रंगमंचावर सादर करता आली ह्यावर अजून ही माझा विश्वास बसत नाही. चित्र संपवताच टाळ्यांचा तो गडगडाट मला अजूनही तितकाच अचूक आठवतो. त्या दिवशी जणू प्रत्येक रंगीत स्ट्रोक मधून माझा मुक्त स्वभाव त्या पोर्ट्रेट च्या रुपात उतरला असे वाटले. रंगांची उधळण करताना जो आनंद मिळतो तो खरंच गगनात मावेनासा असतो! आणि त्या दिवशी हीच उधळण करताना एक अनोखी कलाकृती निर्माण झाली ज्याने अनेक मनं जिंकण्याचे सामर्थ्य दर्शविले!
माझ्यासाठी चित्रकला हा केवळ एक छंदच नाही, तर एक अनोखा संगम आहे. संगम रंगांचा, भावनांचा, विचारांचा आणि आठवणींचा. आयुष्य कितीही दगदगीचे असले, तरी साध्या पेन्सिल ने उतरवलेलं कागदावरचे स्केचही मला एका तणावमुक्त मनस्थितीत नेऊन पोहोचवते. ब्रश उचलून कुठल्याही रंगाचा एक स्ट्रोक मारल्यानेही किती आनंद होतो! सुख, दुःख, क्रोध अशा अनेक भावनांचा संगम, ह्याने कलेची निर्मिती होते. सर्जनशीलतेने मनाचा, बुद्धीचा ताजेपणा टिकून राहतो. एखादे चित्र पाहिले तर आपण केवळ त्यातील रंग व आकार पाहतो, पण ते चित्र त्या कलाकाराच्या कलागुणांचा एक उल्लेखनीय संगम असतो हे कलेने मला शिकवले. ह्या संगमाने माझ्या आयुष्यात आनंदाचे रंग भरले आहेत आणि कायम भरत राहील ह्याची मला खात्री आहे.
चित्रकलेत एक वेगळीच जादू आहे. चित्रकला आणि त्यासाठीचे प्रेम ह्याचा संगम अद्वितीय आहे, कारण त्यातून निर्माण झाले एक गोड नाते, नाते माझं माझ्या अंतरमनाशी!

# संगम विचार-भावनांचा...




## यश राणे

द्वितीय वर्ष, कनिष्ठ महाविद्यालय, विज्ञान शाखा


संगम, आता ह्या संगमावर नक्की काय लिहावं हा प्रश्न पडताच,आतून एक आवाज आला, की संगम म्हणजे हाच तर आहे- जेव्हा वाचा आणि विचारांचा मेळ होतो. तेव्हाच तर आपण आपले विचार प्रकट करू शकतो. आता ही वाचा आणि विचार ह्यांचा संगम झाल्यास ह्या अश्या लिखाणाची निर्मिती होते ... पण मग संगम नक्की हेच का?

एका व्यक्तीचा आणि कलेचा संगम होता होता,
एक कलाकार घडतो,
आता हाच कलाकार त्याच्या कलेतलं नाविन्य जपण्याकरिता खूप धडपडतो,
पण कलेच्या ह्या महासागरांतच आढळतो...

कला म्हणजे नुस्तच नाच गाणं नव्हे,
खरंतर कला म्हणजे लोकांची भावनाच असते,
आणि हे माझं सौभाग्य आहे की माझी माझ्या भावनांसोबतची भेट जरा लवकरचं घडली...

येता जाता काहीतरी गुणगुणण्या पासून,
तर तेच गुणगुणते गाणे लिहिण्यापर्यंत,
ज्या टीव्ही मध्ये नटांना बघायचो,
आज त्यावर माझे लघुपट बघतो,
ज्या रंगमंचा समोर एक प्रेक्षक बनून असायचो,
आज त्याच रंगमंचावर स्वतः सादरीकरण करतोय...
आणि हे सगळं का घडलं असेल बुआ?
असा विचार करायला लागलो की मग ध्यानात येतं, की हासुद्धा माझ्या स्वप्नांचा आणि माझ्या क्रियांचा संगमच आहे...

स्वप्न बघण्यात कधी मागे नाही वळलो, आणि त्याच स्वप्नांकरिता केलेल्या कार्यांमध्येसुद्धा ठाम पणे उभा राहिलो... कारण स्वतःसाठीच उभे राहू नाही शकलात, तर मग आपल्या कलेसाठी, आपल्या लोकांसाठी उभे कसे राहाल?

आणि मग जेव्हा गोष्ट आपल्या लोकांची असते तेव्हा विचार आणि स्वभावाच्या संगमाने नाती बनतात, तसंच विश्वास आणि प्रेमाच्या संगमाने ती टिकतात...

खरंतर, संगम हा रोजच्या आयुष्यात कोणत्या नं कोणत्या ठिकाणी होतच असतो. तसं बघायला गेलं तर हे जीवनसुद्धा जन्म आणि मृत्यूमधला संगमच आहे तर...

आणि ह्या जीवनात काहीतरी वेगळं करायचं असेल तर तुमच्या ध्येयाचा,त्याला प्राप्त करण्यासाठीच्या दृढ निश्चयाचा आणि क्रियांचा संगम होणे हे गरजेचं आहे. जेव्हा हे होईल तेव्हा ह्या आयुष्यरूपी रंगमंचाचा कलाकार, एक चांगला व्यक्ती होऊ शकेल. कारण शेवटी माणूससुद्धा मानवता आणि मानवते करिता केलेल्या अट्टाहासाच्या संगमनेच तर पूर्ण होतो!

मग बघा स्वप्नं,
आणि त्याला पूर्ण करण्याचा अट्टाहास धरा,
माणसांच्या ह्या अखंड संध्येत,
माणुसकीची एक ज्योत पेटेल असं काहीतरी करा...

कला सादर तर सर्वच करतात पण त्या कलेला जगण्यात आणता येईल असं काहीतरी करा...

जगता जगता ही कला जपा कारण आयुष्य हे कलेविना अपूर्ण आहे,
आणि संसार कलेमुळेच संपूर्ण आहे...
जन्म व मृत्यूच्या ह्या काळचक्राचा कलेशी संगम व्हायला हवा ...

कारण शेवटी संगम हाच नाविन्याचा उगम आहे...
कारण शेवटी संगम हाच नाविन्याचा उगम आहे...

# संगम- ज़िंदगी से



वैष्णवी निलिमा राज बोरुलकर

द्वितीय वर्ष, कला शाखा

मनुष्य जीवन की शुरुआत और मनुष्य जीवन का अंत दोनों ही संगम से होता है। शुरुआत, दो रूह के संगम से, तो अंत- आत्मा के परमात्मा के साथ संगम से। "संगम" याने मिलाप, मिलन या संयोग। संगम परिवर्तन लाता है, बदलाव लाता है, और परिवर्तन ही सृष्टि का नियम है।

"अमावस के दिन चाँद को भी
अँधेरे में खो जाते हुए देखा है,
हाँ, मैंने वक्त को भी
अपना बयान बदलते हुए देखा है।"

यह बदलाव, इतना आसान नहीं होता। ये उम्मीदों, जज़्बातों और यादों का संगम करता है, जो अक्सर इंसान को आगे बढ़ने नहीं देता। तो फिर संगम आखिर इतना ज़रूरी क्यों होता है?

मैं एक कलाकार हूँ, जो कल को "आकार" देने की पूरी कोशिश करती है। जब भी अपनी रूह से सुरों को पुकारती हूँ, तब भी एक संगम का आभास होता है मुझे। अपने कंठ में, उन सुरों के संगम का आभास। कला कोई वस्तु नहीं,कोई चीज़ नहीं,बल्कि बस एक तरीका है- अपनी रूह से औरों की रूह को छूने का एक तरीका। संगम ही वो साधन है जिससे "समझ" बढ़ती है, फिर चाहे वो दर्शकों या श्रोताओं का एक कलाकार से संगम हो, या मेरे घुन्गरूओं का ताल के साथ संगम हो या फिर किसी नाटक में मेरे हर एक भाव का दर्शकों की खामोशी से संगम हो। संगम ही लोगों को "संग" लाता है, लोगों में समझ बढ़ाता है।

हर एक कलाकार के दो पहलू होते हैं। एक पहलू दूसरे पहलू से अक्सर अंजान ही होता है। उस कलाकार की कला ही उन पहलुओं का संगम करवाती हैं जिसमें एक पहलू, दूसरे पहलू को पहचानकर उस कला को निखारता है। ये पढ़कर नहीं, बल्कि महसूस करके ही समझा जा सकता है।

जीवन के हर पहलू में संगम महत्वपूर्ण है। रिश्तों में आचार-विचारों का और दो अधूरे दिलों का संगम, पाक-कला उर्फ़ cooking में मसालों और सामग्री का संगम, या फिर फैसले लेने से पहले दिल और दिमाग के कार्यचलन का संगम। संगम ही एक सुदृढ़ समाज, एक सुदृढ़ रिश्ते की नीव है। पंच तत्वों के संगम से ही हर कोई जीवित है, संगम ही नवनिर्माण की जड़ है।

"नदी हो,
तो उस समंदर से जा मिलो,
बरसात हो,
तो उस ज़मीन से जा मिलो।
ए मुसाफ़िर,संगम से ही समय के संग चल पाओगे,
अगर जीना हो,
तो बस ज़िंदगी से जा मिलो।।"

.

# सूरसंगम- गुंफते माळ मी सुरांची!




## तिर्थांगी विजय कुलकर्णी

तृतीय वर्ष, कला शाखा




"न्हाऊनी सुरांच्या झऱ्यात
फुलले हे मन
संगीताच्या या प्रीतीत
बेभान झाले हे मन!"

संगीत म्हणजे गायन, वादन, नृत्य या तीन कलांचा संगम. संगीत म्हणजे दैवी अनुभूती देणारे माध्यम. संगीत म्हणजे चराचरांत वसलेला एक असा सूर जो आपल्याला एकमेकांशी जोडतो.

साधारण लहानपणीच सर्वांसमोर जेव्हा गायला सांगितले तेव्हा गळा गोड आहे हे कळले आणि तेव्हाच गळ्याला अजून गोड करण्यासाठी म्हणजे नीट सांगायचे झाले तर गळा तयार करण्यासाठी गायनाच्या शिकवणीला जायचे ठरले. तोपर्यंत गाणं गाता येणे म्हणजे फक्त सुरेल स्वरात गाता येणे होय एवढेच ज्ञात होते.

पण संगीताचे शास्त्रोक्त शिक्षण हे काय असते ते शिकवणीला गेल्यावरच कळले आणि हळूहळू या कलेच्या दिवसागणिक प्रेमात पडत गेले. आजपर्यंतच्या या ७-८ वर्षांच्या प्रवासात सप्त स्वरांनी वेगवेगळ्या रुपात येऊन मला आपले सांगीतिक दर्शन घडवले. कधी पंडित भीमसेन जोशी, पंडित जसराज, पंडित कुमार गंधर्व अशा थोर गायकांच्या गायनात मन रमायला लागले ते कळलेच नाही. शास्त्रीय संगीत म्हटले की सहसा सर्वांना ते एक मनोरंजनाचे माध्यम कसे असू शकते असा प्रश्न पडतो. खरंतर शास्त्रीय संगीत हे नक्कीच समजण्यास कठीण आणि त्यात आवड निर्माण होण्यासाठी थोडा वेळ खर्च करायला लावणारे किंवा एकतर मुळातच आवड असायला लागणारे आहे. पण संगीताचे मूळ ज्याने रोवले आहे त्याच्याच जर आपण प्रेमात पडलो तर किती छान ना! फक्त त्यासाठी आपला थोडासा वेळ देणे गरजेचे आहे पण मुबलक वेळ दिला तर नक्कीच शास्त्रीय संगीताची गोडी लागल्याशिवाय राहणार नाही.

सूरांशी पक्की ओळख झाली आणि ते आपले घनिष्ठ मित्र झाले की सुरेल गाणे गायला जमले असे समजायला हरकत नाही. पण त्याबरोबरच ते गाणे ठरावीक लयीत, तालात जमणेही गरजेचे असते.

अनेक ताल आहेत जसे की त्रिताल, एकताल, चौताल, इत्यादी. लयीत, ताल सांभाळून व स्वरांची सुरेल गुंफण करून गायलेले गाणे हे सुंदरच होणार. आताच एका आप्तांच्या लग्नात गेले होते तेव्हा लावलेल्या संगीतात तबला वाजत होता. नीट ऐकल्यावर पटकन डोक्यात आले- अरे हा तर आपला त्रिताल आहे!! प्रचंड गर्दीत आपल्या जवळच्या व्यक्तीचा आवाज अचानक ऐकू आल्यावर जसे वाटते तसेच त्यावेळेस वाटले जणू.एखादे गाणे आवडले की त्यातले स्वर आणि ताल ओळखत बसणे आता आवडीचा छंद होऊन बसला आहे. पहिल्यांदा जेव्हा शिकवणीला सुरुवात केली होती तेव्हा अलंकारांपासून केली होती. "सा रे ग म प ध नि सां" हे अष्टक बाराखडी सारखे तोंडात बसवायला सुरुवात केली. पण हे एवढ्यावरच थांबणार नव्हते तर हळूहळू हेच स्वर निरनिराळ्या क्रमाने मागे पुढे करून उदा. सारेसा रेगरे गमग मपम पधप धनिध निसांनी सारेंसां विविध अलंकार शिकायला सुरुवात झाली. तेव्हापासून समजले की आयुष्यात प्रगतीसाठी चढउतार महत्वाचे असतात असे का म्हटले जाते. कारण स्वरांचे हेच ढउतार गळ्याचा आणि जिभेचा घामटा काढायला लागले असे म्हणणेच उचित ठरेल.

नंतर पहिलाच राग मी शिकलेतो म्हणजे भूप – "भूप रूप गंभीर शांत रस..." मनाला शांत करणारा असा हा राग आहे. कोणताही राग गाण्याआधी त्या रागाचा विस्तार करणे आवश्यक असते. जेव्हा तानपुऱ्यावर आवाज स्थिर करण्यासाठी सा लावला जातो तेव्हा ओमकारध्यान करायला बसल्यासारखे वाटते आणि लगोलगच मन शांत होते. संगीतातले राग हे माणसाच्या भावभावनांशी व निसर्गाशी जुळलेले असतात. त्यामुळे ठरावीक वेळेत तो तो राग गायल्याने छान वाटते. संगीत मनाला संवेदनशील बनवते, भावनांना स्पर्शून जाते आणि हे नक्कीच उदाहरणांतून पटवून देता येण्यासारखे आहे. प्रत्येक कला ही नवरसांचे दर्शन घडवते तसेच संगीतही हे नवरस दर्शन स्वरांच्या खेळातनू आपल्याला घडवते. प्रात:काली गायली जाणारी भैरव रागाची बदिंश "जागो ब्रिजराज कुंवर..." मनात भक्ति भाव निर्माण करून त्याला शांत करते. तर देस सारखा राग मनाला चेतना देऊन जातो. दिवसाच्या ठरलेल्या वेळेत केलेले राग गायन किंवा किमान ते ऐकणेसुद्धा मन आणि त्याबरोबरच शरीर स्वास्थ्यासाठीही लाभदायक असते.

या सर्वांत गंमतीची गोष्ट ही की स्वर तेच असतात पण त्यांचा चढ उतार बदलत राहतो, जागा बदलत राहते आणि त्या त्या राग गायनासाठी लागणारे स्वर वापरले की योग्य राग निर्मिती होते. असेच हा स्वरांचा सुरेल संगम संगीत निर्मिती करतो आणि सर्वांच्या हृदयावर राज्य करत राहतो.

# संगीत- एक मधुर संगम





ऋत्वि चौधरी

प्रथम वर्ष, काला शाखा

संगीत, स्वरांचा संगम
मन बेधूंद करणारी ही,
स्वर तालांची गुंफण
गातंय संगीत, स्मृतींचं संगम
मनातलं स्वप्न, प्रेमाचं मिश्रण.

नसे संगम हा केवळ सूरांचा
असे भावनांची त्याला साथ,
विणलाय गाण्याचा अनुभव
आठवणींच्या दोर्यात.

अमर्याद भक्तीचा नाद
घुमतो तुकाच्या अभंगात,
आईच्या अंगाईत लपलेली
माया दिसे संगीतात.

जे काही शब्द सांगू शकले नाही
ते संगीत कुजबुजून गेलं कानात,
जे ओठांवरी कधी आले नही
पोहोचले संगीत संगे ह्रदयांत.

अद्वीतिय भाषा संगीत,
सांगे सूख दु:खाची कथा संगीत,
कंठापासुन कानांपर्यंत पोहोचतात ते सुर,
पण ह्रदयाशी हितगुज करते ते संगीत!

# खारट नाती गोड कशी होतात?




## राधा रासम

प्रथम वर्ष, कनिष्ठ महाविद्यालय, कला शाखा


माझा आणि मिठाचा छत्तीसचा आकडा आहे. माझ्या आदर्श सून बनण्याच्या वाटचालीतील एकमेव अडथळा म्हणजेच मीठ. लहानपणापासून मला गणिताची आवड. गणितात आणि पाककृतीत प्रमाण राज्य करते. पण पाककृतीत मिठाचा उल्लेख होताच, ते “चवीप्रमाणे मीठ” हे वाक्य ऐकून माझ्या कपाळावर आठ्या पडतात.

तुम्हाला प्रश्न पडला असेल, की या बाईचे मिठाबरोबर काय वैर आहे. पडलाच पाहिजे प्रश्न, कोणीही मिठाबद्दल एवढ्या प्रखर भावना बाळगल्या नाही पाहिजेत. पण मीठ हा जेवणातला अविभाज्य घटक आहे. एका माणसाच्या हृदयाचा मार्ग त्याचा पोटातून जातो, पण त्याहून अधिक महत्वाचे म्हणजे, हेच अन्न घराच्या सत्तेची चावी असते. पुरूषांना बहुतेक वेळा त्यांच्या घरातील स्वयंपाक घराची खरी ताकद जाणवत नाही.

मला लहानपणी माझ्या आईला बघून कळलेलं की स्वयंपाकघर हे बाईच्या चिकाटीचे प्रतीक असते. आणि आई-वडिलांच्या घटस्फोटानंतर, जेव्हा माझ्या बाबांवर स्वतः जेवण बनवण्याची पाळी आली, तेव्हा स्वयंपाकघर हे बाईच्या विरोधाचे प्रतीक बनले.

माझ्या सध्याच्या घरात स्वयंपाकघर हे रणांगण होते, एक प्रस्थापित राजा व नवशिक्या बंडखोर यांच्यामधील सत्तासंघर्ष होता. माझ्या सासुबाई, सौभाग्यवती सुनैना देशमाने, यांना तुम्ही पाहिल्या भेटीत केवळ एक नम्र, आज्ञाधारक गृहिणी समजाल. पण खरंतर या बाईमुळे देशमाने परिवार एकजूट राहिले आहे. ज्याप्रमाणे एक वाघिण आपल्या पिल्लांचे रक्षण करते, त्याचप्रमाणे त्या आपल्या कुटुंबाची राखण करायच्या. त्यामुळे जेव्हा मी लव मॅरेज करून या घराचे माप ओलांडून आले, त्या माझ्यापासून चार हात लांब राहिल्या.

लग्न झाल्यावर मला लगेचच कळले की जेवण ही त्यांनी योजलेली माझी परिक्षा असणार. लग्नाच्या पहिल्या दिवशी मी उत्सुकतेने सकाळी सहा वाजता उठून कांदे पोहे बनवले. जेवणाच्या टेबलावर बाकी सर्वांकडून माझे कोडकौतुक झाले, पण माझ्या सासुबाई फक्त एक वाक्य बोलल्या - “मीठ जरा कमी आहे”. असं करून एक पूर्ण महिना गेला, जेव्हा फक्त त्या जेवण करायच्या. बहुतेक वेळा हे मला फायदेशीर ठरायचे, कारण मी अनेकदा ऑफिसात कामामुळे अडकलेले असायचे. पण ज्यावेळी मी जेवण करायचे, तेव्हा त्या त्यांच्या बारिक आवाजात मी केलेली कोणतीतरी चूक लगेच काढायच्या. माझा नवरा, नकुल, जो मला नेहमी जेवणात मदत करायचा (खरंतर एवढी मोठी मदत नाही, कारण जेवणात माझ्यापेक्षाही बत्तर असलेला माझा बिचारा नवरा कितपत माझी मदत करणार?) त्याच्या आईचं बोलणं ऐकून नेहमी माझ्याकडे सहानुभूतीने पहायचा.

आणि मग एक शनिवार उजाडला, जेव्हा एकामागोमाग एक सर्व उलटापालट झाले. सकाळी मी जरा उशीरा उठले, मग माझं आणि नकुलचं कुठल्यातरी शुल्लक कारणावरून भांडण झाले आणि ऑफिसातही दिवस तणावपूर्ण गेला. घरी आल्यावर मी नकुलला हाक मारणारच होते,पण मग मला आठवलं की आमचं भांडण चालू होतं. मी नाईलाजाने स्वयंपाकघरात गेले, आणि चहासाठी पाणी उकळत ठेवलं. जे अश्रू मी एवढा वेळ अडवून ठेवलेले, नकळत माझ्या गालावरून ओघळू लागले. याच अवस्थेत माझ्या सासूबाईंनी मला पहिले, जेव्हा त्या स्वयंपाकघरात आल्या.

मग आयुष्यात पहिल्यांदा त्यांच्या आवाजात माझ्यासाठी काळजी दिसली. त्यांनी काय झालं विचारल्यावर माझ्या अश्रूंचा बांध फुटला आणि मी त्यांना हळूहळू दिवसभरात काय झालं, ते सांगू लागले. त्यांनी बाजूला चहा टाकला माझ्यासाठी, आणि चहाचा कप मला देऊन त्या बोलू लागल्या.

“नलिनी... मी तुझ्याबरोबर खूपच कठोर वागले. मी विसरलेच होते की मी सुद्धा एक काळ तुझ्यासारखीच हरवलेली होते, काम व कुटुंब दोन्ही सांभाळण्यात. पण तुझी मदत करण्याऐवजी, मी तुला परकं केलं.” हे ऐकून माझ्या चेहऱ्यावर फक्त आश्चर्यच होते.

“उद्यापासून स्वयंपाकात मी तुझे मार्गदर्शन करते,” त्यांच्या शब्दांनी माझ्या ओठांवर हसू पुन्हा परतले.

पुढच्यादिवशी मी कोळंबी मसाल्याची रेसीपी ऑनलाईन बघू लागले, तेव्हा सासूबाईंनी त्या रेसीपीला जरा बदलून त्यात खोबऱ्याचे वाटप घातले. जेव्हा त्यात मीठ घालायची वेळ आली, मी त्यांना माझी आणि मिठाची गत सांगितली. ते ऐकून त्या हसल्याआणि म्हणाल्या, “स्वयंपाकातला काही भाग मापांनी मोजण्याच्या पलिकडे असतो. तू कधी स्वतःच्या अंदाजाने मीठ टाकले आहेस का?” त्यांचे बोलणे ऐकून मी आयुष्यात पहिल्यांदा काळजीपूर्वक चमच्याने न मोजता, अंदाज घेऊन स्वतःच्या हातांनी मीठ टाकले.

आमची ही रेसीपी घरात सुपरहिट झाली आणि जेवणात मिठाचं प्रमाण अचूक जमले होते. पुन्हा एकदा मला स्वयंपाकघराची एक नवीन शक्ती कळली - स्वयंपाकघर हे दोन व्यक्तिंनास्वतः स्वतःचे मतभेद बाजूला सारून एकत्र आणण्याचे साधन होते. त्या दिवसानंतर, आमचे स्वयंपाकघर रणभूमीपासून नव्या व जुन्या पिढीचे संगम बनले - आमच्यातील समानता आणि विविधता यांच्या पायावर सतत नवीन कल्पनांना उभारी देणारे,आम्हा सासु-सुनांचा गोड संगम.

# संगम नात्यांचा




गौरी गावडे — प्रथम वर्ष, कला शाखा

अनुवाद:

कनक काटदरे — प्रथम वर्ष, कनिष्ठ महाविद्यालय, कला शाखा


राधिका आणि तिचे लाडके आजोबा, मुंबई महानगरात राहूनही आपल्या वेगळ्या ध्रुवावर राहणारे, प्रेमाच्या अतूट नात्याने जोडलेल्या दोन वेगळ्या व्यक्ती. नुकतेच तारुण्यात पदार्पण केलेली राधिका, बुद्धीने अतिशय चाणाक्ष होती. जाहिराती तयार करणाऱ्या ऐजन्सी मधील डिजिटल मार्केटिंग कार्यकारी असल्यामुळे, कार्यालयातील विविध प्रकल्प, मिटींग्स आणि मोठ्या स्वप्नांसाठी घेतलेल्या अनेक भराऱ्या, हेच राधिकाचे जीवन. तिच्या बरोबर विरुद्ध तिचे आजोबा. ८५ वर्षांचे हे आजोबा एका लहानश्या घरात, शांत परिसरात राहायचे. आपली गुलाबाची बाग सांभाळणे व जुन्या कथा-कादंबऱ्या वाचणे, हीच त्यांची करमणूक. जुन्या आठवणीत, संस्कारात बुडालेले हे आजोबा, राधिकाचे सर्वस्व होते. वयाच्या पाचव्या वर्षी आई- वडिलांचे निधन झाल्यावर, आजोबांनीच राधिकाला वाढवले होते. तेच राधिकाचे मित्र,गुरु व माय बाप.



एका संध्याकाळी, महत्त्वाच्या मीटिंगसाठी निघत असताना, राधिकाला तिचे आजोबा, एकटेच बाल्कनी मध्ये बसलेले दिसले. मावळत्या सूर्याकडे एकटक पाहत, कसल्याशा विचारात गर्क होते जणू. राधिका थांबली. आजोबांशेजारी बसत, हळुवारपणे म्हणाली, "काय झालं आजोबा? काही अडचण आहे का?" तुम्हाला बरं वाटत नाही का?" राधिकाच्या आवाजातील चिंता, आजोबांच्या लगेचच लक्षात अली. आजोबा किंचित हसले. पण त्यांच्या थरथरणाऱ्या हातांनी व आवाजाने त्यांची मनस्थिती न बोलताच राधिकाला सांगितली."काही नाही गं, राधा. जुन्या आठवणीत रमलो होतो. जुने दिवस, आठवणी, नाती-गोती; तेच माझं नेहमीचं." पण आपले आजोबा केवळ आठवणीत रमणाऱ्यातले नाहीत, हे राधिकाला कळलं होतं. त्या आठवणींत ते पूर्वीचे साधे जीवन, अतूट नाती, प्रेम शोधतात हे तिला ठाऊक होतं. एक सुस्कारा टाकत आजोबा पुढे बोलू लागले," एक काळ असा होता राधा, जेव्हा फोन, संगणक, इंटरनेट, काही म्हणजे काही नव्हते. पत्रव्यवहारातूनच काय तो संपर्क ठेवला जायचा. माणूस दिसला की खरे, अशी परिसथिती होती. तरीही पात्रातील प्रत्येक शब्दात प्रेम उतू जायचे. वेगळेच दिवस होते ते."
राधिकाला आता फार कुतूहल वाटले. "अजून सांगा नं मला, आजोबा. कसे होते पूर्वीचे दिवस? तिने विचारले.

हे ऐकताच, आजोबांचे डोळे आनंदाने चमकू लागले. आजोबा त्यांची गोष्ट सांगू लागले. कुठली गोष्ट? प्रेमकथाच, त्यांची आणि राधिकाच्या आजीची. "आमची प्रेमकथा, पत्राद्वारे सुरु झाली. तुझी आजी आणि मी कितीतरी मैलांनी दूर असलो, तरी आम्ही लिहिलेली पत्रे म्हणजे आमच्या हृदयाला जोडणारे धागेच होते जणू. येणाऱ्या प्रत्येक पात्राची आम्ही आतुरतेने वाट पाहायचो. प्रत्येक पात्रातून, प्रेम ओसंडून वाहत असायचे. थांब, दाखवतो ती पत्रे मी तुला."आजोबा आत गेले आणि त्यांनी जुना फोटो अल्बम आणला. ती पत्रे, तो अल्बम, आजोबांनी जीवापाड जपून ठेवला होता. ती पिवळी पडणारी जुनी पाने, सैनिकाच्या वर्दीतील तरुण आजोबांची साक्षीदार होती. ते जुने फोटो, पूर्वीचा काळ उलगडत होते. एका फोटोशी जोडलेली अशीच एक कहाणी आजोबा सांगू लागले. "राधिका, हा फोटो काश्मीर मधला आहे. तिथे माझी नेमणूक झाली होती. तिथे मी तुझ्या आजीला भेटलो. त्या हिम-शिखरांच्या, डोंगर- दऱ्यांतील रानाच्या संगतीत आमचे प्रेम फुलले." पूर्वी राधिकाने आपल्या आजी-आजोबांच्या प्रेम कथेबद्दल ऐकले होते. पण खरंतर आपल्या आजोबांच्या भूतलकालात, आठवणींचा फार मोठा खजिना आहे हे राधिकाला त्या दिवशी उमगले. मग काय? आपल्या आजोबांच्या या प्रेमकथेचा राधीकाही बुडून गेली. तिने आजोबांना त्यांच्या व आजीच्या नात्यातील सर्व आठवणी सांगायला लावल्यात. आजोबाही मनापासून बोलू लागले.

बायकोने आपल्याला प्रेमाने पाठवलेली पत्र, काही काळाच्या विरहाचे दुःख आणि मग युद्ध संपवून, घरी परतल्यावर, एकमेकांना पाहून झालेला आनंद; सगळं सगळं सांगितलं आजोबांनी. या गोष्टी सांगताना, अख्या घरात प्रेमाच्या गोड आठवणींचा वेगळाच प्रकाश पसरला जणू. राधिकाचे डोळे अश्रूंनी भरून आले. आजी- आजोबांचे प्रेम किती खोल रुतलेले होते, हे तिला जाणवले.

"हे नाते किती सुंदर आहे,आजोबा. मला ही वाटते असे खोलवर रुजलेले नाते असावे. असे प्रेम अनुभवावे." नानाजींनी हळुवारपणे राधिकाच्या डोक्यावरून हात फिरवला. "राधा,जग बदलले आहे. ते टेक्नॉलॉजी का काय ते... फार पुढे गेलं आहे.पण नाती बदलली तरी प्रेम तसेच राहते. नात्यांचे स्वरूप बदलते पण मनातील भावना कुठे बदलतात? नात्यांचा आणि पिढयांतील अंतराचा सुर्वर्ण मध्यही मिळेलच की!"

राधिका मीटिंगसाठी निघाली खरी, पण आजोबांनी सांगितलेले ते किस्से तिच्या मनात घोळत राहिले. आपल्या आजोबांच्या या आठवणी जतन कराव्यात, असे तिला वाटले.

मग पुढचे अनेक आठवडे,राधिकाने स्वतः आपल्या आजोबांच्या या आठवणींचे 'डिजिटल मेमूआर' तयार करण्यात घालवले. तिने आजोबांचे किस्से सांगतानाचे शूटिंग केले, जुने फोटो, जुनी पत्रे, सगळी गोळा केली व त्याची एक लहानशी डॉक्यूमेंटरी केली.

एका संध्याकाळी, राधिकाने ते मेमूआर देऊन, आजोबांना चकितच केले. ते बोलले नाहीत, पण त्यांच्या डोळ्यांतील आनंद-अश्रूच सगळे काही सांगून गेले. टेकनॉलॉजीचे हे स्वरूप पाहून, आजोबांना सुखद धक्का मिळाला. " हे...तू केलंस राधिका? अगं, शब्दात सांगता येणार नाही इतका आनंद झाला आहे मला! जाणू या स्क्रीनकडे पाहात, तारुण्य पुन्हा अनुभवत आहे मी! हा आपण एकत्र घालवतो आहे ना, तो वेळ अनमोल आहे. याहून जास्त काय हवे असणार, या म्हाताऱ्या आजोबांना?

त्या ननंतरचे अनेक आठवडे, राधिका आणि आजोबांनी एकत्र ते ममुआर बघत घालवले. त्यात जुन्या आठवणी होत्या आजोबांच्या,गावातील घराच्या आणि आजीच्या. त्यामुळे राधिका, आपल्या मुळांशी, तिच्यात रुजलेल्या संस्कारांशी अधिक जोडली गेली. या गोष्टीच तर दोन पिढ्यांमधील रेशमी धागा होत्या, बारीकसा का होईना, पण अतूट.

दिवस उलटत राहिले तशी आजोबांची तब्येत खालावत गेली. राधिकाला कामासाठी बरेचदा बाहेरगावी जाण्याची वेळ येऊ लागली. याचमुळे, आजोबांत व आपल्यात दुरावा येतो की काय, अशी चिंता तिला भंडावून सोडत होती. ती लांब असतानाही, आजोबांना पाहण्याचे, त्यांच्याशी बोलण्याचे साधन राधिकाकडे होते. ते म्हणजे मोबाईल वरून व्हिडियो कॉल करणे!

आजोबांनीही हा पर्याय आनंदाने स्वीकारला. राधिकाच्या देखरेखीखाली, आजोबाही मोबाईल वापरायला शिकले. आता घरापासून कितीही लांब असतानाही राधिका व आजोबा, एकमेकांना पाहू शकत होते, बोलू शकत होते.

एका संध्याकाळी, राधिका अनेक दिवसांनी बाहेर गावाहून परत आली होती. तेव्हा आजोबा आपल्या आवडत्या खुर्चीत, बाल्कनीत बसलेले तिला दिसले. पाहते तर काय! आजोबांच्या हातात फोने होता, त्यावर उघडलेले होते ते डिजिटल ममुआर! त्यांनी स्वतःहून ते फोनवर शोधले होते आणि नीट पाहतही होते! तिने आजोबांना घट्ट मिठी मारली.

त्या एकांत क्षणात, राधिकाला कळले की आजोबा व तिचे नाते अतूट होते. त्यांचं हे नातं म्हणजे संस्कारांचा, जुन्या परंपरांचा व आधुनिकतेचा मिलापच होता की! या संगमानेच त्यांच्या नात्याला खत पाणी घातले होते. खरेच जग कितीही प्रगती करत असले, तरी प्रेम थोडी बदलते? हृदयात घर करणाऱ्या अनमोल नात्यांना, पिढ्यांमधली अंतरे कशी दुरावू शकतील? नाही का?

# त्रिवेणी संगम




## नुपूर लिखिते

द्वितीय वर्ष, कला शाखा


नुकताच आजीचा वाढदिवस होऊन गेला. नेहमीच तो अगदी मजेत साजरा करत आलोय. मला लहानपणापासूनच कलाकृती करण्याची फार हौस व आजीला मी केलेल्या गोष्टी तर फारच अवडीच्या. घरातील लोकांचे वाढदिवस असले की नेहमी मी त्यांच्यासाठी ग्रीटिंग-कार्ड्स बनवत आणि खास करुन आजीसाठी. तिची मायेची थाप पाठीवर पडली की मन अगदी हर्षो-उल्हासानी भरून जायचे. पण या वाढदिवसाला कमी होती ती फक्त आज्जीची.....

मला आजीची आठवण आली की तिचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोर येतोच पण आठवणींच्या माध्यमातून मी मनापासून पुन्हा अनुभवते तो तिचा सहवास. मी पुन्हा अनुभवते ते आईचे कामावर जाणे व आजीचे मला शाळेच्या बस स्टॉप पर्यंत सोडणे, घरी परत येण्याच्या वेळी बस स्टॉप वरुन आणणे, रोज क्लास वरुन आणणे व पोहोचवणे.घरी येताना जर कधी शाळेची बस, स्टॉप वर लवकर आली तर मी बिल्डिंगच्या खालून आजीला जोरात आवाज द्यायचे.

ते ऐकून, "ओ गं मनू, आलेच हा मी खाली", असा आजीचा गोड आवाज कानावर पडताच ती दोन मिनटात खाली माझ्यासमोर लिफ्ट मधून आलेली असायची. मला आठवतं ते आमच्या दोघींचं सोसायटीच्या खालच्या दुकानासमोरच्या कट्यावर बसणं व तिच्या मैत्रिणींशी गप्पा-गोष्टी करणं. त्या कट्ट्यावर बसण्याआधी आजी नेहमी माझ्यासाठी 'बिंगो मॅड एंगल' असे एक खाद्यपदार्थाचे पॅकेट घ्यायची व आम्ही दोघी मिळून ते खायचो.

माझी आई, मावशी, काका हे सर्व देखील मला फार प्रिय. मी व माझी भावंड आम्ही नेहमीच खूप मजा-मस्ती करत आलोय. आजच्या पिढीला तंत्रज्ञानाने चारही बाजुने गुंफलेले आहे.आपल्याला आज सुखसुविधा व सोईस्करपणा केवळ मजा म्हणून नव्हे तर आपण या गोष्टींकडे एक गरज म्हणून बघतो. आपण अक्षरशः गूगल पिढी आहोत व सर्व काही नेहमीच आपल्याला एका बोटाच्या टच वरती मिळत गेले आहे.

आज आपल्याला एखादी गोष्ट पटली नाही तर आपण लगेच आई-वडिलांना प्रश्न विचारू शकतो व विचारतो ही. पण आपल्या आई-वडिलांना त्यांच्या आई-वडिलांनी कधी प्रश्न विचारायला मिळाले नाही. मला आठवतंय आई एकदा सहज बोललेली, “आम्ही नेहमीच ऐकत आलोय गं, अर्धे आयुष्य आई-वडिलांचे तर उरलेले पोरांचं ऐकावं लागतंय, पण मग आमचे ऐकायला कोण?”

मी शाळेत असतानाचा हा एक किस्सा बरंका! घरी आलेले पाहुणे निघायला म्हणून उठले. आईने मला हळूच खुणावून त्यांना नमस्कार करायला सांगितला. पाहुणे गेल्यानंतर मी तिला चिडून विचारले, “का नेहमी सगळ्या येणाऱ्या जाणाऱ्यांना वाकून नमस्कार करायला लावतेस? काय कारण तरी काय आहे त्यामागे?” त्यावर आजी म्हणाली, “आगं निदान त्या निमित्ताने तरी पाठीला तुझ्या हालचाल मिळेल गं”. हे ऐकुन मी, आई व आजी सर्वे हसण्यात गुंग होऊन गेलो. तेव्हा माझ्या लक्षात आले की मी केलेल्या प्रश्नाचे आईनी तर उत्तर दिलेच नाही. मी लगेच आईकडे पाहिले तर तिच्या चेहऱ्यावर एक गोड असे स्मितहास्य होते व ती देखील माझ्याकडेच बघत होती. तेव्हा कुठे मला हे जाणवले की आई-आज्जी सांगतात म्हणून एखादी गोष्टं केली तर काय अगदी पहाड कोसळणारे? आपण एखादी गोष्टं केल्यावर जर आपल्याला त्यातून काही नुकसान होणार नसेल व मोठ्या लोकांना समाधान, आनंद होणार असेल तर काय बिघडेल ती गोष्टं केल्यावर? मला हे आज कुठेतरी वाटतं की आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टींवर नक्कीच आवाज उठवावा व नकार द्यावा पण पाया पडण्यासारख्या शुल्लक गोष्टीला कशाला नाही म्हणावे,नाही का? यांमधूनच तर मुलांवर संस्कार होतात ना?

आजी मला कधी तिच्या लहानपणीचे किस्से तर कधी माझ्या आई व मावशींचे किस्से सांगत. मला सर्वात आवडीचे ते तिच्या सोबत बसून कधी मराठी टीव्ही सिरियल तर कधी घरातील सर्वांसोबत बसून क्रिकेट मॅचेस बघणे. एकिकडे आजी मला पुरणपोळी बनवायला शिकवायची तर दुसरीकडे मी तिला मोबाईल फोन वापरायला शिकवत. खरंच, किती गोडवा असतो नाई नात्यांमधे! प्रत्येक पिढीची एक वेगळी कहाणी, प्रत्येक पिढीचा एक वेगळा अनुभव, प्रत्येक पिढीचा एक वेगळा स्वभाव, प्रत्येक पिढीचा आयुष्याकडे बघण्याचा एक वेगळा अंदाज. माझ्यासाठी ह्या सर्वं गोष्टी कधी खाद्यपदार्थांच्या रेसीपी बूक मधून तर कधी नुसतच बागेत बसून मारलेल्या गप्पांमधून; कधी कॉलेज फेस्टसाठी आई-मावशी यांच्या मदतीने नेसलेल्या आजीच्या साडीतून, तर कधी भावंड मिळून आजीसोबत खेळणाऱ्या पत्त्यांच्या डावातून, नेहमीच एका पिढीकडून दुसऱ्या व दुसऱ्या पिढीकडून तिसऱ्यापर्यंत पोहोचत आल्या आहेत.

माझ्या आयुष्यात असणाऱ्या या 'तीन पिढ्यांचा संगम' वेगवेगळ्या संस्कृती, अनुभव व भावना यांना ‘घराच्या' छत्रछायेत एकरूप करणारा असा आहे. या तीन पिढ्या, तीन वाहणाऱ्या नद्या आहेत. कितीही वेगळ्या, कितीही विभिन्न असल्या तरी त्यांचा मिलाप हा अनिवार्य आहे. हाच संगम कुटुंबाला बंधून ठेवतो. एक नाही, दोन नाही तर अनेक पिढ्या घडवतो व काळानुसार, पिढ्यांपिढ्या घडत गेलेले हे संस्कार, नाती अधिकाधिक घट्ट करत जातात. आजच्या पिढीच्या भाषेत म्हणायला गेलो तर 'सायलेंट जनरेशन', 'जेन एक्स' व 'जेन झी' यांचा माझ्या आयुष्यात होणारा हा अनुरूप संगम माझ्यासाठी फारच उल्लेखनीय आहे.

# ना राहिले मी माझी




## राधा शिरीष देशपांडे

एम.एस.सी. वनस्पतीशास्त्र


पाहुनी सर्यू र्यहा नभातला
श्वास माझा थांबला,
सृष्टीत या मी गुंगले
मी न माझी राहिले.

होते असे हे का मला
विचारूनिहि प्रश्न हा,
नभाकडेमी पाहिले
मी न माझी राहिले.

अशी ही कोण भावना
मनास देई चालना,
मग चांदणे मी पाहिले
मी न माझी राहिले.

एकसथं वाहत्या
पाण्यास त्या मी पाहता,
प्रवाही मी ही वाहिले
मी न माझी राहिले.

अनोळखी की जाणती
कोणती जादगूरी,
काय मजला जाहले
मी न माझी राहिले.

हरवूनी या विश्वात मी
हरखनू ही गेले कशी,
सगंम वेध मजला लागले
मी न माझी राहिले.

क्षणकैदा मोहात या
स्वत:स ना मी रोखले,
त्या सगंमी मी भाळले
अन् मी न माझी राहिले...

# संगम दर्शन : देवबागचा स्वर्गीय चमत्कार



चिन्मयी मोंडकर

प्रथम वर्ष, कला शाखा



संगम .......संगम...... संगम. संगम म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर येतो तो दोन जीवांचा संगम; पण मित्रांनो, मी लहानपणापासून सतत "संगमावर जायचंय, संगमावर जायचंय" असं ऐकून-ऐकून, 'कोणता संगम?' हा विचार माझ्या मनाला स्पर्श करून जात होता. परंतु जेव्हा मी माझ्या गावी 'देवबाग' येथे गेले, जे कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण तालुक्यामध्ये आहे, तेव्हा माझे आई-बाबा मला संगम दाखवायला घेऊन गेले. किती विलक्षण अनुभव होता तो! नदी आणि समुद्राचा संगम. हा संगम पाहण्यासाठी देश-विदेशातून पर्यटक येथे येत असतात. माझे गाव हे विलोभनीय, अविस्मरणीय असल्यामुळे सरकारने त्याला पर्यटन स्थळ घोषित केले आहे. 'देवबाग' या नावातच जणू आमच्या गावचं सौंदर्य वसलेलं आहे. खरं सांगायचं तर एका बाजूला 'करली' नदी, दुसऱ्या बाजूला 'अरबी' समुद्र आणि या दोघांचा संगम. या संगमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे वर्षातून एकदा पक्षीदेखील स्थलांतर करून या रम्य ठिकाणी येत असतात. असं म्हणतात की या ठिकाणाला धार्मिक महत्त्वही आहे.

संध्याकाळच्या वेळेस आम्ही या संगमावर गेलो होतो आणि त्यावेळेस अस्ताला जाणारा सूर्य पाहून असं वाटलं की जणू अग्नीचा गोळा पाण्याशी संगम करायला निघालेला आहे. मला आजही तो क्षण आठवतो जेव्हा माझा एक पाय समुद्राच्या पाण्यात आणि दुसरा पाय नदीच्या पाण्यात होता. किती फरक होता त्या पाण्याच्या तापमानात, त्याच्या गतीत, तसेच स्वरुपात. सगळंच काही वेगळं होतं. नदीच्या स्वभावाप्रमाणे तिचं पाणी होतं - शांत, मंद गतीने वाहणारं आणि दुसरीकडे होत्या तीव्र गतीने उसळणाऱ्या समुद्राच्या लाटा, पायाखाली वाळू, डोळ्यासमोर हिरवीगार घनदाट डोंगरांची माळ, वरती निरभ्र आकाश आणि तो गार वारा. या अलौकिक नैसर्गिक सौंदर्याची छबी मी माझ्या हृदयात कोरत होते पण काही वेळाने लक्षात आलं की हे फक्त एक पर्यटन स्थळ नाही तर एक असं ठिकाण आहे जे तुम्हाला वरवर दिसणाऱ्या सौंदर्यापलीकडे खूप काही देऊन जातं.

नदी आणि समुद्र स्वतःचे वेगवेगळे गुणधर्म घेऊन एकत्र येतात आणि एका अर्थाने ते सृष्टीचा समतोल राखण्यात त्यांचे योगदान देतात. आपण सगळेजणही जर एकमेकांशी सामंजस्याने मिळून-मिसळून राहिलो तर आपण एक समाज म्हणून एकसंघ होऊ शकतो. ही गोष्ट लक्षात ठेवली की प्रत्येकाची विचारधारणा, स्वभाव-गुणधर्म, आवडीनिवडी हे

वेगवेगळे असतात पण शेवटी काही कारणामुळे एकत्र आल्यानंतर समोरच्याचे स्वभाव गुणधर्म समजून घेऊन, त्याच्याशी जुळवून घेण्यातच प्रत्येकाचं भलं आहे, याची जाणीव प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे नदी असो किंवा समुद्र, दोन्ही खोल आहेत; त्याप्रमाणे आपल्या प्रत्येकाच्या जीवनात असे कितीतरी प्रश्न असतात, अशा कितीतरी अडीअडचणी असतात, ज्यांचं समाधान खोलवर विचार केल्यावर मिळतं. या सर्व अनुभवांची आणि नैसर्गिक घटकांची तुलना आपण आपल्या आयुष्याशी करू शकतो. आपल्याशी संबंधित सर्व लोक, त्यांचे भिन्न-भिन्न स्वभाव, विचार आणि कार्यशैली हे नदी आणि समुद्राच्या पाण्यासारखे तर असतात.

एकदा लाटांचा आपल्या पावलांना स्पर्श झाला, की तिथून निघण्याची इच्छा होत नाही. एका जागेवर उभं राहून सुद्धा असं वाटतं की पाण्याचा प्रवाह आपल्याला पुढे-पुढे सरकवत नेत आहे. पण आपण मात्र तिथेच असतो. कदाचित आपल्या आयुष्यातील माणसं सुद्धा अशीच असतात. त्यांच्या संगतीमुळे कधी आपण आपल्या जीवनात पुढे जातो किंवा कधी आपल्या संगतीमुळे ते. मला तर असं वाटतं की आपल्यालाही आयुष्यात आपल्या बरोबरीच्या माणसांशी तडजोड करून जीवनात प्रगती करण्यासाठी हा संगम एक मोठी शिकवणच देतो. जितका वेळ तुम्ही त्या संगमावर व्यतीत करालं, तितका कमीच वाटतो, हीच तर त्याची जादू आहे! तरी जादूची मजा ही सांगण्यात नाही तर अनुभवण्यातच असते. संगम पाहून तर डोळ्याचे पारणे फिटते हो, तर तुम्हीही एकदा या 'पृथ्वीवरील स्वर्गाचा अनुभव' नक्की घ्या. कोकण आपलोच आसा!

# संगम अनेक कृष्णांचा




## कनक काटदरे

प्रथम वर्ष ,कनिष्ठ महाविद्यालय, कला शाखा


संगम तुझ्या बासरीच्या मधुर सूरांचा,
जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या गीतेशी.
तुझ्या दैवी शक्तीने वध केलेल्या असुरांचा,
तुझ्या सख्या – गोपिंशी.

संगम अल्लड मुरलीधराचा,
त्या एकमेव वासुदेव कृष्णाशी!

संगम तुझ्या नंदागावातील लीलांचा,
महाभारताआधीच्या कृष्ण शिष्टाईशी.
आईशी बोललेल्या लाडीक बोलांचा,
तुझ्या कणखर, कठोर शब्दांशी.

संगम त्या नटखट बालकाचा,
त्या एकमेव वासुदेव कृष्णाशी!

संगम गोपिकांसोबत रास खेळण्याचा,
गोवर्धनगिरीधारीशी;
गोपिकांच्या खोड्या काढण्याचा,
कृष्णेची लाज वाचवण्याशी.

संगम गोकुळच्या 'लल्लाचा',
त्या एकमेव वासुदेव कृष्णाशी!

संगम मटक्या फोडून लोणी चोरणाऱ्या,
विदुरा घरी भोजन करणाऱ्या,
श्री हरी शी.

संगम देवकी नंदनाचा,
त्या एकमेव वासुदेव कृष्णाशी!

संगम वीरक्त असूनही
राधेत मन गुंतण्याशी;
आपण सगळ्यांचे असल्याचे भासवण्याचा,
साऱ्यांना आपल्यात सामावण्याशी.

संगम सगळ्या रंगात रंगून
आपला रंग वेगळा असणाऱ्या,
निळ्या नभातील, निळ्या जलातील
त्या घननिळ्याशी.
यूगांयुग संधिकालात रंगणाऱ्या,
त्या सावळ्या कान्ह्याशी!

# वे अर्धनारीश्वर कहलाए...



कुंजल दवे

द्वितीय वर्ष, कला शाखा

एक वैरागी एक राजसी
असंभव जिनका संगम था,
भाग्य ले आया आमने सामने
किसी महागाथा का यह आरंभ था |

सौभाग्य ही थे दक्ष के
जो आदिशक्ति घर आयी,
अवतार लिए पुत्री रूप में,
वह जगत सुंदरी "सती" कहलायी |

छोड़े सारे राजविहार,
जानी जबसे शिव की महिमा
और दक्षायणी राजकन्या जो थी,
अब होने चली शंकर की उमा |

पिता के विरुद्ध छोड़ा आंगन
बनी कैलाश स्वामिनी,
वैराग्य से जिनको संसार में लायी
हुई उन महेश की अर्धांगिनी |

पर समय आया वियोग का
जब बिन बुलाए लौटी बाबुल के घर,
सुनकर वहाँ अपमान सिंदूर का
झोंक योगाग्नि में खुदको, छोड़ा शरीर नश्वर |

शक्ति से जो पूर्ण थे
अब अधूरे हो गए,
देख सती का मृत शरीर
शिव शव से वैरागी हो गए |

किंतु भाग्य को कहाँ मान्य था,
कि मिलन अधूरा रह जाए ?
कि जब प्रेम परिशुद्ध हो,
तब कौन संगम रोक पाए ?

लिया जन्म हिमावन के घर
अब हैमावती "पार्वती" कहलायी,
गंगा और विष्णु की अनुजा वो,
फिर बनने चली महादेव की परछाई |

# पान क्र. ५९

कठोर तप कर पाया उन्हें
और शिव पुनः पूर्ण हुए,
कैलाश भी आनंदित हो उठा
जो उसपर माता के पग पुनः पड़े |

प्रकृति और पुरुष के संगम को
महत्ता जिन्होंने दिलायी,
गौरी - शंकर की इस गाथा ने
जग को प्रेम की परिभाषा समझायी |

संगम हुआ तो ऐसा हुआ
कि दोनों अलग न रह पाए,
विश्व पूजता भी जिन्हें संग
आज वे अर्धनारीश्वर कहलाए,
आज वे अर्धनारीश्वर कहलाए...

# आरतीचा डीपी




क्रिशा जोशी — तृतीय वर्ष, कला शाखा

अनुवाद:

यशोधन देवधर — द्वितीय वर्ष, कला शाखा


आरती आणि अंजलीची नुकतीच भेट झाली होती. दोघींमध्ये फक्त सात महिन्यांचा फरक होता, पण एकीला झाकावं आणि दुसरीला काढावं, एवढं साम्य. अंजली आणि आरती, आरती आणि अंजली..... त्यांच्या नावातच काहीतरी जगावेगळं होतं. काढलेल्या असंख्य फोटोजमधून एक निवडायला आरती फार वेळ लागला नाही, होतीच ती एवढी तंत्रज्ञान-कुशल! अंजलीच्या बोटांची जादू प्रकर्षाने जाणवत होती, कारण आरतीचं खरं रूप तिने त्या फोटोत साठवलं होतं. कोणीच हसू नये अशा स्वतःच्या एखाद्या विनोदावर खदाखदा हसणारी ती आरती..... अंजलीने नाही पाहिली तर मग कोणी पाहिली? फोटोकडे एकटक बघत, त्याला तिचा नवा डीपी म्हणून निवडण्यात फार वेळ लागला नाही.

**************************

शनिवारची संध्याकाळ होती. भाताला फोडणी द्यायची होती..... पण वाफ अजून मुरत असल्याने, प्राध्यापिका नलिनी कामथ, ह्यांना एक वीस मिनिटांची उसंत होती. काहीतरी नवीन पाहावं म्हणून डीपी बघू लागल्या, तोच आरतीचा फोटो त्यांच्या नजरेत भरला. सगळ्यांच्या डीपी बदलण्यामागे 'नाविन्य' दडलेलं असतं, इथे तर साम्य होतं. तोच हसरा चेहरा बघणं म्हणजे त्या वाफाळत्या स्वयंपाकघरात वाऱ्याची थंडगार झुळूक आल्यासारखं होतं. साध्या-सरळ गोष्टींमध्ये, चुकलेल्या गणितांमध्ये आरतीला विनोद दिसायचे; तिचं ते निरागस, उत्सफुर्त हास्य अबाधित राहिल्याचं पाहून तिच्या नलिनी मॅडमना समाधान वाटलं.

**************************

प्रत्येक सकाळी येणाऱ्या 'सुप्रभात' च्या मेसेजेसच्या लोंढ्यातून हितेनला एक चांगला मेसेज सापडला, तो लगेच आरतीला पाठवावसा वाटला. त्या छोट्याश्या गोळ्यात तिचं ते निखळ हास्य बघता, जीव काळजीने जड झाला. आपल्या मुलीचा सालसपणा तो जाणूनच होता, त्याचंच प्रतिबिंब त्या फोटोमध्ये उमटलेलं होतं.

हितेन बसला, तो काळजीने - तिचा हा निरागसपणा जपणारं, तिला एवढंच खुश ठेवणारं सासर तिला मिळेल का? तो उठला तो निर्धाराने, तसं सासर मिळवून देण्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेऊन.

**************************

दिवाळीच्या सुट्टीत घरी परत येणाऱ्या वर्षाने आरतीचा डीपी बघितला, आणि चुकल्याचुकल्यासारखं वाटलं. आरतीला भेटून बराच काळ लोटला होता, आणि तिचं हसू ऐकण्यालासुद्धा. एकेकाळी सख्खे शेजारी आणि पक्क्या मैत्रिणी असलेल्या, गच्चीच्या पायऱ्यांवर तासंतास गप्पा मारणाऱ्या ह्या दोघी, आता विडिओ कॉल वरूनच बोलू शकत होत्या. पण त्या क्रूर, थकवण्याऱ्या नोकऱ्यांच्या दुनियेत प्रवेश केल्यावर, एवढं दुर्मिळ बोलणंसुद्धा खुंटलं होतं. आता तेच २-४ औपचारिक मेसेजेस उरले होते. अखेरीस, वर्षाने सर्व नित्यक्रम डावलले, आणि आरतीला फोन लावला.

**************************

आदित्यचं नाव शोधता शोधता, गौरवने चुकून आरतीचा नंबर पाहिला आणि 'तो' फोटोसुद्धा. जुन्या प्रियकराच्या त्या आसुसलेल्या नजरेने तो फोटो बघताना, दोघांचं शेवटचं संभाषण आठवू लागला; त्याला खूप कष्ट घ्यावे लागले. ब्रेकअपनंतरच्या बऱ्याच कालावधीत, तिची ख्याली-खुशाली विचारायला तो ओशाळायचा, अस्वस्थ व्हायचा, म्हणून तिचं तो डीपी बघूनच समाधान मानत असे. एकदा तर तो न दिसल्याने, तिने आपला नंबर डिलीट केला का काय, ह्या भीतीने ग्रासला गेला होता. काय त्या प्रेमभंगाच्या उथळ भावना! पण, आपला नंबर तिने साठवून ठेवला पाहून नकळत का होईना, त्याच्या मनाला शांती मिळाली. रोजच्या कामांना वेगळी ऊर्जा मिळाली.

**************************

एवढ्या कोलाहलात मात्र, आपण विसरून गेलो की आज आरतीचा २३वा वाढदिवस. ती स्वतःच विचार करते आहे : मी, आरती दास, कोण आहे? नलिनी मॅडमची सदा-हसरी विद्यार्थिनी, का हितेनची निर्मळ मुलगी? वर्षाची बडबडी मैत्रीण, की गौरवपासून दुरावलेली प्रेयसी? हलक्याफुलक्या विचारांची आरती, का भारदस्त विचारांची आरती? एक फोटो, एक आठवण, एक भास, की लोकांच्या दृष्टिकोनांना अनुसरून वेगवेगळी रूपं धारण करणारी एक जगावेगळी कलाकृती? कदाचित, ती ह्या सर्व गोष्टींचा संगम असेल - अपेक्षांचा, भावनांचा, स्वातंत्र्याचा. कदाचित......

# मी नेमकी कोण आहे?




शामल राजेंद्र शेलार — द्वितीय वर्ष, कला शाखा

अनुवाद:

अवनी सिनकर — द्वितीय वर्ष, कला शाखा




बालपणापासूनच मला परिस्थितीकडे बघण्याचे विविध दृष्टिकोन मिळत गेले. माझ्या शालेय दिवसांत आम्ही माझ्या आजी - आजोबांसोबत राहत असल्यामुळे असावं हे कदाचित. त्यांच्या विचारसरणी आणि पद्धती, माझ्या आई-वडिलांच्या विचारांपासून फार वेगळ्या होत्या. सुरुवातीला माझ्यासाठी या दोन्ही विचारसरणी एक वादाचा विषय ठरल्या पण हळूहळू कदाचित मी यांचा उत्तम समतोल साधण्यात यशस्वी झाले असावे.

माझी आई नोकरी करत असल्याने ती आम्हाला सुट्टीच्या दिवसांशिवाय फार क्वचित वेळ देऊ शकायची. त्यामुळे, साहजिकरीत्या मी माझ्या आजी-आजोबांसोबत माझे बालपणाचे जास्तीत जास्त दिवस घालवले.

माझ्यावर झालेल्या संसकारांबद्दल किंवा माझ्या घडवणीबद्दल बोलायचे झाले तर मला वाटतं की यात जितका माझ्या आई - बाबांचा वाटा आहे, तितकाच माझ्या आजी-आजोबांचासुद्धा. माझी आई माझा अभ्यास आणि शाळेतील इतर गोष्टी सांभाळायची, मग ते कथा वाचनात भाग घेण्यासाठी मला आग्रह करणे असो (ज्याची मला हळूहळू आवड लागली), किंवा मग माझ्यासाठी ३ मिनिटांची नृत्यरचना करणे असो (ज्यासाठी मला बक्षीस सुद्धा मिळाले होते). जितकी माझी आई माझे परीक्षेतील गुण सुधारण्यात आणि आंतरशालेय स्पर्धांमध्ये मला मदत करण्यात महत्त्वाची होती, तितकीच माझी आजी माझ्यावर माया करण्यात होती. ती माझ्या आजोबांना धमकी देऊन, मी मागितलेली प्रत्येक गोष्ट मला मिळवून द्यायची. माझे आजोबादेखील एक आदर्श पती आणि सर्वात प्रेमळ आजोबा असल्यामुळे, माझे सगळे हट्ट पूर्ण करण्यासाठी धडपड करायचे. मला एका नकाशाची प्रिंट आऊट हवी असताना, सायबर कॅफेच्या मालकाला दुकान उघडण्यासाठी रात्री सडे अकरा वाजता फोन करण्यापासून मी चॉकलेट विसरले म्हणून बस स्टॉप पर्यंत अनवाणी धावत येण्यापर्यंत, त्यांनी माझ्यासाठी सगळे केले आहे. यात शंका नाही, की मी प्रचंड लाडावलेली नात होते.

एक कुटुंब म्हणून, आम्ही मुख्यत्त्वाने खूप धार्मिक नाही आणि ही गोष्ट माझ्या आई बाबांमध्ये आणि आजी आजोबांमध्ये मला समानतेने दिसून येते. त्यामुळे माझ्या घरी बहुतेक गोष्टी पुरोगामी किंवा पुढारलेल्या विचारांचे अनुसरण करणाऱ्या असतात. माझ्या मते, माझे व्यक्तिमत्त्व हे इतरांच्या माझ्यावरील प्रभावामुळे घडले नसून, त्यात माझ्या वैचारिक जडणघडणेचा मोलाचा वाटा आहे. माझ्या कुटुंबातील सर्वांचे विचार, सवयी, त्यांच्या कल्पना मी नेहमी ऐकून घेते, पण त्या आत्मसात करायच्या की नाही, हा कायमच माझा निर्णय असतो.

जेव्हा covid मुळे आजी आजोबांना गावी परत जावे लागले, तेव्हा मला फार दुःख झाले. मला वाटले होते की ह्यामुळे आमच्यात दरी निर्माण होईल आणि आमचे संबंध कमकुवत होत जातील. पण आश्चर्याने तसे झाले नाही. मी अजूनही त्यांच्याशी तितकीच जोडलेले आहे जितकी मी वयाच्या पाचव्या वर्षी होते. मी माझ्या आजोबांना अजूनही माझ्या कॉलेज मधल्या गमतीजमती सांगते, अगदी तेव्हा सांगायचे तसेच. माझी आजी इतके चविष्ट चिकन कसे बनवते हे काही मला आजपर्यंत उमगलेले नाही. ती वापरते तेच साहित्य घेऊन, आम्ही ते बनवण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी तिच्या हाताची सर इतर कशालाही नाही. जरी आमच्यात खूप अंतर असलं तरी मला असं वाटतं की माझ्या मनातील मोठा हिस्सा त्यांच्यासाठी राखून ठेवलेला आहे आणि कायमच राहील.

माझे असे ठाम मत आहे की या चार व्यक्तींशिवाय मी आज जे काही आहे, ते नक्कीच बनू शकले नसते. माझ्यातील गुण - मग ते कमी बोलणे , इतरांसोबत कमी मिसळणे - जे माझ्या आईकडून मला मिळाले, माझ्यातील संवेदनशीलता आणि हळवेपणा जो माझ्या बाबांकडून आणि आजोबांकडून माझ्यात उतरला आणि आपल्या माणसांसाठी स्वततःला झोकून देण्याची वृत्ती माझ्या आजीची मला दिलेली देण आहे आणि म्हणूनच मी या सर्वांचा एक उत्तम संगम आहे असे म्हणणे उचित ठरेल. आपल्याला घडवणाऱ्या सर्व व्यक्तींचे विविध रंग आपल्यात सामावून घेण्यात एक वेगळाच अवर्णनीय आनंद असतो ना! मी जिथे कुठे जाईन, त्या प्रत्येक ठिकाणी त्यांचा एक भाग मी माझ्यासोबत नेईन. ते कायम माझ्या हृदयाचा एक अविभाज्य घटक असतील. कायम.

# मुंबई मेरी जान!




## आशी सचिन वैद्य

द्वितीय वर्ष, कला शाखा


"ऐ दिल है मुश्किल जीना यहाँ
ज़रा हट के, ज़रा बच के,
ये है बॉम्बे मेरी जान!"

गीतकार मजरूह सुलतानपुरीचे शब्द अगदी काटेकोरपणे मुंबईचे खरे रूप दर्शावतात.
जिथे मराठी मिसळ आणि गुजराती ढोकळा एकाच दुकानात मिळतात,
तुटक्या हिंदीची भाषा प्रत्येक टॅक्सी वाल्याला कळते,

जिथे आय. पी. एल. ला चेन्नई आणि पंजाब मध्ये विभागलेले मित्र,
वर्ल्ड कपला मात्र खांद्यावर हात घालून टीव्ही समोर उभे राहिलेले दिसतात,
ती आहे मुंबई.

जिथे दिवाळीला लावलेले आकाशकंदील,
ख्रिसमस संपेपर्यंत प्रकाशित राहतात,
जिथे संक्रांतीला तिळगुळ आणि त्याच निमित्त पोंगलचे पायसम मिळते,
जिथे झिंगाटवर गरबा करताना पूर्ण चाळ दिसते,
ती आहे मुंबई.

सायंकाळी लोकलमध्ये थकून येणाऱ्या प्रवाशाचे डोके जर खांद्यावर टेकले,
तर त्याला मुक्याने आधार देणे, स्वतः थोडं श्वास हळू घेणे,
आणि त्याच्या झोपेत जणू आपलीच विश्रांती झाली आहे असे वाटणे,
ती आहे मुंबई.

मुंबई एका माणसाने, एका संस्कृतीने नाही निर्माण झाली; इथली लोकं, इथले खाद्यपदार्थ, इथले विविध वेश, भाषा, बोली, सण, इतिहास, ह्या सर्वांचा जणू संगम आहे मुंबई,
तुमच्या आणि माझ्या संगमाने बनली आहे ही मुंबई,
भारताचा जणू एक स्वल्प रूपच आहे ही मुंबई!

# गुरुछाया




## अवनी सिनकर
### द्वितीय वर्ष, कला शाखा


कदाचित मनुष्याचे जीवन परिपूर्ण बनवते ते माणसांचे मिलन. माणसा-माणसांच्या संगमाशिवाय जणू आपले आयुष्य अपूर्णच असते. कोणी आपले आई-वडील, कोणी भाऊ-बहीण तर कोणी मित्र म्हणून आपल्या जीवनात येतात. पण या नात्यांव्यतिरिक्त अजून एक उल्लेखनीय नाते म्हणजे गुरु-शिष्याचे. माणसाला खऱ्या अर्थाने माणूस बनवणारा तो गुरु आणि गुरूला त्याच्यातील गुरुत्वाची जाणीव करून देणारा तो शिष्य. भारतीय संस्कृतीत परमोच्च महत्त्व दिले जाणारे हे नाते, आपल्या सर्वांच्याच जडण-घडणीतला मोठा भाग असते.

मला लहानपणापासून चांगले गुरु लाभले हे माझे भाग्यच. बालवाडीतल्या आवडत्या शिक्षिका असो किंवा माझ्यावर सर्वात जास्त प्रभाव पडणारे मोहिते सर, सर्वांचाच माझ्या आयुष्यात एक मोठा वाटा आहे. अभ्यासाव्यतिरिक्त, लहानपणापासूनच मला नृत्याची आवड. माझ्यातली कला बघून, आईने जवळच्या नृत्य कला केंद्रात मला घातले. कथक नृत्याचे प्राथमिक संस्कार माझ्यावर तिथेच झाले. त्यानंतर काही कारणाने आम्हाला दुसऱ्या शहरात स्थायिक व्हावे लागले. माझे नृत्य शिक्षण पूर्ण व्हावे म्हणून आईने मला 'स्वानंद कला प्रसारक केंद्रात' घातले. नव्या क्लासमध्ये, नव्या शिक्षकांसोबत आणि मुलींसोबत मिसळण्यात मी वेळ घेतला. सुरुवातीला मला ते आवडेनासे झाले पण हळू-हळू त्याची सवय झाली, इतकी, की ते माझे दुसरे घर बनले. पण हे घर वेगळे होते. या कुटुंबात मोठ्यांना ताई आणि दादा म्हणून हाक मारतात, मग त्या तुमच्या गुरु असल्या तरीही. कदाचित यामुळेच मला ते 'घर' वाटते, जिकडे काही चुकले तर ताई ओरडते, काही चांगले केले तर ताई बक्षीस देते, काही अडचण अली तर दादा मदत करतात आणि प्रत्येक यश हे सर्वांचे यश मानले जाते. या कुटुंबाचे विठ्ठल-रखुमाई म्हणजे आमचे संदीप दादा आणि स्वाती ताई ज्यांनी ही संस्था स्थापन केली आणि गेल्या १५ वर्षांपासून कलेच्या प्रसाराचे कार्य

अतिशय उत्तम रित्या करत आहेत.

कथक नृत्य म्हटलं तर ताल-लयीचा संगम येतोच. पण त्या नृत्य प्रकारातून 'स्वानंद' घ्यायला शिकवला तो मला स्वाती ताईने. तिची वरिष्ठ शिष्या म्हणजेच माझी लाडकी दर्शना ताई हिच्याशिवाय जणू माझे एका नृत्यांगनेत रूपांतर होणे शक्यच नव्हते. या दोघींनी कायमच मला आणि केंद्रातील सर्वांनांच आपल्या मुलांप्रमाणे वाढवले, वेळेस रागाचे चार शब्द सुनावले तर कधी मायेची फुंकर घातली. रोजच्या धावपळीच्या जीवनात, एखाद्या रविवारी जेव्हा ताई कुठलीतरी नवीन बंदिश शिकवते, तेव्हा एक नवीन ऊर्जा संचारते.

कथ्थकची  खासियत म्हणजे त्यातील चकरा किंवा गिरक्या. एकदा रियाझ करताना मी चकरा मारत होते. ताईला अचानक माझ्या समोर उभे असलेले पाहून मी थांबले. त्यावर ती म्हणाली "अगं, थांबलीस कशाला? मार की अजून. तुला चकरा मारताना बघून असा वाटलं की बंदिश अजून मोठी असायला हवी होती." तिचे हे शब्द माझा मनात इतके कोरले गेले की पुढचे बरेच महिने मला आनंद शोधायची गरजच भासली नाही, तो स्वानंद माझ्यात होताच! मुद्दा असा, की १३-१४ वर्षांच्या परिश्रमानंतर गुरुने केलेले कौतुक हीच तुमच्यासाठी सगळ्यात मोठी गोष्ट वाटू लागते, त्याची सर दुसऱ्या कुठल्याही पुरस्काराला नाही.

हे मात्र खरं की शास्त्रीय कला शिकणाऱ्या प्रत्येकाच्या मनात त्यांच्या गुरूबद्दल एक वेगळाच आदर असतो, मुळात ही परंपराच तशी आहे. तेच त्याचे वेगळेपण असावे. माझ्या गुरूंनी मला काय दिले असे विचारले, तर त्यावर मी म्हणेन की त्यांनी मला सगळंच दिलं. कला दिली, कलेची जोपासना करायला शिकवली, अतूट अशी नाती दिली, जीवनाकडे बघायचा नवीन दृष्टिकोन दिला, कलेशिवाय जीवन व्यर्थ असते याचा प्रत्यक्ष अनुभव दिला.  त्यामुळे माझ्यासाठी माझे जीवन समृद्ध करणाऱ्या माणसांपैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे माझे गुरु असतील.

लहान असताना स्वानंदच्या भिंतीवर एक सुविचार लिहिला असायचा-'गुरुकृपा होता स्वप्न होई पुरे, गुरु छायेविना जीवन हे अधुरे'. १३ वर्षानंतर त्याचा खरा अर्थ मला गवसला.



## तीर्था जया उदय सामंत

मुख्य सचिव 2021-22, संगीत विभाग
प्रमुख 2020-21, सदस्य 2019 - 20

# मिलन आणि संगम

तुम्हा वाचकांची नजर आणि माझ्या कवितेतील शब्दांचं आत्ता, या क्षणी, मिलन होतंय;
ही कल्पना तुम्हाला उमजणे
तुम्ही त्यावर विचार करणे, चेहऱ्यावर सहमताचे भाव उमटणे - यांचा जणू संगम होतोय.

दवबिंदूचे पानांशी, पावसाच्या थेंबांचे मातीशी होते, ते मिलन;
धबधब्याचा नदीशी, नदीचा समुद्राशी, समुद्राचा महासागराशी होतो, तो संगम.

दोन जिवांचे, दोन शरीरांचे होते, ते मिलन;
दोन जिवलगांच्या विचारांचा, भावनांचा होतो, तो संगम.

मिलन ध्येयाचे आणि परिश्रमाचे झाले तर होते, ती स्वप्नपूर्ती;
संगम संवेदनांचा, सर्जनशीलतेचा, कल्पनांचा आणि शब्दांचा झाला तर होते, ती नवनिर्मिती.

अपूर्णतेकडून पूर्ततेकडे जाते, ते मिलन;
स्वतंत्र अस्तित्वाला नव्याने पूर्णता देतो, तो संगम.

माझे मराठी वाङ्मय मंडळाशी असलेले नाते म्हणजे, एक मिलन;
मंडळाने मला दिलेला आमोद, आठवणी, नात्यांची पखरण आणि तेजोमय अनुभव यांची जोड म्हणजे, एक संगम.



## कु.मानसी संतोष मनाली पंडित

संगीत विभाग प्रमुख २०१९-२०, मुख्य सचिव २०२०-२१ आणि मंडळाची आजीव सदस्य

# म.वा.मं. - संगम कलागुणांचा!

विद्यार्थी जीवनात, शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच, एकंदरीत व्यक्तिमत्त्व विकासासाठी, विद्यार्थ्यांच्या सर्व कलागुणांना वाव मिळणं ही आजच्या काळाची गरज आहे! तर अभ्यासाबरोबर हाच कलागुणांचा संगम माझ्या महाविद्यालयीन जीवनात जोडला गेला तो म्हणजे आपल्या मराठी वाङ्मय मंडळामुळे..!

मी जेव्हा झेवियर्स महाविद्यालयात अकरावीत प्रवेश केला, तेव्हा इथल्या नवीन संस्कृतीने, अनेक महोत्सव, ऑर्गनायजेशन्स, त्यांचे विविध कार्यक्रम ह्या सर्वांमुळे खूप भारावून आणि गोंधळून गेले होते. शाळेपासूनच विविध शिक्षणेतर कार्यक्रम नि कला ह्यामध्ये सक्रिय असायचेच, पण इथे नक्की आपण कशात सहभागी होऊ शकतो, आपल्याला काय जमेल हे कळत नव्हते आणि तेव्हाच अचानक, जसं उन्हाळ्यात एक थंडगार वाऱ्याची येणारी झुळूक असते ना, ती आपलीशी करून, खूप सुखावून जाते नि मग हवीहवीशी वाटू लागते अगदी तसंच माझी ओळख आपल्या मराठी वाङ्मय मंडळाशी झाली आणि मग हा स्वतःच्या कलागुणांना शोधण्याचा गोड प्रवास सुरु झाला!

माझ्यासाठी, आपलं मराठी वाङ्मय मंडळ म्हणजे कलागुणांचं माहेरघर आणि जिव्हाळ्याचं असं आपलं एक कुटुंब आहे. एकमेकांच्या सुखदुःखांना गोंजारणारं, मायेच्या उबेत सर्वांना सामावून घेणारं, आनंद आणि उत्साह यांनी ओसंडणारं, पाठीवर शाबासकीची थाप देणारं आणि बरं का, उगाच चूकलात तर प्रेमाने कान धरणारं, असं आपलं हे म.वा.मं.!!

आज महाविद्यालयातून बाहेर पडून ३ वर्ष झाली पण तरीही म.वा.मं.मध्ये शिकलेल्या अनेक गोष्टी मी माझ्या आजच्या आयुष्यात देखील आत्मसात करते. मग ते एखाद्या गोष्टीचं नेतृत्व करणं असो की आत्मविश्वासाने बिनधास्त एखादं सादरीकरण करणं. त्यामुळे, आपल्या सर्व विद्यार्थी दोस्तांना मला हे आवर्जून सांगावंसं वाटतं की आयुष्यात सर्वांनी कुठली ना कुठलीतरी एक 'कला' नक्कीच जोपासावी, कारण आयुष्यात माणसं येतील-जातील पण कलेसारखा आपला सख्खा मित्र आपली साथ कधीच सोडून जाणार नाही आणि त्यासाठीच आपल्या महाविद्यालयीन जीवनात जर हे कलागुणांचा संगम असलेलं सुंदर माहेरघर म्हणजेच आपलं मराठी वाङ्मय मंडळ असेल तर आणि काय हवंय, नाही का!?



## दुर्गा येसादे

साहित्य विभाग प्रमुख २०१९-२०,
संपादिका २०२०-२१

# (जोड)ण घडण

महिन्यातलं त्यांचं सातवं - नाही आठवं भांडण असेल आज. खरं सांगू? माझ्या आई बाबांचे कोणतेच गुण जुळत नाहीत. त्यांचं एकमत होत नाही कुठल्याच मुद्द्यावर आणि सारखा वाद ऐकावा लागतो मला. कुठल्यातरी विषयावर त्यांचं पटत असेल का ह्या प्रश्नाने मला सतावलं होतं आणि त्याचा शोध घ्यायला काही शब्दांची आणि आई-बाबांच्या त्यांच्याबद्दलच्या मतांची यादी बनवली आहे. बघूया काही मिळतंय का:

**मजा**
बाबाला मजा करायची असते तेव्हा तो बहुतेक वेळा आपल्या मित्रांसोबत फिरायला जातो. पण आईची मजा? घरी राहून वाचत बसा किंवा सिनेमे पहा. बाबा एका फुलपाखरासारखा आहे तर माझी आई मात्र आहे अस्सल घरकोंबडी.

**वेळ**
यांच्या वादांचं एक मोठं कारण असतं वेळ! आईला बाहेर जाताना वेळेवर निघून, वेळेवर पोहोचून, वेळेवर परतायचं असतं. दुसरीकडे आहे बाबा - जो नेहमी आरामात गोष्टी करायला पाहतो. आईच्या शब्दांत त्याला वेळेचं बिलकुल भान नाहीये आणि बाबाच्या मते तिला जगभराची घाई असते.

**लोकं**
आईला जास्त लोकांमध्ये जायला आवडत नाही. नेहमी बघितलं तर तिच्या शाळा-कॉलेज पासूनच्या चार-पाच मित्र-मैत्रिणींसोबतंच असते. त्याच्या पूर्णविरोधात आहे माझा बाबा, ज्याचा प्रत्येक महिन्याला मित्रांचा गोतावळा वाढतंच असतो. माणूसवेडा म्हणू शकतो आपण त्याला.

**आवडीनिवडी**
रंग: आई - निळा, बाबा - लाल

चित्रपट: आई-बार्बी, बाबा-बाजीगर
खेळ: आई- अजिबात आवड नाही, बाबा- बास्केटबॉल, क्रिकेट, बेसबॉल, इत्यादी
पुस्तक: आई- अर्थशास्त्र, बाबा- वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलीटयूड

देवा..साधर्म्य इथे मिळणे नाही! शेवटी कंटाळून ही यादी त्यांना संध्याकाळी दाखवली. आईने एकदाच वाचून माझ्याकडे नजर वळवली तर बाबा पुन्हा वाचून खात्री करून घेत होता की हा त्याच्याच अकरा वर्षाच्या मुलीने केलेला उपक्रम आहे. काही क्षणांसाठी एकमेकांकडे पाहून आई शेवटी म्हणाली,

"अगं चिंगे, तू लिहिलेल्या सगळ्या गोष्टी आहेत मान्य पण एक गोष्ट अशी आहे जी आम्हा दोघांना खूप प्रिय आहे."
"कोणती?"
"एक अशी गोष्ट जी माझी आणि तुझ्या बाबांची निर्मिती आहे, तो आमच्या दोघांमधला समान धागा म्हणू शकतो आपण.."
"....?" माझं डोकं चालेना.

"आमची लेक!" बाबा हसत म्हणाला. "अगं खुळे, आम्ही एकदम वेगळे आहोत म्हणूनच एकमेकांसाठी परफेक्ट आहोत. एकमेकांमधले फरक आमच्या नात्यात समतोल आणतात. पण माझ्या आणि तुझ्या आईच्या वेगळेपणाचा संगम म्हणजे तूच!"

सात महिन्यात पहिल्यांदाच आई-बाबांनी एक सुरात डोकं हलवलं आणि मला घट्ट मिठी मारली.



प्रणव काफरे
जनसंपर्क (बाह्य) विभाग प्रमुख (२०२१ -२२),
सहाय्यक महासचिव व्यवस्थापन (२०२२ -२३)

# १०१* नाबाद!

काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत मला प्रश्न विचारला गेला, की "परप्रांतीय महाराष्ट्रात येत आहेत, त्यामुळे तुमच्या संस्कृतीचा हळू हळू ऱ्हास होत चालला आहे, असे तुला नाही वाटत का?"

याला उत्तर देत असता मी म्हटलो,"सर्वप्रथम मी या प्रसंगाला वेगळ्या दृष्टीने पाहतो. मला वाटतं, जे अ-महाराष्ट्रीय बांधव आपल्या राज्यात येत आहेत, ते काही ना काही आपल्या चाली-रीती, परंपरा कळत नकळत अनुभवत आहेत. मग जेव्हा ते त्यांच्या राज्यात जातात, ते नकळत त्या गोष्टी तिकडे भले ही, ते fusion च्या रुपात का होईना, पण त्याचा अवलंब करतात. याद्वारे, मला वाटतं, महाराष्ट्रीय संस्कृतीचा प्रसार होत आहे. हेच माझ्या संस्कृतीचं वैशिष्ट्य आहे, ती सर्वांना आपलसं करून घेते."

हे सांगायचा उद्देश्य की, मराठीला रुजवा, फुलवा आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवा. ते म्हणतात ना, "प्रत्येक लांब प्रवासाची सुरुवात, पहिल्या पावलाने होते.”

हेच ध्येय उराशी बाळगून म. वा. मं. गेल्या १०० वर्षांपासून झटत आहे. प्रत्येक प्रवासात अडचणी असतातच. आम्ही त्यास काही अपवाद नव्हतो. याच अडचणींच्या उरावर बसून आजतागायत मंडळ दिमाखात उभे आहे आणि राहील.

असंख्य अडचणींना अक्षरशः फाट्यावर मारत मंडळ उत्तरोत्तर प्रगती करत आहे. नवनवीन अ-मराठी बांधवांना मंडळाने आपलेसे केले आहे, त्यांपर्यंत आपली संस्कृती पोहचत आहे. मंडळी, फाटा म्हणजे जिथे दोन रस्ते संपतात आणि नवा रस्ता सुरु होतो. बाकीचं मी तुमच्यावर सोडतो! तुम्ही समंजस आहात.

# नाती आपुलकीची- म.वा.मं. आणि कार्यकारिणी



## गौरी देशपांडे

### साहित्य विभाग प्रमुख

संगम म्हटल्यावर माझ्या डोळ्यासमोर एकच चित्र उभं राहतं - रंगमंचाचं. मी मोठ्या प्रमाणात कधीच रंगमंचावर काम नाही केलं, किंवा इच्छा असताना देखील नाटक सादर केलं नाही, पण रंगमंचाच्या बॅकस्टेजचा अनुभव घेतला आहे. पटकथा असो किंवा दिग्दर्शन, मला छोट्या पातळीवर दोन्ही करायला मिळाले.

पण ह्यांचा अनुभव घेत असताना माझ्या मनात एकच विचार येतो, हा रंगमंच जिवंत होतो विविध लोकांमुळे. आता आपल्याच मंडळाच्या एका नाटकाचं उदाहरण घ्या. नाटक बनवण्याची सुरुवात होते साहित्यच्या संवाद लेखनापसून. मग येते नाट्य विभागाच्या कलाकारांची तयारी. संगीत आणि नृत्य विभागांची सादरीकरणं पण तयार होतात. मग कलाच्या backdrop मुळे सगळं काही एकत्र होऊन समोर येतं. त्यात परत व्यवस्थापन विभागाचाही मोलाचा वाटा असतो. सगळ्यांचा संगम मंचावर नाटक म्हणून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून सोडतो.

संगम हा फक्त विभागांचा होत नाही, तर त्या नाटकात गुंतलेल्या सगळ्याच व्यक्तींचा होतो, त्यांच्या कलपनशक्तीचा, त्यांच्या विचारधारेंचा, प्रतिभेचा, गुणांचा संगम होतो.

ह्या संगमामुळे सगळी डोकी एकत्र एकाच नाटकाचा विचार करतात, पण वेग वेगळ्या पद्धतीत. त्यातून निर्माण होतात नव नवीन कलपना, आणि जन्म घेतो तो ध्यास - हातात घेतलेली गोष्ट प्रखरतेने आणि सर्जनशीलपणे पार पाडायचा.

हाच नवनिर्मितीचा वेध गाठल्यावर समोर आलेल्या प्रश्नांना तोड देण्यासाठी एक नाही तर दहा उपाय निघतात.

हा संगम मला सर्वात जास्त, आणि सर्वात जवळून मराठी वाङ्मय मंडळातून दिसला आहे- प्रत्येक टप्प्यावर, छोट्या मोठ्या सगळ्या कार्यक्रमांमधून, घेतलेल्या निर्णयांमधून दिसून येतो तोच संगम- शंभर वर्षांपासून घडत आलेल्या भावनांचा, विचारांचा, संस्कृतींचा, कलपनांचा अतूट संगम.

अशा अलौकिक संगमाचा भाग मी बनू शकले, म्हणून मी मंडळाची ऋणी राहीन.



## चिन्मयी ताम्हाणे

### अतिथी संपर्क विभाग प्रमुख

संगम हा शब्द उच्चारला की दोन नद्यांचा संगम, दोन व्यक्तिमत्वांचा संगम, दोन विचारांचा संगम हे सगळं आपल्या नजरेसमोर पटकन उभे राहते. पण तसे पाहायला गेले तर आपण जन्माला आल्यापासून आपल्या पूर्ण आयुष्याच्या वाटचालीत आपल्या आजूबाजूच्या विविध गोष्टींच्या संगमाचा आपल्यावर परिणाम होत असतो.

आपल्यातील व्यक्तिला ते अप्रत्यक्षपणे आकार देऊन व्यक्तिमत्व घडवत असतात. शालेय जीवनाच्या प्रवासात कुठेतरी आपण आपल्या पालकांच्या सुरक्षित छत्रछायेत असतो व त्यांच्या विचारांनी जास्त प्रभावीत असतो. पण महाविद्यालयातील मित्र - मैत्रिणी हे आयुष्याला खऱ्या अर्थी दिशा आणि वेग देतात .
खरंतर कोविड-19 च्या महाभयंकर कालावधी नंतर अकरावीत आमचे सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. या ऑनलाइन माध्यमात मला नवीन मित्र-मैत्रिणी या मराठी वाङ्मय मंडळाच्या व्यासपीठामार्फत मिळाले. तिथेच आम्हाला एकमेकांच्या अंगी असलेल्या कलागुणांची ओळख देखील झाली व एकमेकींच्या वैचारिक व बौद्धिक संगमातून आमच्या सगळ्यांच्या एकंदरीत व्यक्तिमत्त्वात खूपच चांगला बदल घडून आलेला आहे.
थोडक्यात माझ्याकडे असलेले संभाषण चातुर्य, अजून एका मैत्रिणीकडे असलेली नृत्यकला, एकीकडे असलेले लिखाणाचे कौशल्य, एकीकडे असलेली गायन कला व एकीची सुंदर चित्रकला या सगळ्यांची आम्हाला इतकी सवय झाली आहे की आम्ही वेळ पडल्यास प्रत्येक जण त्याच्याकडे असलेल्या कला नैपुण्याव्यतिरिक्त देखील इतर कला सादर करू शकतो.
शाळेतून महाविद्यालयापर्यंतचा प्रवास हा खरंतर कठीणच असतो. मनात असलेली शंका, चिंता, भीती या सर्व गोष्टी मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी होऊन नाहीशा झाल्या आणि कुठेतरी आपल्यासारखी विविध कलागुणांनी समृद्ध व्यक्तिमत्व देखील माझ्या ओळखीची झालीत. मराठी वाङ्मय मंडळांनी विविध व्यक्तींच्या कलागुणांचा संगम करून आणला आहे आणि गेले शंभर वर्ष हे सातत्याने करत आहे. याहून अधिक 'संगम' याचे चांगले उदाहरण काय असू शकेल? आपल्या आजूबाजूच्या परिसरातील व्यक्ती आणि त्यांचे व्यक्तिमत्व, गुण व व्यक्तिमत्त्वातील वेगळेपण यांचा संगम, जे मराठी वाङ्मय मंडळसारख्या संस्था घडवून आणतात, हाच खरा समाजाचा मूलभूत आधार आहे आणि आपल्या मानवी जीवनाचे हेच खऱ्या अर्थी सार आहे!



## ओम आढाव

## कला विभाग प्रमुख

The layers of a Confluence

Confluence, in its most basic form, is convergence or unification. However, it is layered in terms of depth. Confluence in the context of an art form can occur on at least three levels.

One: is the convergence of art forms, in which an artist can combine two unrelated styles to create an innovative way of expressing a new perspective. Let us consider M. F. Hussain's works, which are a blend of abstract with realistic. We tried something similar this year for the Inaugural. We converged painting with music, and literature.

Two: the convergence of art and the artist, in which the artist finds a way to express himself and uses every stroke of paint to show the audience something they hadn't witnessed in a long time. It is the concept that matters most, and it is always illuminating.

Three: At this point, the audience connects with the art. When they can find meaning in the art, they have correctly grasped it. Not necessarily what the artist desires to show people but what they can feel. When you say you don't like a painting at the moment, what you mean is that you felt something after viewing it, and the third stage of the Confluence is attempting to comprehend what you felt.

MVM has always been a place for artists to display their art. It has never allowed limitations to enter the confluence of artists with their art and art with the audience. It has always appreciated artists without exception. It emphasises, in my opinion, the phrase "Not everyone can become a great artist, but a great artist can come from anywhere." Ratatouille (2007)



## तनिष्का मुजुमदार

### नाट्य विभाग प्रमुख

Xavier's is popularly known to its students for giving roots and wings. For me college made me realize that I already had them, I only needed to scrutinize and acknowledge them closely. MVM has been that safe space where I could nurture these roots and wings, from the times of elevated ambitions to actually pursuing them in this space with the people I will cherish for a lifetime! Incredible friendships which go unsurpassed to time have been nurtured here, and I have not just experienced them myself, but also witnessed a lot more of them happening in front of my eyes, and I swear I'm more than grateful for that experience. With a flick-wick for theater and drama, I happened to become a member of MVM Natya back in my FYJC, and now it feels like coming full circle as I'm leading the department myself. I'm sure this will continue to hold a special place in my heart for the unsurpassed time and moments that I have always felt to and from the core.



## सायली गवस

### नृत्य विभाग प्रमुख

'मराठी वाङ्मय मंडळ एक मंडळ नाही तर परिवार आहे' हे वाक्य अनुभवण्याचं आणि जगण्याचं भाग्य मला मिळालं. हा परिवार एक संगम आहे - माणसांचा, विचारांचा आणि परंपरांचा. इथे जरी वेगवेगळे विभाग असले तरी त्या सगळ्यांचं ध्येय एकच असतं. हा संगम कधी पडद्याआड दडलेला, तर कधी मंचावर दिसून येतो. हा संगम जितका असणं महत्वाचं, तितकच त्याला टिकवणं कठीण. ही जबाबदारी असते त्या मंडळाच्या सदस्यांची. मी आज जे काही आहे, माझे जे काही कलागुण आहेत, त्याला ह्या मंडळाने प्रोत्साहन दिले, एक दर्जा दिला. ह्या मंडाळाने मला माझ्या कलेच्या जवळ तर नेलेच पण त्याचबरोबर दुसऱ्या कलांची दारे पण उघडून दिली. त्यामुळे मी नेहमीच मंडळाची ऋणी राहीन.



# वैष्णवी बोरुळकर

## संगीत विभाग प्रमुख

"The expected is what keeps us steady; the unexpected is what changes our lives forever". The fulfillment of my dreams was totally unexpected. It all started off being as an enthusiastic FYJC kid who became a MVM member, and as they say, "once a member, always a member". The Marathi Vangmay Mandal has played a huge part in shaping my personality, in shaping who I am as an artist today and of course as the person I am today. Mandal seems like the family I chose, the family that stands by my side no matter what. It taught me how to recognize the thin line between professionalism and personal life. The enthusiastic sangeet member dreamt of standing upon the stage and singing the Abhimaan Geet alongside the other committee members and the Core. Dreams do come true, and people do cry when their dreams come true. This proved to be right as I stood upon the stage as the Sangeet head, overwhelmed, shedding tears of pure joy and pride. With great power comes great responsibility, the responsibility that changes your perspective towards people. I feel a sense of responsibility towards my sangeet members and the reciprocal respect and love I get makes me believe in the power of "संगम" more strongly. After all, Sangeet is the sangam of melodies, beats, harmonies and emotions. But moreover, संगीत is the संगम of lifelong memories created through jamming, the संगम of magic we create together through our art, the संगम of souls!



# काव्या धावले

## प्रशासन विभाग प्रमुख

मराठी वाङ्मय मंडळ - शब्द 3 असले, तरी जोडलेल्या भावना किती आहेत ते व्यक्त करणं शक्य नाही. संगम ही संकल्पना ऐकल्यावर एकच गोष्ट आठवते, "मंडळ". मंडळ म्हणजे कलेच्या exposure सोबत संगम, ECCs चा भावनांशी संगम, experience चा JC contingent सोबत संगम, trophies चा अश्रूंसोबत संगम, आणि प्रत्येक member चा मराठी संस्कृती सोबत संगम.

I was in FYJC when I first went upto the registration desk and filled the membership form with the help of Mansi tai and Prasad, having no idea how big a difference the Mandal is going to make in my life. I still remember my first Aamod, it was the first time I felt that I belonged somewhere in Xavier's, there was this sense of "home", a sense of "my people". My first intercollegiate event was Naandi'20 and as I write this while being about to prepare for one of my last intercollegiate fest, it's a bittersweet feeling, a Sangam if you'd call it of nostalgia and accomplishment paired with a blunt pain of the thought of leaving all this behind.

It has been a Sangam of the highs of winning a fest and chanting your college's name even before the announcement with wearing defeats like shining armors and taking oaths to be better while cutting a cake, no matter what the result.
The Mandal has given me people that I will cherish for life. I have met the best people here, and every single member I've worked with has taught me something.
I look upto a very few people in life and somehow that list has more people from MVM than any other place. On a more emotional-personal level, this organization has given me so much to cherish in my entire college life. It's because of this organization and its members that I am capable of doing what I do socially and on any inter-collegiate level, no matter how good or bad I am at it . The Mandal has been my "roots and wings", it has always given a stage to my abilities, has been a place where I belong to in Xavier's and always inspired me to be better. All that I strived for in the last 5 years I got to live the "Mandal life" was to give back at least 1% of what MVM has given to me, and be the reason that a JC kid, like I was, who had lost touch to her roots, finds a home in MVM Xaviers.
मंडळ चालवायला नाही मंडळ जगायला शिका, बाकी सगळं मंडळ शिकवेल.



## सूर्या आश्रिता गरिमेल्ला

## डिजिटल क्रिएटिव्स विभाग प्रमुख

Pakhran this year, with the theme of 'Sangam', became a canvas for the confluence of narratives, visuals, and perspectives, a celebration of the myriad voices shaping the Marathi culture. The creatives department has given its best in transforming the pages of Pakhran to serve as a testament to the unity found in our cultural diversity, going beyond any usual publication, and to truly embody the essence of 'Sangam'.

As the oldest club at St. Xavier's College, MVM itself holds a special place in my heart. My journey here at the Mandal from a member to the Head of Digital Creatives has been nothing short of beautiful. For me, it is more than a cultural club; it is a 'Sangam' of traditions, creativity, and friendships. Mandal is a community where I met like-minded individuals, where our ideas converged, and our shared love for Marathi culture - irrespective of our backgrounds, binded us. And in presenting this year's Pakhran, I see it as a manifestation of my own MVM journey. For me, Pakhran this year is not just a magazine; it is a testament to the Sangam that is MVM and something that truly encapsulates the ethos of the Mandal.



# योगिनी चव्हाण

## हॉस्पिटॅलिटी अँड सेक्युरिटी विभाग प्रमुख

"कॉलेज म्हटलं की धमाल मस्ती हे सर्व आलच पण कॉलेजमधल्या committees आणि त्यांचा माहोल मला झेवियर्सला आल्यावरच कळला. JC म्हणून मी जेव्हा कॉलेजमध्ये आले तेव्हा फॉयर बघून नेहमी गोंधळात पडत असे. प्रत्येक दिवशी नवा स्टॉल, नवे गेम्स आणि नवे कार्यक्रम - वेगवेगळ्या संस्थानी आयोजित केलेले आणि नवे फेस्ट्स. या गोंधळातच माझी नजर पडली म.वा. मं. च्या membership डेस्क कडे. तो डेस्क पाहताच कॉलेजमध्ये पहिल्यांदा काहीतरी आपलंसं असल्याची जाणीव झाली, आणि ह्याच जाणिवेने माझा प्रवास सुरू झाला म. वा. मं. सोबत.

JC ची दोन्ही वर्षे मी म. वा. मं. ला फक्त न्याहाळत होते. एक वर्ष प्रत्यक्षात तर दुसरे वर्ष online platforms वरून. इथलं भव्य स्वरूप, इथली माणसं, त्यांतील आपुलकी यांनी मला भुरळ घातली आणि मी सुद्धा या परिवाराचा एक हिस्सा झाले. आणि मग काय? माझा आणि मंडळाचा प्रवास एखाद्या सुपरफास्ट एक्सप्रेस सारखा सुसाट सुरु झाला. JC मध्ये नृत्य विभाग explore केल्यानंतर मी आता वळले होते नाट्य विभागाकडे. आता यात २०२१ च्या ऑनलाइन inaugural मधील 'चहा आणि बरंच काही' या नाटकापासून ते आमोदला नाट्य विभागाच्या ऑनलाइन स्पर्धा manage करण्यापर्यंत मी खूप काही शिकले, खूप लोकांना भेटले, खूप लोकांसोबत कामही केले. मुळात मी events background ची असल्यामुळे आणि शाळेत असल्यापासूनच एक कलाकार असल्यामुळे मला या विभागांमध्ये कधीच काही अडचण आली नाही. पण माझ्या डिग्री कॉलेज च्या दुसऱ्या वर्षात मला नवीन काहीतरी explore करायची खूप इच्छा होती आणि ते म्हणजे व्यवस्थापन. कार्यक्रम विभागात काम करताना मला नेहमी व्यवस्थापन विभागांबद्दल कुतूहल वाटत असे - ते कसे काम करतात, त्याला काय काय कौशल्यांची गरज असते आणि यासारखे बरेच प्रश्न मला नेहमी पडत असत. पण माझ्यातले हे कुतूहल ओळखून, व्यवस्थापन विभागात जवळून काम करायची संधी मला मंडळाने दिली. मी आमोद २०२३ मध्ये guest tapping and management ची समन्वयक झाले. माझ्यासारख्या व्यवस्थापनातील काहीच पार्श्वभूमी नसणाऱ्या व्यक्तीसाठी ही खूप मोठी जबाबदारी व संधी होती. आमोदच्या त्या २ महिन्यांनी आणि म.वा.मं. मधील लोकांनी मला कार्यक्रम आणि व्यवस्थापन विभागांचा संगम साधायला अतिशय मदत केली. त्यामुळेच आज मी मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये hospitality and security हा व्यवस्थापन विभाग सांभाळत आहे.


मंडळाने मला या पाच वर्षात भरभरून दिले आहे. म.वा.मं. च्या १०० व्या वर्षात मी त्याचा एक भाग होते आणि आमोदचे ते भव्य स्वरूप मी माझ्या डोळ्यांत साठवू शकले यापेक्षा माझ्यासाठी अजून मोठी गोष्ट नाही. तो अनुभव मी अजूनही शब्दात मांडू शकत नाही. मंडळाने मला जे दिलं मग तो अनुभव असुदे किंवा माणसं, त्याची कधीच परतफेड होऊ शकत नाही पण मंडळ माझ्या आयुष्यातील एक आमूलाग्र आहे आणि आयुष्याच्या वाटेवर जेव्हा जेव्हा मला माझे कॉलेजचे दिवस आठवतील, तेव्हा तेव्हा म.वा.मं. आणि त्याच्याशी जोडलेल्या आठवणी नकळत माझ्या ओठावर एक स्मितहास्य आणतील हे मात्र नक्की!



## नवनीत अजमेरा

### लॉजिस्टीक्स विभाग प्रमुख

खूबसूरत सा एक पल का किस्सा बन जाता है
जाने कब कौन ज़िंदगी का हिस्सा बन जाता है
कुछ खास लोग मिलते हैं ज़िंदगी में,
कुछ खास लोग मिलते हैं ज़िंदगी में,
जिनसे कभी ना बिछड़ने वाला रिश्ता बन जाता है |
मराठी वांग्मय मंडल में मेरी कहानी कुछ ऐसी ही है,
मुस्कुराते चेहरों के बीच रहना हमारी आदत सी है|



## उज्ज्वल बन्सल

### मार्केटिंग विभाग सह प्रमुख

MVM was the first college society I joined after coming to Xavier's. As a volunteer in my first year, I used to visit various places across Mumbai for offline marketing, this was a special process, I made multiple good friends during these visits. MVM has always been the most welcoming society I have been a part of, something about the people and the atmosphere just warms up my heart. In my second year, it was also the first committee that I was given the responsibility to head the marketing department of, immaculate guidance and support from everyone in the core team made it easy for me to understand and learn the procedures and minute details that were a necessity to be learnt. I hope to foster the same atmosphere and feelings in the members of my department and make it an exceptional experience for them as well.



## शुभम माशाळकर

### मार्केटिंग विभाग सह प्रमुख

My journey with MVM at St. Xavier's College has been a transformative and exhilarating experience on campus. I embarked on this enriching journey during my SYJC, stepping into the realm of MVM as a marketing volunteer, this was my very first extra-curricular in Xavier's. Little did I know that this initial step would be the foundation for an incredible expedition.

In my FYBsc (IT), I transitioned to the role of a Sangeet volunteer, immersing myself in the cultural vibrancy of the organization. However, destiny had more in store for me. When the coordinator positions were announced, I seized the opportunity to return to my roots in the Marketing department. To my delight, I secured the position of offline marketing coordinator, a role that proved pivotal in the success of our grandest event, Aamod'23, thanks to the fantastic sponsors we acquired.

As the journey continued into my second year, I aimed higher and applied for the position of Marketing Head. The decision bore fruit, and now I find myself the Head of Marketing, a role that fills me with immense pride. The responsibility to oversee the marketing endeavors for MVM has been both challenging and rewarding, allowing me to contribute significantly to the organization's growth.

This journey with MVM has not only honed my skills in marketing and event management but has also provided a platform for personal and professional growth. The camaraderie within the team, the challenges faced, and the triumphs achieved have collectively shaped my college experience into one that is memorable and impactful. I look forward to the continued evolution of MVM and the opportunities it brings for both personal and collective success.



## मधुरिमा पोतदार

### जनसंपर्क (अंतर्गत) विभाग प्रमुख

दहावीपर्यंत मी एका छोट्या शहरात वाढले. मुंबई - गोवा महामार्गावर असणारं एक छोटसं शहर म्हणजे माझं पेण! आमच्या पेणमध्ये सर्वच जण एकमेकांना ओळखायचे. छोट्या शहरात जीवन खरंच खूप साधे, सोपे व अतिशय सुखकर असते. माझ्या आसपास सर्वच जण माझ्यासारखे होते. भाषिक, धार्मिक, वैचारिक विविधता तशी फारशी नव्हती. तिथल्या माणसांमध्ये वावरताना एक आपुलकी वाटायची. सर्वच मराठीमध्ये बोलायचे, सर्वांची जीवनपद्धती बरीचशी सारखी होती, आणि जास्त काही अडचणी नव्हत्या. बहुतेक म्हणूनच मला कायम पेण आणि तिथली माणसे घरासारखी वाटायची.

माझे दहावीपर्यंत शिक्षण सेमी इंग्रजी माध्यमातून झाले; म्हणजेच मला ३ विषय मराठीमध्ये आणि ३ विषय इंग्रजीमध्ये. माझं नववी मध्ये असतानाच ठरलेलं की मला झेवियर्स मधून पदवी घ्यायची आहे आणि तीसुद्धा कला शाखेतून! झेवियर्स म्हणजे माझ्यासाठी एक वेगळीच दुनिया होती. इथे सर्वच वेगळे होते. लोकांमध्ये, त्यांच्या भाषेमध्ये, त्यांच्या जीवनपद्धतीमध्ये भरपूर विभिन्नता होती. भरपूर नवीन गोष्टींनी मला जणू घेरून टाकलं होतं. सुरुवातीला मी फार भांबावून गेले होते. जितकं माझं जीवन पेण मध्ये सरळ - सोपं होतं, तितकंच आता ते कठीण होऊन बसलं होतं. अकरावीत असताना म. वा. मं. चा "सदस्यत्वाचे अर्ज सुरु!" असा एक मेसेज मी पाहिला. मी लगेचंच अर्ज भरला आणि जनसंपर्क विभागात सिलेक्ट सुद्धा झाले! माझ्या पहिल्या आमोदच्या वेळी मी सर्व डिपार्टमेंट हेडस ना रडताना पाहिले होते आणि ते पाहून मला सारखा एकच प्रश्न सतावत होता.. तो म्हणजे "हे लोक मंडळासाठी इतके का रडत आहेत?" मागील ३-४ वर्षे मी मंडळाचा भाग आहे आणि मला आता फार चांगल्या प्रकारे आणि जवळून कळलं आहे की मराठी वाङ्मय मंडळ हे फक्त एक 'विद्यार्थ्यांनी चालू केलेले मंडळ ' नसून, एक परिवार आहे! मंडळाने मला एक आसरा दिला जेव्हा मी झेवियर्स मध्ये नवखी आणि हरवलेली होते. मंडळाने मला माझ्या संस्कृतीचा, इतिहासाचा आणि वैयक्तिक पार्श्वभूमीची जाणीव करून दिली. झेवियर्सच्या विभिन्न संस्कृतींमध्ये मला माझे स्थान निर्माण करून द्यायची एक संधी दिली, मला आपलेसे केले. मंडळाद्वारे मी अनेक हुशार, विनम्र आणि प्रेमळ माणसांना भेटले जे आता माझे अतिशय चांगले मित्र - मैत्रिणी बनले आहेत! मंडळाने मला खरोखरच खूप काही दिले आहे, खूप काही शिकवले आहे. मी कायमच त्याबद्दल ऋणी राहीन!

मराठी वांगमय मंडळाचा भाग बनण्याचा निर्णय माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला! तसेच माझ्यातील छोट्या शहरातून आलेल्या मधुरीमाला तिच्या नवीन रुपाशी संगम करणारा ठरला!



## मर्लिन रिबेलो

### जनसंपर्क (बाह्य) विभाग प्रमुख

A family where growth thrived, laughter echoed and bonds became the cornerstone of our journey!

As a nervous junior college student, finding a place where I'd fit in at college seemed daunting. MVM, with its welcoming atmosphere, immediately embraced me! I connected with people effortlessly and discovered friendships that I'm certain will endure. Looking back I'm simply nostalgic and filled with pride, it's about the sense of belongingness for me! Sometimes, when you're trying to figure things out, all you need is support and gentle guidance, and that's exactly what MVM provides. It has been my personal and professional solace. While I could go on and on about friendship and family you'll find at MVM, for me, it's truly about the commitment born out of love. To capture this sentiment, I turn to the lyrics of Ben King's masterpiece, "Stand by Me."

This committee has been a confluence of bondings and learnings that have eventually shaped me into the individual that I am. I've had my share of troubles and joy working with people who eventually became the definition of wholesome. But, I've found my PyaaRa parivaar right here. I'll forever be thankful for the unwavering support and abundant opportunities MVM presented to me. I've cried when things were difficult but I've also laughed and made memories that will always be etched in my heart. I'm not one for heavy statements but MVM has been everything that I ever wanted and hoped for as a part of my college experience.



## ओम पाटील

### छायाचित्रण आणि दस्तावेजीकरण विभाग प्रमुख

When I think about MVM - the first word that comes to my mind is memories. I've met so many good people through MVM who have become my good friends. Have learnt many things during this journey with Mandal. Being head of PnD was like a dream come true, I got to work with various film enthusiasts who are ready to give their best, who are ready to learn and help their peers at any given time. This year we have a team of more than 50 members in PnD and my goal has been to make each and every one learn new skill sets, improve them and enjoy the process throughout the year. MVM has been a confluence of traditions, culture and talented, enthusiastic people which go in the direction of celebrating all these elements to deliver a great experience in their college years of Xavier's. I'm honoured to be a part of MVM and grateful for being able to contribute to Mandal's legacy.



## गॅब्रिएल जाधव

### तांत्रिक व्यवस्थापन सह प्रमुख

म. वा. मं. एक असं मंडळ आहे जे लोकांना जवळ घेऊन येते आणि सर्वांसोबत प्रेम भावाने राहायची शिकवण देते. माझं नातं मंडळाशी खूप पूर्वीच जुळलं. मी ज्युनियर कॉलेज मध्ये असताना आमच्या मराठीच्या शिक्षिका, सना मॅडम यांनी मला म. वा. मं. चा भाग बनायला प्रोत्साहित केलं आणि मी त्यासाठी त्यांचे खूप खूप आभार मानतो कारण माझं मंडळाशी नातं त्यांच्यामुळे जोडलं गेलं. मला माझ्या आवडत्या विभागात - संगीत विभागामध्ये काम करण्याची संधी मिळाली आणि तेथून माझं आणि मंडळाचं नातं जणू अधिकच दृढ होत गेलं. मला ह्या वर्षी टेक्निकल्स हेडचे पद मिळाले. मराठी वाङ्मय मंडळ एक अशी सुंदर जागा आहे जिथे खूप काही शिकायला मिळतं आणि मी सर्व विद्यार्थींना सल्ला देईन की एकदा मंडळाचा भाग नक्कीच व्हा!



## क्रिस पिंटो

### तांत्रिक व्यवस्थापन सह प्रमुख

Working for MVM has been quite a different experience personally to me , as someone who is barely able to say even a few words in Marathi. The committee of MVM has been very welcoming as a whole , working with everyone has been an amazing experience and

through this committee I have gotten in touch with many people and have had an exposure to the entire Marathi culture as a whole.

MVM has taught me about the Marathi culture as a whole and working in harmony for the betterment of the organisation. It has been a wonderful experience working with different kinds of people and being able to witness people with so many talents and everyone contributing for the welfare of the organisation. Personally I am grateful to the core committee for believing and trusting in me constantly and giving me this opportunity to showcase my skills and abilities. It gave me the chance to work with an amazing set of people.

This has been one of the most amazing and beautiful experiences in itself and will go down as one of the core memories of my life.




## हर्षल पाटोळे

### खजिनदार

Marathi Vangmay Mandal is the very first college society that I have participated in. It wasn't like that I didn't try to participate anywhere else before this, but had always met with rejection. MVM immediately felt like a family to me. I started from Marketing member to being a Treasurer currently, the journey has been nothing short of fun experiences and immense learning. MVM gave me the confidence I needed to go out there and express myself. I feel deeply grateful for the faith that the Core Committee has shown in me by giving me an opportunity as the Treasurer and surely, not for even a moment I have taken this position for granted. The Shivrajyabhishek Din and Abhimaan Geet made me very emotional.

The fellow department heads are very enthusiastic and are a bunch of people I have enjoyed working with. And the words aren't enough to express the kind of support, love and respect I have received from the Core Committee right from the first day. Inaugural was an enchanting experience and the first as being a Treasurer and working tirelessly to ensure that the event was a grand success. MVM has made me who I am in a true sense and I can't thank the Mandal enough.

# सोडवा पाहू!



उभे शब्द-

१. नाचता येईना...
२. बगळा
३. आठवड्यातील एक वार
४. विष्णूचे एक नाव
५. टणक, मऊ नसलेला
७. उतावीळ, चंचल
८. आदरपूर्वक नमन
११. भुईमुगाचे बाहेरील आवरण
१४. कणिक भिजवण्यासाठी वापरले जाणारे भांडे
१५. एक कसरतीचा खेळ
१७.ह्याने सशाला हरवले
१८. चटकदार
२०. मुलीचे नाव, सोने
२१. प्रसिद्ध लोणच्याचे व्यापारी
२३. सतत, वारंवार
२५. ह्यातून पाणी येते
२६. रक्त वाहिन्या
२७. जळल्या नंतर शिल्लक राहिलेला अवशेष, भस्म

आडवे शब्द-

१. मध्य रेल्वेचे एक स्थानक
५. किरकिर, नकोसे वाटणारे बोलणे
६. विशाल, भव्य
७.घोडा
८. मृत्यूची देवता
९. ऐकू - बोलू न येणारे
१०. मार्ग, रस्ता
१२. युद्ध, संग्राम
१३. हात
१४. धाडसी कार्य, शौर्य
१६. पवन,वायू
१७. ह्यातून पलीकडलेही दिसते
१९. मराठी चित्रपटातील एक विनोदी अभिनेता
२२. विषम नसलेली संख्या
२४. घोड्यांचे खाणे
२५. लोचन,नेत्र
२७. क्रोध
२८. मासे धरण्याचा लोखंडी आकडा
२९. गोडवा वाढवणारा पदार्थ
३०. ज्योत पेटवण्यासाठी कापसापासून तयार केली जाणारी

# ओळखा कोण?

प्रश्न १. 'मराठी कवितेचे जनक' म्हणून कोणाला ओळखले जाते?
अ. संत तुकाराम
ब. कुसुमाग्रज
क. संत ज्ञानेश्वर

प्रश्न २. महाभारतातील कर्णाच्या जीवनावर आधारित 'मृत्युंजय' ही कादंबरी कोणत्या प्रसिद्ध मराठी लेखकाने लिहिली?
अ) विंदा करंदीकर
ब) रणजित देसाई
क) शिवाजी सावंत

प्रश्न ३. विजय तेंडुलकर यांनी लिहिलेल्या सामाजिक समस्या आणि स्त्रियांच्या हक्कांवर भाष्य करणाऱ्या प्रसिद्ध नाटकाचे शीर्षक काय आहे?
अ) सखाराम बाईंडर
ब) शांतता! कोर्ट चालू आहे
क) मित्राची गोष्ट

प्रश्न ४. 'नटसम्राट' हे उत्कृष्ट मराठी नाटक कोणी लिहिले?
अ) प्र. के. अत्रे
ब) कुसुमाग्रज
क) केशवसुत

प्रश्न ५. कोणता मराठी कवी लोकशाहीर परंपरेतील योगदान आणि त्यांच्या प्रभावी लोक कवितेसाठी ओळखला जातो?
अ) नामदेव ढसाळ
ब) अण्णाभाऊ साठे
क) वसंत बापट

प्रश्न ६.कोणत्या पहिल्या मराठी लेखकाला भारतीय साहित्यातील योगदानाबद्दल ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला?
अ) वि. स. खांडेकर
ब) वि. वा. शिरवाडकर
क) विंदा करंदीकर

प्रश्न ७. कोणता मराठी संत-कवी त्याच्या तात्विक शिकवणीसाठी आणि "दासबोध" रचनेसाठी ओळखला जातो?
अ) संत ज्ञानेश्वर
ब) समर्थ रामदास
क) संत एकनाथ

प्रश्न ८."या कुंदेंदु तुषार हार धवला" ही प्रतिष्ठित मराठी कविता कोणी लिहिली?
अ) समर्थ रामदास
ब) संत मीराबाई
क) संत ज्ञानेश्वर

प्रश्न ९. मेंढपाळ मुलाचे जीवन चित्रण करणाऱ्या साने गुरुजींच्या प्रसिद्ध मराठी कादंबरीचे शीर्षक काय आहे?
अ) ययाती
ब) असा मी असामी
क) श्यामची आई

प्रश्न १०. कोणत्या मराठी कवयित्रीचे उपनाम 'आरती प्रभू' होते आणि ती तिच्या स्त्रीवादी कवितेसाठी ओळखली जाते?
अ) शांता शेळके
ब) पद्मा गोळे
क) इंदिरा संत

उत्तरे-

**सोडवा पाहू!**

उभे शब्द
१. अंगण
२. बक
३. रविवार
४. नारायण
५. कडक
७. अधीर
९. मुजरा
११. टरफल
१४. परात
१५. मल्लखांब
१७. कासव
१८. चमचमीत
२०. कांचन
२१. बेडेकर
२३. सलग
२४. नळ
२६. नसा
२७. राख

आडवे शब्द-
१. अंबरनाथ
५. कटकट
६. विराट
७. अश्व
९. मुकबधीर
१०. वाट
१२. रण
१३. कर
१४. पराक्रम
१६. वारा
१७. काच
१९. लक्ष्मीकांत बेर्डे
२२. सम
२४. चणे
२५. नयन
२७. राग
२८. गळ
२९. साखर
३०. वात

**ओळखा कोण?**

१. संत तुकाराम
२. शिवाजी सावंत
३. "शांतता! कोर्ट चालू आहे"
४. विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज)
५. अण्णाभाऊ साठे
६. वि .स .खांडेकर
७. समर्थ रामदास
८. ज्ञानेश्वर
९. श्यामची आई
१०. इंदिरा संत

# चला भ्रमंती करूया!

## खांदेरी जलदुर्ग



रायगड जिल्ह्यातील जलदुर्गांपेकी एक महत्त्वाचा दुर्ग म्हणजे खांदेरी जलदुर्ग. हा किल्ला अरबी समुद्रात अलिबाग तालुक्यातील थळ जवळ आहे. खांदेरी हा मुंबई पासून समुद्रमार्गे १७ किलोमीटर तर अलिबाग पासून ९ कि.मी. वर आहे. खांदेरी आणि थळच्या किनाऱ्यामधोमध उंदेरी हा किल्ला आहे व खांदेरीच्या दक्षिणेकडे कळंबचा जलदुर्ग आहे. थळच्या किनाऱ्यावर पूर्वी थळचा छोटेखानी किल्ला होता. हा किल्ला खांदेरी व उंदेरी बेटांवर लक्ष ठेवून असे - आता त्याचे फक्त काही अवशेष शिल्लक राहिले आहेत.

खांदेरी उंदेरीची बेटे ही मुंबई आणि मुरुड-जंजिरा यांच्या मध्ये असल्यामुळे अतिशय महत्त्वाची होती. ही बेटे ताब्यात घेऊन त्यावर जलदुर्ग बांधल्यास मुंबईकर, इंग्रज आणि जंजिरेकर सिद्दी यांच्यामध्ये चांगलीच पाचर मारता येईल हे लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी खांदेरीचा किल्ला बांधायला घेतला. महाराजांच्या या बेताचा सुगावा लागताच इंग्रजांनी खांदेरी बेटावर किल्ला बांधण्यास विरोध केला. इंग्रजांना पोर्तुगिजांकडून १६६७ मध्ये मुंबई मिळाली होती. त्याच बरोबर खांदेरी आणि उंदेरी म्हणजे हेन्री आणि केनरी ही बेटेही त्यांना मिळाल्याचा त्यांचा दावा होता.

मराठ्यांच्या होड्या थळच्या किनाऱ्यावरून सामानसुमान घेऊन खांदेरी बेटावर निघत. त्यांना प्रतिबंध करण्यासाठी किनारा आणि बेट यांमध्ये नाविक मोर्चेबंदी उभारण्याचे इंग्रजांनी ठरवले होते; पण त्यांची मोठी जहाजे वाऱ्यामुळे किनाऱ्याकडे फेकली जात आणि ती दगडांवर आपटून फुटत. त्यामुळे इंग्रजांना ती जहाजे किल्ल्याच्या फार जवळ आणता येत नसत. सागराची भरती-ओहोटी, खोल-उथळ पाणी, मतलयी वारे, इत्यादींचे स्थानिक मराठ्यांना इंग्रजांपेक्षा अधिक ज्ञान असल्याने ते आपल्या वाल्हवायचा बोटी खांदेरीच्या तटापर्यंत सहजरित्या नेऊ शकत होते.

महाराजांनी खांदेरी बांधण्याची महत्त्वाची जोखीम मराठी आरमाराचे प्रमुख असलेल्या सरखेल मायनाक भंडारीवर सोपवली. मायनाक आपल्या एकशे पन्नास सहकारी आणि चार तोफांसहित, खांदेरी बेटावर दाखल झाले. इ.स. १६७९ च्या जुलै मध्ये ऐन पावसाळ्यात खांदेरीचे बांधकाम सुरु झाले. इंग्रजांनी आपल्या आरमारासहीत येवून त्यांना आडकाठी करण्याचा प्रयत्न केला. मायनाक यांनी इंग्रजांना न जुमानता काम चालू ठेवले. खांदेरीचे बांधकाम करणारे कामकरी इंग्रजांचा हल्ला परतवून लावण्यासाठी प्रसंगी युद्ध करत. इंग्रजांचा विरोध मोडून काढत मायनाक यांनी खांदेरीचा जलदुर्ग उभा करून स्वराज्यातील जलदुर्गांची मजबुती फळी उभी केली.



किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ एक तोफ पुरलेली आहे. गडावर जाताच तटबंदीवरील फांजी, अर्थात पायवाटेने आपण फिरू शकतो. धक्क्याच्या उजव्या बाजूला एक लाकडी मंदिर आहे, जिथे वेताळ म्हणून मोठ्या दगडाची पूजा केली जाते. दंतकथा सांगते की दगड दरवर्षी आकारात वाढतो. दरवर्षी होळीच्या वेळी यात्रेकरू येथे पूजेसाठी जमतात. खांदेरीच्या दोन टेकड्यांमधली सपाट जागा आत घेऊन सभोवताली संपूर्ण तटबंदी बांधण्यात आली आहे. मधल्या दोन टेकड्यांमुळे गडाचे दोन भागात विभाजन झाले आहे. किल्ल्याचा दरवाजा मात्र नष्ट झाला आहे. आपण डावीकडील वाट चालू लागल्यावर आपल्याला एक खडक लागतो. या खडकावर दगड आपटल्यास यातून धातूसारखा नाद करणारा आवाज येतो.

खांदेरीच्या गडावर २-३ तोफा ठेवल्या आहेत. तटबंदीला जागोजागी बुरूज आहेत. तटबंदीचे काम रचीव पद्धतीने केलेले असल्याने दोन चिऱ्यांच्या मध्ये दर्जा भरलेला नाही. तसेच तटबंदीच्या बाहेरील अंगाला मोकळे चिरे टाकून दिले आहेत. त्यामुळे सागराच्या लाटांचा जोर कमी होतो व मुख्य तटबंदीला कसलीही इजा पोहोचत नाही. भिंतीबाहेरच्या मोकळ्या चिऱ्यांवर नेहमीच सागराचा मारा चालू असतो त्यामुळे त्याच्यावर शंखशिंपले मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. खांदेरीच्या गडफेरीमधे वेताळ मंदिर, हनुमान मंदिर, बुद्ध मंदिर, क्रॉस, पीर अशी अनेक श्रद्धास्थाने पाहायला मिळतात. इंग्रजांच्या राजवटीपासून हा किल्ला मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ताब्यात असल्याने येथे दीपगृह आणि एक हेलिपॅडही बसविण्यात आले आहे. हेलिपॅडच्या खाली भिंतीमध्ये एक आपत्कालीन निकासाचा छोटा चोरदरवाजा आहे जो आपल्याला बाहेर समुद्रकिनाऱ्यावर घेऊन जातो, जिथून आपण किल्ल्याच्या तटबंदीचे चांगले दर्शन करू शकतो.

खांदेरीच्या जवळच थळ आणि अलिबाग असल्यामुळे आपल्याला इथल्या अस्सल कोकणी खाद्य संस्कृतीचा आस्वाद घेता येतो. अलिबागला मोठा समुद्र किनारा लाभल्यामुळे मासे हे येथील जेवणाचे अविभाग्य अंग आहे. काही विशिष्ट मासे जसे बोंबील (बॉम्बे डक) ,सुरमई (किंग फिश) आणि पापलेट (पॉम्फ्रेट) हे मुख्यत्वाने खाल्ले जातात. कोकमाचे सार जे कोकम आणि नारळाचे दूध यापासून बनवले जाते .....आणि उत्कृष्ट लागते. गरम भात, कोकमाचे सार, मास्याचा तुकडा असे साधे पण चविष्ट जेवण येथे मिळते. भरलेला खेकडा आणि शिंपल्याची आमटी, तांदळाच्या घावनाबरोबर खूपच छान लागतात. वाल-पडवळची भाजी, तोंडली भात शाकाहारी जेवणाला रंगत आणतात. त्याचबरोबर मिरगुंड आणि तळलेली सांडगी मिरचीही तोंडाला पाणी आणते.

येथील मोटर स्पोर्ट्स, बोट राईड्स आणि नयनरम्य सूर्यास्त बघण्यासाठी खांदेरीला भेट द्या!

# नागझिरा वन्यजीव अभयारण्य



नागझिरा वन्यजीव अभयारण्य हे भंडारा-गोंदिया जिल्ह्यात असून, या अभयारण्याचे भौगोलिक स्थान २१.१४.३८० उत्तर व ७९.५९.०९० पूर्व असे आहे. नागझिरा जीव-जातींच्या संवर्धनाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचे अभयारण्य आहे. हे अभयारण्य १९७० मध्ये घोषित करण्यात आले व त्याचे वन 'दक्षिण प्रदेशीय उष्ण पानगळीचे' आहे तसेच त्याचे एकूण क्षेत्र १५३ चौ. किमी आहे. वन्यजीव अभयारण्य घोषित करण्यापूर्वी नागझिरा हे एक hunting reserve होते. नागझिरा हे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर असलेल्या भंडारा शहरापासून सुमारे ४० किमी व अंतरावरील साकोली गावापासून अंदाजे २२ किमी वर आहे. पूर्वी या परिसरात भरपूर प्रमाणात हत्ती आढळून यायचे. संस्कृत भाषेत हत्तीला 'नाग' म्हटले जाते व या अभयारण्यात बरेच झरे असल्याने याला 'नागझिरा' नाव पडले असावे.

नागझिरा वन्यजीव अभयारण्यात जाण्यासाठी ‘पिटेझरी आणि चोखमारा’ अशी दोन प्रवेशद्वारे आहेत. अभयारण्यात नागझिरा तलाव हे एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ असून तेथील परिसंस्थेसाठी ते अत्यंत महत्त्वाचे ठरते. नागझिरा मध्ये सस्तन प्राण्यांच्या सुमारे ३४ जाती आढळतात. वाघ, बिबटे, रानगवे, अस्वल, लांडगे, कोल्हे, काळवीट, सांबर, नीलगाय, चितळ, भेकर, पिसोरी हरीण, रानडुक्कर, रानकुत्रे, लंगूर माकड, उडती खार इत्यादी प्राणी पाहायला मिळतात. तसेच या अभयारण्यात उभयचर प्राण्यांच्या सुमारे ४ जाती आहेत.

नागझिरा अभयारण्यात पक्षांच्या सुमारे २०० जातीची नोंद करण्यात आली आहे. त्यातील काही महत्त्वाचे पक्षी — सर्प गरूड, मत्स्य गरूड, नवरंग, कोतवाल, महाराष्ट्राचे मानचिन्ह हरियाल , नीलपंखी, स्वर्गिय नर्तक, तिसा किंवा पांढऱ्या डोळ्यांचा बाज इत्यादी आहेत. अभयारण्यात सरपटणाऱ्या प्राण्यांच्या सुमारे ३६ जाती आहेत. त्यात अजगर, किंग कोब्रा, नाग, धामण, रसेल व्हायपर, कीलबॅक स्नेक, घोरपड इत्यादींचा समावेश आहे. अभयारण्यात नऊ कूलातील ४९ जातींची फुलपाखरे पहायला मिळतात.
नागझिऱ्याच्या सदाहरित वनात काटेरी वनस्पती, बांबू आणि अनेक प्रकारच्या गवतांचे विविध प्रकार आढळून येतात. त्याच्याशिवाय अर्जून, जांभूळ, कुसुम, हिरडा ,आवळा, भुइनिंब, मुरुडशेंग, मोह इत्यादी जातींचे लहान-मोठे वृक्ष दिसून येतात. 'ग्लोरी ऑफ नागझिरा' म्हणून ओळखले जाणारे १० फूट व्यास असणारे सागाचे झाड येथे मुद्दाम जतन करून ठेवले आहे. 'नेकेड ब्युटी ऑफ फॉरेस्ट' म्हणून ओळखले जाणारे करू किंवा भुत्या हे वृक्ष नागझिराच्या वनात जागोजागी पहायला मिळतात.

अभयारण्याच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर एक छोटे संग्रहालय व माहिती केंद्र आहे. संग्रहालयात पेंढा भरलेले पक्षी, काही प्राण्यांच्या प्रतिकृती व फूलपाखरे यांचे प्रदर्शन आहे. त्याचबरोबर वन्यजीवांवरील काही छायाचित्रे, प्राण्यांच्या पायांचे व खुरांचे प्लॅस्टर ऑफ पॅरिसमधील ठशांचे प्रदर्शन आहे. माहिती केंद्रात वन्यजीवांवरील चित्रपट, काही पारदर्शिका दाखविण्यात येतात. अभयारण्यात कोठेही वीज नाही. नैसर्गिक अवस्थेत नैसर्गिक प्रकाशात वन्यजीव पहायला मिळावे हा त्यामागील हेतू आहे. अभयारण्याला भेट देण्याचा






काळ ऑक्टोबर–जून आणि एप्रिल–मे असून वेळ सकाळी ६ ते दूपारी १२ वाजेपर्यंत आणि दूपारी ३ ते ६ वाजेपर्यंत आहे. जंगलसफारीसाठी खाजगी वाहनांबरोबरच वनविभागाच्या मिनी बसेस आणि इतर वाहने उपलब्ध आहेत.


नागझिरा अभयारण्याच्या नव्या वाढीव क्षेत्रात - नवीन नागझिरा अभयारण्यात, भंडारा जिल्ह्यातील साकोली तसेच गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्याचा काही भाग यांचा समावेश आहे. नागझिरा व नवीन नागझिरा अभयारण्यांच्या क्षेत्रात ५९ गावे आहेत. या अभयारण्यात चांदी अस्वल आढळते. हे या अभयारण्याचे खास वैशिष्ट्य आहे. तसेच येथील चांदीटिब्बा हे ठिकाण विदर्भातील 'कळसूबाईचे शिखर' म्हणून प्रसिद्ध आहे. वन्य जीवांच्या संवर्धनासाठी येथील वातावरण अत्यंत पोषक असल्याने नवीन नागझिरा अभयारण्यात पर्यटनासाठी मोठा वाव आहे.

नागझिरा अभयारण्य महाराष्ट्रातील विदर्भात असून तेथील स्थानिक खाद्यसंस्कृतीचा आपल्याला नक्कीच आस्वाद घेता येईल. या परिसरात वर्हाडी आणि सावजी अश्या दोन खाद्य पद्धती आपल्याला सापडतात. विदर्भातील खाद्यसंस्कृतीत मसाले, सुके खोबरे आणि बेसनाचा वापर जास्त असल्याने तेथील पदार्थ चवीला चमचमीत आणि तिखट असतात. 'सावजी मटण रस्सा' हा तेथील अत्यंत प्रसिद्ध मासांहारी पदार्थ आहे. त्याव्यतिरिक्त, पातोडी रस्सा भाजी, वडा भात आणि वर्हाडी ठेचा हे तेथील मुख्य आहाराचा महत्त्वाचा भाग असतात.

अशा विविधतेने नटलेल्या नागझिरा वन्यजीव अभयारण्याला लवकरच भेट द्या आणि तेथील खाद्यसंस्कृतीचा नक्की आस्वाद घ्या!

# हसवा फसवी


...आणि कुंचल्याच्या लालित्यपूर्ण फटकाऱ्याने चित्र पूर्ण करायचं!
तिने चित्र चांगलं काढलंय... का तिच्या भाषेमुळे मला ते चांगलं वाटतंय ?


सोहम, तू माझा गणिताचा अभ्यास घेतोस?
आरतीला सांग ना, ती भारी आहे.
सांगितलं, तर ती म्हणाली सोहमलाच घेऊ दे.


एकदा फडके आणि पाटील यांच्यात स्वल्पविरामाच्या वापरावरून वाद चालला होता.
स्वल्पविराम कशाला हवा? काही फरक पडत नाही त्याने.
अहो पाटील, खूप फरक पडतो त्याने!
छे! मी नाही मानत!
फडके एक युक्ती करतात.
पाटील घरी नसताना फडके त्यांच्या घरी गेले व त्यांच्या पत्नीला म्हणाले
मी तुझा नवरा तू माझी बायको आपण फिरायला जाऊ.
यावर पाटलांच्या पत्नी रागावल्या.
मला म्हणायचे होते की मी, तुझा नवरा, तू, माझी बायको आपण फिरायला जाऊ!

# प्रतिभा आणि प्रतिमा


~नुपूर लिखिते, SYBA


~शामल शेलार, SYBA

## आम्ही सारे खवय्ये!


~ऋत्वि चौधरी, FYBA


~ऋत्वि चौधरी, FYBA



~अनिरुद्ध  तिवारी, SY Bsc

# आनंदाचे डोही, आनंद तरंग



~अनिरुद्ध  तिवारी, SY Bsc



~स्नेहा कुजूर, TY BMM



~ऋत्वि चौधरी, FYBA



~अनिरुद्ध तिवारी, SY Bsc



~कुंजल दवे, SYBA



~अनिरुद्ध तिवारी, SY Bsc



~अद्वैत इंगोले, TY Bsc





~अनिरुद्ध तिवारी, SY Bsc



~ऋत्वि चौधरी, FYBA

~नंदिनी यादव, SYBA



~अनिरुद्ध  तिवारी, SY Bsc

# सफरनामा



~अद्वैत इंगोले, TY Bsc



~अनिरुद्ध  तिवारी, SY Bsc



~अद्वैत इंगोले, TY Bsc

# कार्यकारिणी २०२३-२४

